७० वर्ष

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०४८ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## माळेगाव कारखान्याची धुरा सुनेत्रा पवारांकडे?

माळेगाव (दै. संध्या) : माळेगाव (ता. बारामती) सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री कै. अजित पवार यांचे बुधवार (ता. २८ जानेवारी) रोजी अकाली निधन झाले होते. त्यांच्या जाण्याने एक प्रभावी नेतृत्व हरपले. माळेगाव कारखान्याच्या अध्यक्षपदासह 'ब' वर्ग संस्था मतदार संघातील संचालकपदाची जागाही रिक्त झाली होती. या पार्श्वभूमीवर सहकार कायद्यानुसार "ब" वर्ग संचालकपदाची रिक्त जागा भरण्याची प्रक्रिया बुधवार (ता.१८) रोजी माळेगाव संचालक मंडळ व प्रशासन पातळीवर पुर्ण होणार आहे, अशी माहिती उपाध्यक्षा सौ. संगिता कोकरे यांनी दिली. माळेगाव कारखान्याच्या भविष्यासंदर्भात एक महत्त्वाची चर्चा सभासदांमध्ये सुरू झाली आहे. कै. अजित पवार यांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्यासाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनीच माळेगाव कारखान्याची धुरा हाती घ्यावी, अशी जोरदार मागणी सभासदांकडून होत आहे.

## श्रीमती सुनेत्रा अजितदादा पवार यांनी स्वीकारला कार्यभार



**मुंबई (दै. संध्या) :** महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात आजचा दिवस सुवर्णाक्षरांनी नोंदवला गेला. राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून श्रीमती सुनेत्रा वहिनी अजितदादा पवार यांनी आज विधिवतपणे उपमुख्यमंत्री पदाचा कार्यभार स्वीकारला. या ऐतिहासिक प्रसंगी श्रीमती सुनेत्रा वहिनी पवार यांनी महाराष्ट्राच्या जनतेप्रती कृतज्ञता व्यक्त करत, सर्वसामान्य नागरिक, महिला, शेतकरी, युवक आणि वंचित घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला. राज्याच्या प्रगतीसाठी पारदर्शक, संवेदनशील आणि लोकाभिमुख प्रशासन देण्याचे त्यांनी आश्वासन दिले. कार्यभार स्वीकारताना उपस्थित मान्यवर, वरिष्ठ अधिकारी, पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले. त्यांच्या या नियुक्तीमुळे महिला सक्षमीकरणाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. श्रीमती सुनेत्रा वहिनी अजितदादा पवार यांचा हा प्रवास राज्यातील महिला नेतृत्वासाठी प्रेरणादायी ठरणार असून, महाराष्ट्राच्या विकासात तो नवा अध्याय जोडणारा ठरेल.

# २३ फेब्रुवारीपासून अधिवेशन

### ■ आज झालेल्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत निर्णय ■

**मुंबई (दै. संध्या)**

राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे कामकाज सोमवार दि.२३ फेब्रुवारी २०२६ ते बुधवार दि. २५ मार्च २०२६ पर्यत निश्चित करण्यात आले आहे. दिनांक ६ मार्च २०२६ रोजी अर्थसंकल्प मांडण्यात येणार आहे, असा निर्णय कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला.

विधानभवन येथे आज विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली. बैठकीला विधान परिषद सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधानपरिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, उच्च व तंत्र शिक्षण व संसदीय कार्यमंत्री चंद्रकांतदादा पाटील, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सांस्कृतिक कार्य मंत्री अँड.आशिष शेलार, आमदार सर्वश्री अनिल परब, प्रसाद लाड, भास्कर जाधव, जयंत पाटील, सुनील प्रभु, भाई जगताप, प्रवीण दरेकर, विक्रम काळे, सतेज पाटील, विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे व संबंधित



अधिकारी उपस्थित होते. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री, राज्य उत्पादन शुल्क मंत्री दिवंगत अजित पवार यांना कामकाज सल्लागार समितीच्या दोन्ही बैठकीत श्रद्धांजली वाहण्यात आली. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी दोन्ही सभागृहात शोक प्रस्ताव मांडण्यात येणार आहे.

अधिवेशन काळात शनिवार दि.२८ फेब्रुवारी २०२६ रोजी शासकीय सुट्टीच्या दिवशी विधिमंडळ कामकाज होणार आहे. सोमवार दि. २ मार्च २०२६ रोजी होळी आणि ३ मार्च २०२६ रोजी धूलिवंदन असल्याने कामकाज होणार नाही. दिनांक १,७,८,१४,१५,२१,२२ मार्च रोजी शासकीय सुट्टी आणि दिनांक १९ मार्चला गुढीपाडव्याची सार्वजनिक

सुटी असल्याने या दिवशी कामकाज होणार नाही. तर दि.२० मार्च रोजीही विधिमंडळ कामकाज होणार नाही.

### या अधिवेशनात यावर होणार चर्चा


- संयुक्त राष्ट्र संघाने सन २०२६ हे 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' म्हणून घोषित केले आहे. या अधिवेशनात यावर चर्चा करण्यात येणार आहे.
- जागतिक महिला दिनानिमित्त दिनांक ९ मार्च रोजी दोन्ही सभागृहात महिला दिनानिमित्त चर्चा होणार आहे.
- मराठी भाषा गौरव दिननिमित्त चर्चा होईल.
- निवृत्त होणाऱ्या सदस्यांचा निरोप समारंभ होईल.

### ढिंग-टांग




# 'राष्ट्रवादी'चे विलीनीकरण झाले तर बोलणार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची रोखठोक भूमिका; म्हणाले- हवेत पतंगबाजी का करायची?



**मुंबई (दै. संध्या)**

राष्ट्रवादीच्या विलीनकरण हा त्यांच्या पक्षाचा अंतर्गत विषय आहे. त्याविषयी माझा बोलण्याचा काहीही संबंध नाही. त्यांचा पक्षांतर्गत निर्णय झाल्यानंतर ते महायुतीकडे तसा प्रस्ताव घेऊन येतील. त्यानंतर मात्र, नक्कीच याविषयी बोलणे योग्य ठरेल. मात्र, तोपर्यंत हवेत पतंगबाजी का करायची? असा प्रश्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विचारला आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या गुप्त दिल्लीवारीचे वृत्त आहे. त्यानंतर आता उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारही दिल्लीत भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांना भेटणार असल्याचे वृत्त आहे. यामुळे पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणावर चर्चा सुरू झाली आहे. यावर फडणवीसांनी आपली भूमिका स्पष्ट केली. अजित पवार यांच्या विमान अपघाती निधनापूर्वीही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाची चर्चा सुरू होती. अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर या चर्चेने पुन्हा जोर धरला. विशेषतः शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून ही बोलणी अंतिम टप्प्यात आल्याचे सांगितले गेले. स्वतः शरद पवार यांनीही हीच भूमिका मांडली. तसेच विलीनीकरणाची तारीखही निश्चित झाली होती, अशी माहिती त्यांनी दिली होती. आता सुनेत्रा पवार या दिल्ली दौऱ्यावर जाणार असल्याचे समजते. त्यानंतर पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणावर चर्चा सुरू झाली आहे. मात्र, 'त्याविषयी माझा बोलण्याचा काहीही संबंध नाही. त्यांचा पक्षांतर्गत निर्णय झाल्यानंतर ते महायुतीकडे तसा प्रस्ताव घेऊन येतील. त्यानंतर मात्र, नक्कीच याविषयी बोलणे योग्य ठरेल. मात्र, तोपर्यंत हवेत पतंगबाजी का करायची?', असा सवाल देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर आज मंत्रिमंडळाची पहिलीच बैठक होती. तर उपमुख्यमंत्री म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर सुनेत्रा पवार यांची देखील ही पहिलीच मंत्रिमंडळ बैठक होती.

### राजकारणाची कल्पना नाही

चंद्रपूरमध्ये भारतीय जनता पक्षाचा महापौर झाला असल्याची माहिती मला आत्ताच मिळाली असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं. मात्र त्या मागील राजकारणाची सध्या आपल्याला काहीही कल्पना नसल्याचं ते म्हणाले. यासंबंधी माहिती घेऊन मी बोलेल. भाजपच्या महापौर झाल्यामुळे त्यांचे माझ्याकडून खूप खूप अभिनंदन. भाजपचा महापौर झाल्याचा आपल्याला देखील आनंद असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे.

### पवारांनीही मांडली होती भूमिका

दरम्यान यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणावर शरद पवारांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. ते म्हणाले होते की, ' राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाची अजित पवारांचीही इच्छा होती. ती नक्कीच पूर्ण व्हायला हवी. अजित, शशिकांत शिंदे आणि जयंत पाटील यांनी दोन्ही गटांच्या विलीनीकरणाबाबत चर्चा सुरू केली होती. विलीनीकरणाची तारीखही निश्चित झाली होती. 12 फेब्रुवारीला विलीनीकरणाची घोषणा होणार होती, पण दुर्दैवाने, अजित त्याआधीच आम्हाला सोडून गेले.' शरद पवारांच्या विधानावर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित गट) नेते प्रमोद हिंदुराव म्हणाले होते की, 'ते आमचे ज्येष्ठ नेते आहेत. मी त्यांच्याबद्दल जास्त काही बोलू शकत नाही, पण मला वाटते की येत्या काळात सर्व पक्ष एकत्र काम करतील.'

# शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी महाराष्ट्राचा मोठा निर्णय

### 'टास्क फोर्स' स्थापन करणारे देशातील पहिले राज्य

**पुणे (दै. संध्या)**

राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी टास्क फोर्सची निर्मिती करण्याचा निर्णय कृषी विभागाने घेतला आहे. या कृती दलाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्याबरोबरच सामाजिक, आर्थिक आणि हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या आपत्तींवर सर्वसमावेशक उपाययोजना राबवण्याचा निर्णय कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी परीपत्रकाद्वारे जाहीर केला. अशा प्रकारचे 'टास्क फोर्स' निर्माण करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य ठरले आहे. विस्तार आणि प्रशिक्षण विभागाचे संचालक रफिक नाईकवाडी यांच्या अध्यक्षतेखालील कृतिदलात सुनील बोरकर, उदय देशमुख, गणेश घोरपडे, जीवन बुंदे, नंदकिशोर नाईनवाड, सत्यजित शितोळे, सोनाली शिळकर या अधिकाऱ्यांचा समावेश आहे. तसेच 'शिवार फाउंडेशन'च्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर काम करणारे संशोधक, कृषी समाजशास्त्रज्ञ डॉ. विनायक हेगाणा आणि महिला शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर संशोधन करणाऱ्या मानसोपचार तज्ज्ञ सृष्टी डोईजड यांची विशेष सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी सातत्याने विविध योजना, उपक्रम व कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. मात्र, सध्या हवामान बदलामुळे नैसर्गिक आपत्ती, पिकांचे नुकसान, आर्थिक अडचणी, सामाजिक ताणतणाव आणि मानसिक अस्थैर्याच्या समस्या निर्माण होतात. अशा विविध कारणांमुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यांना या अडचणींचा सामना करता यावा, नैराश्यातून बाहेर पडता यावे म्हणून योग्य मार्गदर्शन आणि मानसिक आधाराची आवश्यकता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठीच्या प्रयत्नांबरोबरच आपत्तीपूर्व, आपत्ती काळात आणि आपत्तीनंतर शेतकऱ्यांना शेती, आर्थिक, सामाजिक आणि मानसिक या चतुःसूत्री दृष्टिकोनातून एकात्मिक उपाययोजना राबविण्यासाठी या कृतिदलाची निर्मिती करण्यात येत असल्याचे विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### ब्रेकिंग न्यूज

#### महापौरपदी भाजपचे समीर राजूरकर विजयी

मुंबई (दै. संध्या) : छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौरपदाच्या निवडणुकीत महायुतीने निर्विवाद यश मिळवले आहे. महापौरपदी भाजपचे समीर राजूरकर तर उपमहापौरपदी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे राजेंद्र जंजाळ यांची बहुमताने निवड करण्यात आली. विजयी उमेदवार राजूरकर आणि जंजाळ यांना प्रत्येकी ७० मते मिळाली, तर प्रतिस्पर्धी एमआयएमच्या उमेदवारांना केवळ ३३ मतांवर समाधान मानावे लागले. भाजपच्या ५७ नगरसेवकांसह शिवसेना (शिंदे गट) आणि अपक्षांनी महायुतीच्या बाजूने कौल दिला. तर काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट आणि वंचित बहुजन आघाडी या निवडणुकीत तटस्थ राहिले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सभेत 'हात वर करून' मतदान घेण्यात आले.

#### चंद्रपुरात भाजप-ठाकरे सेना एकत्र

चंद्रपूर (दै. संध्या) : चंद्रपूर महानगरपालिकेतील महापौर निवडणुकीने राज्याच्या राजकारणात नवे समीकरण उभे केले आहे. या निवडणुकीत भाजप आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष एकत्र आले. ठाकरेंच्या शिवसेनेने भाजपला पाठिंबा देत महापौरपदासाठी साथ दिली. या निर्णयामुळे चंद्रपूरमधील राजकीय वातावरण ढवळून निघाले. या करारानुसार भाजपला महापौरपद मिळणार तर ठाकरेंच्या शिवसेनेला स्थायी समितीवर नियंत्रण मिळणार असल्याचे ठरले. या पार्श्वभूमीवर भाजपच्या संगीता खांडेकर या महापौरपदी विराजमान झाल्या.

# दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा अपघात नव्हे घातपात

### पवार यांनी व्यक्त केला संशय; पूर्व विदर्भातील नेत्याच्या फाईलवर सही करण्यास उशीर झाल्याने करावा लागला विमान प्रवास

**मुंबई (दै. संध्या)**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत दररोज नवनवे तर्कवितर्क लावले जात असताना त्यांचे पुतणे आणि आमदार रोहित पवार यांनी देखील हा अपघात नव्हे, तर घातपात असल्याचा संशय व्यक्त केला आहे. मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत रोहित यांनी अपघाताच्या आधी घडलेल्या घटनांचा क्रमवार उल्लेख करत, वेळापत्रकातील बदल, अचानक विमान प्रवासाची गरज आणि काही महत्त्वाच्या निर्णयांशी संबंधित बाबी संशय अधिक गडद करणाऱ्या असल्याचा दावा केला आहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत रोहित पवार म्हणाले, "२७ जानेवारी रोजी अजित पवार हे कॅबिनेट बैठकीनंतर



नियोजनाप्रमाणे संध्याकाळी मुंबईहून गाडीने पुण्याला जाणार होते. त्यासाठी ताफाही तयार ठेवण्यात आला होता. मात्र, ते प्रत्यक्षात पुण्याला का निघाले नाहीत? कॅबिनेट बैठक संपल्यानंतर अजित पवार यांनी पुढील चार-पाच तास आपली कामे, पक्षातील नेते, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या भेटींसाठी राखीव असल्याचे सांगितले होते. त्यानंतर संध्याकाळी पुण्याला जाण्याचा त्यांचा निर्णय होता. त्याच दिवशी पूर्व विदर्भातील एक अत्यंत मोठे नेते अजित पवार यांच्या भेटीसाठी येणार होते. मात्र, ते अपेक्षेपेक्षा उशिरा पोहोचले. ते उशिरा आल्यामुळे आणि चर्चा दीर्घकाळ सुरू राहिल्याने अजित पवार यांचा वेळ त्यातच गेला. परिणामी, संध्याकाळी पाच-साडेपाच वाजता गाडीने निघण्याचा नियोजित कार्यक्रम रद्द झाला. वेळ निघून गेल्याने त्यांच्यासमोर दुसरा पर्याय उरला नाही आणि त्यांना विमान प्रवासाचा निर्णय घ्यावा लागला", असे रोहित पवार यांनी सांगितले.

पूर्व विदर्भातील नेत्याशी संबंधित अत्यंत महत्त्वाची फाईल सहीसाठी येणार होती. कुणाचा फोन आला होता, हे स्पष्ट नसले, तरी त्या फाईलवर तातडीने सही करणे गरजेचे असल्याचे त्यांना सांगण्यात आले.

ही फाईल अजित पवार यांच्या बंगल्यावर नसून मंत्रालयातील कार्यालयात असल्याचे लक्षात आल्यानंतर ती मागवण्यात आली. अजित पवार सहसा प्रलंबित कामे ठेवत नसत, मात्र या वेळी अचानक ती फाईल कार्यालयातच राहिली होती. फाईल पोहोचेपर्यंत वेळ गेला आणि सही होईपर्यंत अजित पवार यांना अधिक विलंब झाला, असा दावा रोहित यांनी केला.

### रोहित पवारांना संशय कशावर?

पत्रकार परिषदेत रोहित पवार यांनी घातपाताची शक्यता व्यक्त करणारी काही कारणेही मांडली. त्यामध्ये अजित पवार यांचा दौरा अचानक बदलणे, विमानाची वेळ आणि पायलट बदलणे, केंद्रीय विमान मंत्रालयाच्या अहवालात आणि एटीसी ट्रान्सक्रिप्टमधील वेळेतील विसंगती, फ्लाइट रडारचा डेटा अपघाताच्या एक मिनिट आधी बंद पडणे, कमी दृश्यता असताना लँडिंगचा निर्णय, रनवे २९ ऐवजी ११ वर उतरवण्याचा आग्रह, शेवटच्या काही मिनिटांत पायलटने एकही शब्द न बोलणे, या मुद्द्यांचा त्यांनी उल्लेख केला. या सर्व बाबी एकत्रितपणे पाहिल्यास, हा केवळ अपघात नसून त्यामागे काहीतरी वेगळे कारण असू शकते, असा संशय व्यक्त करत रोहित पवार यांनी सखोल आणि पारदर्शक चौकशीची मागणी केली आहे.

रोहित पवार यांनी पुढे सांगितले की, आपल्या संपर्कातील लोक आणि अजित पवार यांच्यासोबत काम करणारे अधिकारी यांच्याशी झालेल्या चर्चांमधून काही संवेदनशील बाबी समोर आल्या. अजित पवार यांच्या शेवटच्या तीन-चार महिन्यांत काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसह अतिशय महत्त्वाच्या चर्चा होत होत्या. त्या चर्चांमध्ये काही राजकीय कन्सल्टंट्सचे शेकडो कोटींचे करार रद्द करण्याचा निर्णय घेण्यात येत होता, कारण त्यातून कोणताही फायदा होत नसल्याचे मत अजित पवार यांचे होते.

अपघाताच्या अवघ्या सात दिवस आधी बारामती हॉस्टेल येथे झालेल्या भेटीतही अजित पवार यांनी काही लोकांना स्पष्ट शब्दांत 'राजकारण शिकवू नका, आम्हाला काय करायचे ते आम्हाला माहीत आहे', असे सुनावल्याचे रोहित पवार यांनी सांगितले.

# संपादकीय

## चोरीचा मामला

भारतीय दंड संहितेच्या कलम ३७८ नुसार चोरी म्हणजेच, वस्तू पळविण्याचा एक गंभीर गुन्हा आहे. एखाद्याच्या संमतीशिवाय त्याची वस्तू किंवा जंगम मालमत्ता गैरमार्गाने काढून घेण्याची केलेली कृती हे चोरीच्या गुन्ह्यांचे स्वरूप मानले जाते. चोरीसाठी ३ वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा असल्याने आजही समाजात चोरीच्या गुन्ह्यांतील आरोपीपासून सावध राहण्याचा सल्ला दिला जातो. इंटरनेटच्या जमान्यात आता चोरीच्या व्याख्येत थोडी भर पडली आहे ती, माहिती चोराची! माहिती चोरीचे गुन्हे संबंधित कंपन्या करत असतील, तर लोकांनी विश्वास कोणावर ठेवायचा? एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान 'डेटा शेअरिंग'च्या नांवाखाली वापरकर्त्यांच्या गोपनीयतेचे उल्लंघन करण्यावरून व्हॉट्सअ‍ॅप आणि मेटा या कंपनीला सर्वोच्च न्यायालयाने कडक शब्दांत फटकारल्याने माहिती चोरीच्या गुन्ह्याकडे सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष गेले आहे. नागरिकांच्या मूलभूत गोपनीयतेच्या अधिकाराशी खेळू नका, असा सज्जड दम न्यायालयाने दिला. असे गुन्हे पुन्हा घडणार नाही अशी लेखी हमी संबंधित कंपनीने द्यावी,असे निर्देशही खंडपीठाने दिले. अलीकडच्या काळात एआयच्या माध्यमातून आणखी एक माहिती चोरीचा प्रकार उजेडात आला होता. जगभरात एआयचा वापर जसा झपाट्याने वाढतो आहे, तसे त्यातील धोकेही समोर येत आहेत. त्यामुळे एलन मस्क यांच्या एआय कंपनीचा चॅटबॉट ग्रोक वादात सापडला होता. यापूर्वी ग्रोक एआयने काही यूजर्ससोबत चुकीची भाषा वापरल्याच्या तक्रारी आल्यानंतर मस्क यांनी माफी मागितली होती. आता हा चॅटबॉट सामान्य लोकांच्या घराचे पत्ते, संपर्क क्रमांक आणि कुटुंबांची माहिती शेअर करत असल्याचे उघड झाले आहे. कोणत्याही व्यक्तीचा त्याच्या संमतीशिवाय डेटा सहज उपलब्ध केला जात असेल तर, ते अतिशय गंभीर आहे. त्यातून यूजर्ससोबत अनेक गैरव्यवहार झाल्याचे प्रकार होत असल्याचे उघडकीस येत आहे. सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणात नेमके काय झाले. मेटा आणि व्हॉट्सअ‍ॅपवर त्यांच्या गोपनीयता धोरणांसाठी अपिलीय न्यायाधिकरणाने २०२१ मध्ये ठोठावलेला २१३ कोटी रुपयांचा दंड सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवत या कंपन्यांची कानउघडणी केली. 'डेटा शेअरिंगच्या नावाखाली तुम्ही लोकांच्या गोपनीयतेच्या अधिकाराचे उल्लंघन करू शकत नाही. जर तुम्ही नियम आणि कायदे पाळू शकत नसाल, तर देश सोडून जा' अशा शब्दांत न्यायालयाने ताशेरे ओढले. सर्वसामान्यांच्या आयुष्याशी खेळणाऱ्या कंपन्यांना वठणीवर आणण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने केलेला प्रयत्न खरोखरच कौतुकास्पद आहे. व्हॉट्सअ‍ॅपच्या डेटा शेअरिंगच्या अटींवर न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. गोपनीयतेच्या अटी इतक्या हुशारीने तयार केल्या आहेत की, सामान्य माणसाला त्या समजू शकत नाहीत. लोकांची वैयक्तिक माहिती चोरण्याचा हा चांगला मार्ग कंपन्यांनी शोधला असला तरी न्यायालय हे होऊ देणार नाही, असे मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या खंडपीठाने बजावले. सामान्य वापरकर्त्यांना समजणार नाही, असे क्लिष्ट गोपनीयता धोरण तयार करून कंपन्या माहिती गोळा करतात .'डेटा शेअरिंग' हा खासगी माहितीची चोरी करण्याचा एक मार्ग आहे. डिजिटल युगात हे प्रकरण वापरकर्त्यांचा डेटा किती असुरक्षित आहे, हे दर्शवते याकडे न्यायालयाने लक्ष वेधले. व्यक्तीच्या वैयक्तिक माहितीबरोबरच उद्योगधंद्यासाठी 'डेटा' ही सर्वात मौल्यवान संपत्तींपैकी एक आहे. म्हणून, तो चोरण्याचे प्रकार सर्रास होऊ लागले आहेत. डेटा चोरी म्हणजे काय ? तर, डिजिटल स्वरूपात संग्रहित केलेली संवेदनशील माहिती अनधिकृतपणे मिळवणे, कॉपी करणे किंवा बाहेर काढणे. ती मिळविण्यासाठी, अपप्रवृत्तीच्या व्यक्ती त्यांच्याकडे असलेल्या विशेषाधिकारांचा गैरवापर करतात किंवा संगणक प्रणाली, नेटवर्क किंवा डिजिटल स्टोरेज उपकरणांमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी इतर मार्गांचा वापर करतात, हे सर्वोच्च न्यायालयातील ताज्या प्रकरणावरून पुन्हा एकदा जनतेच्या लक्षात आले आहे. पूर्वी मुलाला समजायला-उमजायला लागल्यानंतर सातव्या वर्षी शाळेत प्रवेश दिला जात असे. आताची पिढीही प्रगत पाहायला मिळते. मोबाइल फोन हाताळणे हा तीन वर्षांच्या मुलाला नुसते जमत नाही, तर सोशल मिडीयावरील अनेक अ‍ॅपची नावेही त्याला ठाऊक आहेत. नोकरी धंद्यांच्या ठिकाणी व्हॉट्सअ‍ॅपचा वापर सर्रास केला जातो.

## संस्कृत सुभाषित

मरणस्य मुते! राज्ञो जराधवलचामरा।
यात्रा जगति निर्याति स्वाधिव्याधिपताकिनी ॥

अर्थ : हे मुने, आधि व्याधींच्या उंच पताका आणि वार्धक्याच्या पांढऱ्या केसांच्या चवऱ्या ढळत आहेत. (आणि अशा तऱ्हेने) महाराज यमराजांची पालखी जगावर अविरत फिरत आहे.

## गुरु वचन

### भक्ती मार्ग सर्वोत्कृष्ट

विद्वानांनुसार, ईश्वर प्राप्तीचे तीन मार्ग आहेत – ज्ञान, कर्म व भक्ती. वास्तवात हेच ज्ञान आहे, ज्याद्वारे आपण ईश्वर कोण आहे? हे जाणतो. ज्ञान आपल्या मेंदूत साठवले जाते व याद्वारेच आपण ईश्वर प्राप्त करतो. मानवाचा मेंदु छोटा असतो, मग अशा स्थितीत तो ईश्वराला कसे जाणतो? हा प्रश्न निर्माण होतो. खरंतर मेंदूत असलेल्या ज्ञानातूनच हे शक्य होते. ज्ञानामुळे मन सुद्धा तृप्त होते. श्रीआनंदमूर्ती यांच्यानुसार, जोपर्यंत मानवात ज्ञानाची जाणीव असते तोपर्यंत त्याने ज्ञानार्जन करत राहिले पाहिजे. एका मर्यादेनंतर तुमच्या ज्ञान ग्रहण करण्याची भूख मिटते कारण तोपर्यंत तुमचे ध्येय ईश्वराला प्राप्त करणे असते.

काही विद्वानांनुसार, कर्मातूनच ईश्वर प्राप्ती होते कारण कर्म न करता मानव एक क्षण जिवंत राहू शकत नाही म्हणून आपण कर्म करत राहिले पाहिजे पण कर्म चांगले असायला हवेत. गीतेत श्रीकृष्णाने मानवास कुठल्याही फळाची अपेक्षा न करता कर्म करत राहण्याचा सल्ला दिला आहे. सांगण्याचे तात्पर्य म्हणजे धार्मिक व अध्यात्मिक जगतात जेवढी ज्ञानाला किंमत असते, तेवढीच कर्माची असते. विद्वान म्हणतात की, जर निर्मळ मनाने ईश्वराची भक्ती केल्यास ईश्वर प्राप्ती अवघड नाही. खरंतर भक्तीच एकमेव मार्ग आहे, ज्यावर मोठ–मोठ्या ज्ञानींनी वाटचाल केली आहे. आपण सर्व मानतो की, संपूर्ण चराचराची निर्मिती ईश्वरानेच केली आहे.

म्हणून जगातील प्रत्येक जीव परमात्म्याचीच संतान आहे. जर तुम्ही परमात्म्यास प्रसन्न करु इच्छित असाल तर प्रत्येक जीवाप्रती प्रेम–भाव बाळगा. यासाठी तुम्हाला मानव सेवा, समाज सेवा आणि निराधारांना आधार दिला पाहिजे. मानव सेवा करताना नेहमी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, हा सर्व खटाटोप ईश्वर प्राप्तीसाठी केला जात आहे. वास्तवात हीच भक्ती आहे. यामागे दुसरे कुठलेही कारण नाही. जर भक्तीभाव जागृत झाला तर तुम्हाला ईश्वर प्राप्तीचा मार्ग मिळाला, असे समजा.

## उपदेशकथा

### राम आणि मारुती

मारुती सीता शोध करून परत आला. सीतेची अवस्था ऐकून रामाचे अंत:करण भरून आले. राम मारुतीला म्हणाला, ‘हनुमन्ता ! माझ्यावर तुझे केवढे उपकार आहेत. या उपकाराची फ ेड मी कधी करू शकणार नाही.‘ रामाचे बोलणे ऐकून मारुती संकोचला आणि म्हणाला, ‘रामा, तू माझा स्वामी आहेस. अरे, माकडाची कमाल म्हणजे एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर उडी मारणे. तो मी माकड एवढा समुद्र उल्लंघन करून गेलो, लंका जाळली. रावणाची बाग उजाड केली. रामा यात माझा प्रताप नाही. ही सारी तुझी दिव्य शक्ती आहे. ज्याच्यावर तुझी कृपा होते त्याला जीवनात अशक्य काही नाही. ते निर्व्याज प्रेम तेवढे मला दे. रामासारखा कृतज्ञ मालक आणि हनुमंतासारखा कर्तेपणाचा अभिमान नसणारा सेवक दोघेही धन्य आहेत.

कथा उपदेश : मोठे लोक कधीही केलेल्या कार्याचे श्रेय स्वत: घेत नाहीत. नम्रतेने ते दुसऱ्याचे असल्याचे सांगतात.

## पंचांग



| | |
|---|---|
| पंचांग | २६:२९:१९+ |
| ११ फेब्रुवारी २०२५ | करण:गर ०९:५९:०० |
| बुधवार | करण:वणिज २३:१२:३१ |
| विक्रम संवत्– २०८२ | सूर्य:मकर |
| माघ शके संवत्– १९४७ | चन्द्र:वृश्चिक |
| संवत्सर – विश्वावसूनाम | हिजरी सन् – १४४६ |
| अयन– उत्तरायणारंभ | मुस्लिम मास – शाबान |
| मास– माघ | तारीख – २२ |
| ऋतु– सौर शिशिर | विशेष |
| कृष्ण पक्ष | श्री रामदास नवमी |
| तिथि:नवमी ०९:५९:०० | पारशी मेहेर मासारंभ |
| नक्षत्र:अनुराधा | वामन महाराज जन्मोतस्व– |
| १०:५२:३१ | सावनेर (अमरावती) |
| योग:व्याघात | |

## दै. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. ८५७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 8 | 3 | 4 | 6 | | | | |
| 4 | 7 | | | | 5 | 1 | | 9 |
| 5 | | | | | 3 | | 6 | 8 |
| | | | 2 | | 9 | 7 | | |
| 7 | | | 3 | | 8 | | | 4 |
| | | 2 | 7 | | 6 | | | |
| 1 | 9 | | 5 | | | | | 6 |
| 6 | | 5 | 1 | | | | 8 | 2 |
| | | | | 9 | 4 | 5 | 1 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८५६ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 4 | 5 | 3 | 2 | 1 | 7 | 6 |
| 6 | 5 | 1 | 7 | 4 | 9 | 2 | 3 | 8 |
| 2 | 3 | 7 | 8 | 1 | 6 | 4 | 9 | 5 |
| 3 | 6 | 9 | 2 | 8 | 4 | 5 | 1 | 7 |
| 5 | 1 | 2 | 9 | 7 | 3 | 8 | 6 | 4 |
| 4 | 7 | 8 | 6 | 5 | 1 | 3 | 2 | 9 |
| 9 | 2 | 5 | 3 | 6 | 8 | 7 | 4 | 1 |
| 7 | 4 | 3 | 1 | 9 | 5 | 6 | 8 | 2 |
| 1 | 8 | 6 | 4 | 2 | 7 | 9 | 5 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १६६२ – ९ महिने वेढा घातल्यावर चीनच्या सेनापती कॉक्सिंगाने तैवान जिंकले.
- १७९० – न्यूयॉर्कमध्ये अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाचे पहिले सत्र सुरू झाले.
- १७९३ – फ्रांसने नेदरलँड व युनायटेड किंग्डम विरुद्ध युद्ध पुकारले.
- १८१४ – फिलिपाईन्सच्या मेयोन ज्वालामुखीचा उद्रेक १,२०० ठार.
- १८६१ – अमेरिकन गृहयुद्ध – टेक्सास अमेरिकेपासून विभक्त झाले.
- १८८४ – ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीची पहिली आवृत्ति प्रकाशित.

### राष्ट्रीय

- १९५९ – भारतीय क्रिकेटपटू विनू मांकड यांनी दिल्लीत वेस्टइंडीज विरुद्ध शेवटचा कसोटी सामना खेळला.
- १९९२ – भोपाळच्या मुख्य न्यायाधीशांनी युनियन कार्बाइडचा मुख्य अधिकारी वॉरेन अँडरसनला फरारी घोषित केले.

### जन्म

- १८८२ – लुई स्टीवन सेंट लॉरें, कॅनडाचा १२वा पंतप्रधान यांचा जन्म.
- १९०१ – क्लार्क गेबल, अमेरिकन अभिनेता यांचा जन्म.
- १९३१ – बोरिस येल्त्सिन, रशियाचा अध्यक्ष यांचा जन्म.

### निधन

- १३९८ – चार्ल्स चौथा, फ्रांसचे राजे यांचे निधन.
- १५६३ – मेनास, इथियोपियाचा सम्राट यांचे निधन.
- १६९१ – पोप अलेक्झांडर आठवा यांचे निधन.
- १७३३ – ऑगस्टस दुसरा, पोलंडचे राजे यांचे निधन.
- १९०८ – कार्लोस पहिला, पोर्तुगालचे राजे यांचे निधन.

## : SMS :

1'Baar 300 Sarder Ship Me ja rahe the ?
ship dubi Nahi Firbi sab Mar Gaye?
Kaise?
?
?
Bich samunder Me Ship Bigad gai thi Saale dhakka dene Utar Gaye"..

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २८.५ | १५.१ |
| अहमदनगर | २७.९ | १६.५ |
| अकोला | ३०.५ | १६.६ |
| अमरावती | २९.५ | १६.१ |
| बीड | ३०.४ | १४.४ |
| भंडारा | २९.३ | १३.८ |
| बुलढाणा | २१.९ | १०.९ |
| चंद्रपूर | ३०.३ | १७.५ |
| चेन्नई | ३१.१ | २०.७ |
| नवी दिल्ली | २३.२ | ११.३ |
| धुळे | ३०.६ | १५.२ |
| गोंदिया | २८.३ | १३.७ |
| जळगाव | ३०.४ | १५.६ |
| कोल्हापूर | २९.५ | १४.९ |
| लातूर | २८.९ | १६.९ |
| मुंबई | २९.९ | २२.६ |
| नागपूर | २८.८ | १४.४ |
| नांदेड | २९.९ | १७.२ |
| नंदूरबार | २९.६ | १६.२ |
| नाशिक | २९.७ | १२.७ |
| पुणे | २९.२ | १३.९ |
| पंढरपूर | २९.३ | १७ |
| सातारा | ३० | ९.६ |
| सांगली | ३० | १६ |
| सोलापूर | २९.९ | १७.३ |
| वर्धा | ३० | १५.९ |

## आजचे राशिभविष्य



**मेष :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा: पश्चिम भागीदारी व्यवसायत फायदा होईल. अडचणी दूर होतील.

**तुळ :** शुभ रंग :केसरी, शुभ दिशा: पश्चिम योग्य परिश्रम घेतल्याने आपले काम सुरळीत पार पडणार आहे.

**वृषभ :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा: दक्षिण खूप प्रयत्न केले तरी कामात थोडेच यश मिळेल. कौटुंबिक चिंतेमुळे मन असमाधानी राहील.

**वृश्चिक :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:उत्तर नोकरीत इच्छेप्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याचे योग आहेत. कुटुंबात आनंदी वातावरण राहील.

**मिथुन :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: उत्तर नोकरीमधील कुशलतेमुळे फायदा मिळेल. शत्रुच्या कुटनितीपासून सावध रहा.

**धनु :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा: उत्तर व्यापारात प्रगतीचे योग आहेत. कलेविषयातील रूची वाढेल. प्रभावशाली व्यक्तींच्या भेटी होतील.

**कर्क :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: दक्षिण जीवनसाथीशी संबंध सुधारतील. कायद्याचा निकाल आपल्या बाजूने लागेल.

**मकर :** शुभ रंग : लाल : शुभ दिशा: पश्चिम आज आपली कार्यक्षमता वाढणार आहे. वहान सुख मिळेल. कुटुंबातील सदस्याची काळजी घ्या.


**सिंह :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम विनम्र होऊन कार्य केले तर प्रत्येक कामात यश मिळेल. मनासारखा फायदा होईल.

**कुंभ :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: दक्षिण कौटुंबिक वाद, मतभेद आपल्या प्रयत्नामुळे संपुष्टात येणार आहे. व्यावसायिक यशामुळे आनंदी रहाल.

**कन्या :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: दक्षिण मुलांच्या संबधातील कामात प्रगती राहील. मान सन्मान यश मिळेल. प्रिय व्यक्तिची भेट होण्याची शक्यता आहे.

**मीन :** शुभ रंग: काळा, शुभ दिशा: दक्षिण कामकाजात अडचणी आल्यामुळे आपल्याला चिंता लागणार आहे. आर्थिक स्थिती मध्यम राहील.

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. ८५७



### आडवे शब्द

१. '–––– मोरया, मंगलमूर्ती श्री गणराया' (लता मंगेशकर)
१०. मासा पकडण्याचे साधन
११. किंमत, १२. अभिनव
१४. एक रंगीत कंदमूळ
१५. दणकट, मजबूत
१७. विद्युल्लता
१८. पुळका, गहिवर, मूळ अर्थ झरा
१९. पुष्पदल
२१. रसाळ
२३. नवरा, पती
२५. सीतेच्या जुळ्या मुलातील एक
२६. काव, तांबडी माती
२८. सारखा
३१. एक छोटे चर्मवाद्य
३३. रणक्षेत्र
३६. अंत:करण
३८. पुष्कळ
४०. चित्रपटाचे संवाद
४१. पाठविलेला
४२. कलावंत
४५. शरीर
४६. आरोप
४७. निष्ठूर, दया नसलेला
४९. सबब
५०. पू.विनोबाजींनी लिहिलेले गीतेचे मराठी अनुवादित ाक
५२. सावली, प्रतिबिंब
५३. तात्पर्य
५६. एक श्वासरोग
५७. अजगर
५८. तंतोतंत जुळणारे
६०. आपला–परका अशी भावना
६३. दृष्टी, दृष्ट
६५. अति उंचीची दोन झाडे
६७. अटीची भाषा
६९. मुस्लिम प्रार्थना पद्धत
७१. पत्र
७३. लोकर, लव (इंग्रजी)
७४. शिजविलेले तांदूळ
७५. नूतन
७७. मस्ती, जोम
७८. घरोघरी पूर्वी मातीच्या असायच्या
८०. अर्धी ओंजळ
८२. सुका, वाळलेला
८४. न घडवलेले, न रूळलेले
८५. कहाणीतील गाव
८६. गुरांचे खाद्य

### उभे शब्द

१. ऐटदार चालीची स्त्री
२. पोलिस
३. गर्भाचे पोषण करणारी
४. तारण
५. मीठ
६. विधानसभेचा सदस्य
७. नमनीय
८. खूप लांब (अंतरावर)
९. जनतेचा कल आणि कौल
१३. खस
१५. फुलाची प्रथमावस्था
१६. कोवळ्या दुधाचा पदार्थ
१८. पार्वतीला शंकराने दिलेले नाव
२०. उन्हाचे तुकडे
२२. लाकडी जिना
२४. कोळिष्टक
२७. आईची वहीनी
२९. झकास
३०. अनुमती
३२. सडेतोड बोलणारा
३४. सुसर
३५. मुक्या प्राण्यांवरील प्रेम
३७. नकला करणारा
३८. रामबंधु
३९. मज्जाव, बंदी
४०. पाडाव, ऱ्हास
४३. कपडालत्ता
४४. हे दिवस ऋण काढून साजरे करू नयेत
४६. जननी, जन्म देणारी
४७. कीव, करुणा
४८. अत्यंत खालच्या दर्जाचा
५१. दिनांक
५३. वस्तू, माल
५४. ओंल, बीभत्य– –––– विचकट
५५. धन्यवादाचा शब्द
५७. नाविक दल
५९. वेल
६०. आमचा (बंगाली)
६१. चित्रपट
६२. मायभूमी, जमीन
६४. लोक, प्रजा
६६. छोटा डफ
६८. रविवासर
७०. जगन्माता
७२. पवित्र, शुद्ध
७६. तोटी
७८. उजेडासाठी पेटवलेली गवत इ.ची जुडी
७९. स्तुती करणारा
८१. लहान
८३. कावळा

### जम्बो शब्दकोडे क्र. ८५६ चे उत्तर

आडवे उत्तर : १.वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ ११.साय १२.गज १३.महिमा १४.विजार १५.जहरी १७.अमावस्या १९.दगा २१.चक्र २२.रमारम २३.सापट २५.रयतावा २७.खण २८.कवडीमोल २९.चर्च ३३.मदारी ३५.पंतप्रधान ३८.खास ४०.नतमस्तक ४२.गदा ४४.मोगरा ४५.पोळा ४६.वजन ४८.परसदार ५०.तत ५२.वामा ५४.राग ५६.परवा ५९.पाळ ६०.नत ६१.वरवर ६४.खसखस ६६.वाव ६७.माकड ६८.सेवा ६९.खडीसाखर ७०.कदरदान ७२.ललकार ७४.खीर ७५.दावा ७६.पाप ७७.पणती ७९.सातवडा ८१.मोर ८२.सकटनिकट ८३.रपेट ८४.ठाव

उभे उत्तर : १.वसा २.क्रयविक्रय ३.डगर ४.मज ५.कालहरण ६.सूर्य ७.कोनम ापक ८.समस्या ९.मही १०.प्रवास १५.जमाखर्च १६.रीम १७.असा १८.वटवट २०.गाठ २१.चरखा २४.समोरासमोर २६.तावदान ३०.अंत ३१.राधा ३२.सदरा ३४.रीतभात ३५.पंकज ३६.प्रथा ३७.नगरसेवक ३९.आपोआप ४१.स्तव ४३.दास ४७.नवा नवसाचा ४९.दानव ५१.तपास ५३.रात ५५.गजानन ५७.रखवालदार ५८.वास ६२.रडकथा ६३.रखरखीत ६५.खबर ६६.वाडी ६७.मारहाण ६८.सेल ६९.खटपट ७१.दारवठा ७३.कावा ७६.पाक ७७.पट ७८.तीर ७९.साट ८०.डाव

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### विश्वेश कुलकर्णी यांची आयसीएचआरएच्या सरचिटणीसपदी निवड



पुणे (दैनिक संध्या) : विश्वेश कुलकर्णी यांची इंटरनॅशनल कॉन्फिडरेशन ऑफ ह्युमन रिसोर्स असोसिएशन्स म्हणजेच आयसीएचआरए (ICHRA) च्या सरचिटणीसपदी निवड करण्यात आली आहे.नुकत्याच ट्युनिशियातील ट्युनिस येथे झालेल्या आयसीएचआरएच्या संचालक बैठकीत कुलकर्णी यांची एकमताने सरचिटणीसपदी निवड करण्यात आली. आयसीएचआरए ही मनुष्यबळ विकास क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील संघटना असून या आंतरराष्ट्रीय संघटनेशी जगभरातील सुमारे १२५ देशातील मनुष्यबळ व्यवस्थापन क्षेत्रातील संघटना, संस्था संलग्न आहेत. या देशांमधील विविध औद्योगिक कंपन्यांच्या मनुष्यबळ व्यवस्थापकांचे प्रश्न सोडवणे, मनुष्यबळ व्यवस्थापन क्षेत्राचे प्रश्न सामूहिक प्रयत्नातुन सोडवणे,जागतिक स्तरावर वेगाने बदलणाऱ्या मनुष्यबळ व्यवस्थापन क्षेत्रातील स्थित्यंतराविषयीच्या कार्यशाळा आयोजित करणे,या क्षेत्रातील सर्वोत्तम कामगिरी(बेस्ट प्रॅक्टिसेस)च्या माहितीविषयक सल्लामसलत करणे,आंतरराष्ट्रीय परिसंवाद आयोजित करणे,व्यवस्थापन कार्यशैलीच्या माहितीचे आदान-प्रदान करणे,मनुष्यबळ व्यवस्थापकांसाठी प्रादेशिक,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन करणे, विविध देशातील औद्योगिक व कामगार संबंधित कायदे याविषयी तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्यान सत्रे आयोजित करणे,मनुष्यबळ व्यवस्थापन क्षेत्राविषयीची संशोधन पत्रिका प्रकाशित करणे अशा विविध स्तरावर आयसीएचआरएचे कार्य चालते. आयसीएचआरएच्या वतीने आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (आयएलओ) संयुक्त राष्ट्रसंघ (युनो) या जागतिक स्तरावरील संस्थामध्ये मनुष्यबळ विकास विषयक अध्यासन मिळावे, यासाठी आवश्यक ते प्रयत्न करणे ही महत्वाची जबाबदारी सरचिटणीस पदावर निवड झालेल्या विश्वेश कुलकर्णी यांच्यावर सोपवण्यात आली आहे. विशेषतः जगभरातील विविध देशातील मनुष्यबळ व्यवस्थापन संस्था संघटनांची मोट बांधून त्यांची आयसीएचआरएशी संलग्नता करणे हे देखील महत्वाचे काम या सरचिटणीसपदाच्या कार्यकाळात करण्यात येणार आहे. विश्वेश कुलकर्णी हे गेल्या ४२ वर्षांपासून मनुष्यबळ व्यवस्थापन क्षेत्रात कार्यरत असून कौशल्य विकास प्रशिक्षणात देशात अग्रेसर असलेल्या 'यशस्वी' संस्थेचे कुलकर्णी हे संस्थापक आहेत. याआधी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सोनेल मॅनेजमेंट (एनआयपीएम) या भारतातील मनुष्यबळ व्यवस्थापकांच्या संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्षपद विश्वेश कुलकर्णी यांनी पाच वर्षे भूषवले आहे.

### तायक्वांदो चॅम्पियनशिपमध्ये आर. बी. होरांगी व सेंट फेलिक्स स्कूलचे नेत्रदीपक यश

पुणे (दैनिक संध्या) : चौथ्या ओपन नॅशनल तायक्वांदो चॅम्पियनशिपमध्ये आर. बी. होरांगी व सेंट फेलिक्स हायस्कूलच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. या स्पर्धेत फायट क्योरुगी, पूमसे, स्पीड किक, स्पीड पंच, जंप किक ब्रेकिंग, सेल्फ डिफेन्स व हापकिडो अशा विविध प्रकारांमध्ये खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन केले. एकूण ३५ सुवर्ण, ४० रौप्य व १५ कांस्य पदकांची कमाई केली. राष्ट्रीय पातळीवरील या स्पर्धेत महाराष्ट्रासह कर्नाटक, हरियाणा, गुजरात, आंध्रप्रदेश आदी राज्यांतून १३०० हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला. यावेळी पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक योगेश मुळीक, नारायण गलांडे, नगरसेविका श्वेता गलांडे व कविता गलांडे, सामाजिक कार्यकर्ते मारुती गलांडे व महेंद्र गलांडे, माजी नगरसेवक संदीप जारड, प्रमोद निम्हण, विनायक निम्हण, शंतनू गलांडे, उद्योजक विलास गलांडे, एकनाथ भंडारी, तिरुपती भंडारी व बसवराज भंडारी उपस्थित होते. तायक्वांदो क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या ग्रँड मास्टर्स व मास्टर्स यांच्या उपस्थितीने स्पर्धेला प्रोत्साहन मिळाले. श्री. दक्ष रमेश आढाव यांनी स्पर्धेसाठी मोलाचे सहकार्य केले. सरंग धोका, योगेश मुदलियार, श्रीनिवास केडगोंनी, आरती पासरकर, स्वाती भंडारी, राखी केडगोंनी, विनोद बांगर, गिरीश पाटील, वंदना बांगर, योगेश कुलकर्णी, राजेंद्र साळुंखे, विशाल गावते, दीपक कांगडे, संगीता कांगडे, वैभव नाईकवाडे, डॉ. पायल करखिले, डॉ. सुप्रिया कुलकर्णी, ब्रिजेट पाटील आदींनी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले. आर. बी. होरांगी व सेंट फेलिक्स स्कूलचे खेळाडू, प्रशिक्षक व पंच यांनी स्पर्धेत मोलाचे योगदान दिले. यशस्वी खेळाडूंचा सन्मान सेंट फेलिक्स स्कूलच्या वतीने प्रांतीय प्रमुख सिस्टर उर्सुला पिंटो, सिस्टर जेनिफर परेरा, स्कूल मॅनेजर सिस्टर रोझमेरी अल्मेडा, प्राचार्या लीना पॉल, सिस्टर एल्सा, तसेच बेला डी'सिल्वा, पी.टी. शिक्षिका सोनाली राजेभोसले व रुपाली बन्सोडे यांनी केला. संपूर्ण स्पर्धेचे आयोजन व खेळाडूंना मार्गदर्शन मास्टर रविंद्र भंडारी यांनी केले.

### पुण्यात ग्लोबल कपॅबिलिटी सेंटरची स्थापना

पुणे (दैनिक संध्या) : जागतिक स्तरावर पिगमेंट व रंगद्रव्ये उत्पादनातील अग्रगण्य असलेल्या सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लिमिटेड आणि प्रगत तंत्रज्ञान क्षेत्रातील जेनपॅक्ट या संस्थांच्या वतीने पुण्यात ग्लोबल कपॅबिलिटी सेंटरची स्थापना करण्यात आली आहे. सुदर्शन केमिकलचा जागतिक कार्यपद्धतीला अधिक सक्षम करण्यासाठी हे पाऊल महत्वपूर्ण ठरणार आहे. पुण्यातील बाणेर येथील सुदर्शन केमिकलच्या जागतिक मुख्यालयात स्थापन केलेल्या या केंद्राचे उद्घाटन नुकतेच झाले. या केंद्रात यापूर्वी विविध देशांत विभागून कार्यरत असलेली महत्त्वाची एंटरप्राइज कार्ये एकत्रित करण्यात आली आहेत. यामुळे विविध भौगोलिक क्षेत्रांतील समन्वय अधिक सुलभ होण्यासह प्रशासन, निर्णयप्रक्रिया आणि अंमलबजावणी अधिक प्रभावी होणार आहे. या केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी सुदर्शन केमिकलचे जागतिक अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राजेश राठी यांनी सांगितले, "जागतिक स्तरावर विस्तार करत असताना कार्यक्षमतेतील सातत्य आणि उत्कृष्ट अंमलबजावणी हे स्पर्धात्मक लाभ ठरतात. पुण्यातील हे ग्लोबल कपॅबिलिटी सेंटर प्रक्रियांची कार्यक्षमता वाढवेल, ग्राहकांना जलद व दर्जेदार सेवा देण्यास मदत करेल आणि संस्थेमध्ये सातत्यपूर्ण सुधारणा व ग्राहक-केंद्रित संस्कृती अधिक मजबूत करेल." २०२५ मध्ये जर्मनीतील ह्युबॅक ग्रुपच्या अधिग्रहणानंतर सुदर्शन केमिकलचा जागतिक विस्तार लक्षणीयरीत्या वाढला आहे.

# इंटरनॅशनल यंग शेफ ऑलिम्पियाड २०२६मध्ये अल्बानियाची मोहर

पुणे (दै. संध्या) :

- जगभरातील तरुण शेफ्स कोलकत्ता येथील एकाच मंचावर
- ४० हून अधिक देशांचा सहभाग; पाककलेच्या माध्यमातून एकता, नवकल्पना आणि संस्कृतीचा जागतिक उत्सव
- आर्टीफिशीअल इंटेलिजन्स (AI) च्या माध्यमातून जागतिक पाककला वारसा जतन करण्याचा संदेश



यंग शेफ ऑलिम्पियाड (YCO) २०२६ चा पडदा पडताना ही स्पर्धा केवळ स्पर्धा न राहता, एक जागतिक ज्ञान आणि शिक्षण परिसंस्था म्हणून पुढे आली. तंत्रज्ञान, नैतिकता, शाश्वतता आणि मानवी सर्जनशीलतेचा सुंदर संगम या मंचावर अनुभवता आली. "आर्टीफिशीअल इंटेलिजन्स (AI) च्या माध्यमातून जागतिक पाककला वारसा जतन करणे" ही संकल्पना स्वयंपाकघरांपासून चर्चांपर्यंत आणि विविध संस्कृतींमध्ये प्रत्यक्षात साकार झाली. या ऑलिम्पियाडच्या दृष्टीकोनावर बोलताना इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट (IIHM) चे संस्थापक-अध्यक्ष आणि यंग शेफ ऑलिम्पियाड (YCO) चे मुख्य मार्गदर्शक डॉ. सुबोर्णो बोस म्हणाले, "तुम्ही वेगवेगळ्या खंडांतून, संस्कृतींतून, हवामानांतून आणि खाद्यपरंपरांतून येथे आला होतात; मात्र तुम्ही एका मंचावर उभे राहिलात—एका समान भाषेने एकत्र आलेले, आणि ती भाषा म्हणजेच अन्न."

इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट (IIHM) संस्थेचे जागतिक मुख्यालय असलेल्या कोलकत्ता येते १२ व्या IIHM इंटरनॅशनल यंग शेफ ऑलिम्पियाड (YCO) २०२६ चा भव्य समारोप पार पडला. जगभरातील तरुण शेफ्सच्या सर्वात मोठ्या आणि प्रतिष्ठेच्या स्पर्धेचे यंदाचे पर्व कोलकात्यात यशस्वीरीत्या पूर्ण झाले.

जगातील सर्वात मोठ्या विद्यार्थी शेफ्सच्या मंचावर, कोलकात्याशी भावनिक नाते असलेल्या मदर तेरेसांच्या जन्मदेशातून आलेल्या अल्बानियाच्या तरुण शेफने इतिहास घडवला. इन्स्टिट्यूटी कुलिनारी नेरान्झी येथील एन्री क्युडारी याने सुवर्ण चषक उंचावत सुवर्ण मुकुट परिधान केले आणि जागतिक विजेतेपद पटकावले. या स्पर्धेत जगातील सर्वाधिक तरुण शेफ्स सहभागी झाले होते.

तसेच या मालिकेमध्ये इंग्लंड दुसऱ्या क्रमांकावर राहिला. वेस्टमिन्स्टर कॅपिटल सिटी कॉलेज येथील डॉमिनिक थॉमस ग्रंडी याला रौप्य चषक प्रदान करण्यात आले. श्रीलंका तिसऱ्या क्रमांकावर राहिला. कोलंबो अकॅडमी ऑफ हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट येथील विदानागामागे रुमिरा रेशान पियासिरी याने कांस्य चषक पटकावला. पुण्यात झालेल्या ऑलिम्पियाडच्या पहिल्या फेरीतील दमदार कामगिरीमुळे त्याचा अंतिम फेरीपर्यंतचा प्रवास अधिक भक्कम ठरला.

जगप्रसिद्ध पाककला परंपरा लाभलेल्या फ्रान्सच्या मेलिस हेलिन पॅरॉट हिने प्लेट ट्रॉफी जिंकली. डॉ. सुबोर्णो बोस चॅलेंज ट्रॉफी, दोन देशांतील शेफ्सना एकत्र येऊन एकच पदार्थ तयार करण्याची संधी देणाऱ्या आणि पाककलेचे माध्यमातून एकतेचा संदेश देणाऱ्या भावस्पर्शी स्पर्धेत, उझबेकिस्तानचा ओझोदबेक ओदिलॉव आणि तिमोर-लेस्तेचा मेलक्विरुडी लेकी-बेरे दा कुन्हा यांनी विजेतेपद पटकावले.

कोलकात्याच्या स्वच्छ रात्रीच्या आकाशाखाली, भावना, शिस्त आणि साकार झालेल्या स्वप्नांनी भारलेल्या क्षणांत सर्व स्पर्धकांनी यशाच्या शिखरावर झेप घेतली. ते केवळ विजेते म्हणून नव्हे, तर जागतिक पाककला नेतृत्वाच्या नव्या पिढीचे प्रतिनिधी म्हणून उभे राहिले. जगातील सर्वाधिक सहयोगात्मक आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध पाककला स्पर्धा म्हणून ओळख मिळवलेल्या या स्पर्धेत प्रत्येक विजेता आपल्या यशाचा खरा हकदार ठरला.

अंतिम स्पर्धात्मक फेऱ्या कोलकत्ता येथील इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट (IIHM) ग्लोबल कॅम्पसमध्ये पार पडली. त्यानंतर निक्को पार्क संकुलातील वेट-ओ-वाइल्ड येथे भव्य समारंभ आणि पारितोषिक वितरण सोहळा पार पडला. संगीत, नृत्य आणि उत्सवाच्या वातावरणात जगातील सर्वात मोठ्या विद्यार्थी शेफ्स स्पर्धेचा समारोप झाला.

जोमार टी. बर्नार्डो (फिलिपिन्स), विदानागामागे रुमिरा रेशान पियासिरी (श्रीलंका), आल्डी ङ शी चुआन (मलेशिया), कोटमसेट्टी सत्य तेजा (भारत), रोहन छेत्री (नेपाळ), डॉमिनिक थॉमस ग्रंडी (इंग्लंड), जॉर्जिओस आयओनिस (स्वीडन), एम्मा गिसेल बायरो (कॅनडा), एन्री क्युडारी (अल्बानिया) आणि अनन्या मदान (स्वित्झर्लंड) यांचा समावेश होता. कौशल्य, प्रामाणिकपणा आणि परंपरा व नवकल्पनांप्रती असलेल्या आदराच्या जोरावर त्यांनी अंतिम फेरीत स्थान मिळवले.

## तरूण खन्ना महादेवांची भूमिका साकारणार!

पुणे (दै. संध्या) :



एण्ड टीव्ही आगामी दिव्य ड्रॅमेडी 'हे भगवान - कितना बदल गया इन्सान!सह हलके-फुलके व निखळ मनोरंजन सादर करण्याप्रती आपले वचन अधिक दृढ करण्यास सज्ज आहे. उज्जैनच्या आध्यात्मिक पार्श्वभूमीवर आधारित या मालिकेमध्ये जीवनाचे सार दाखवणारे विनोद, भावनिक कथानक आणि काहीसा पौराणिक ट्विस्ट आहे. या अद्वितीय कथानकामध्ये मोहकतेची भर करत आहेत दिग्गज अभिनेता तरूण खन्ना, जे सखोलता व दिव्यतेसह पौराणिक भूमिका साकारण्यासाठी प्रसिद्ध आहेत. ते या नवीन मालिकेमध्ये महादेवांची प्रबळ व वंदनीय भूमिका साकारणार आहेत, जे विनोदी पद्धतीने दैनंदिन मानवी जीवनामध्ये देवत्वाचे महत्त्व दाखवतील.

ही दिव्य, पण उत्साहवर्धक मानवी भूमिका साकारण्याबाबत आपला आनंद व्यक्त करत तरूण खन्ना म्हणाले, "महादेवांची भूमिका साकारणे माझ्यासाठी अत्यंत आनंददायी आणि हृदयस्पर्शी अनुभव आहे. ही भगवान शिवची भूमिका मोहक, उत्साही आणि शांतपणे निरीक्षण करणारी आहे. ते विलक्षण मानवी वर्तन पाहून हसतात, तर कधी-कधी गोंधळून जातात. या भूमिकेला वेगळी ठरवणारी बाब म्हणजे संवाद साधण्याची पद्धत. ते कोडी, विनोद आणि सध्याच्या आजच्या पिढीला भावणारे संदर्भ, ज्यामुळे ही भूमिका आपलीशी वाटणारी व उत्साहवर्धक आहे, जी प्रेक्षकांना यापूर्वी कधीच पाहायला मिळालेली नसेल. ही हलकी-फुकली, अधिक उत्साही भूमिका साकारणे अत्यंत आनंददायी आहे, जेथे महादेव मानवांमध्ये वावरतात, त्यांना मार्गदर्शन करतात आणि स्वर्गातील आपल्या सहयोगींना मानवी रूपात आणतात. त्यांचे खरे अस्तित्व फक्त महेशला माहित असते. ते पुढे म्हणाले, "वास्तविक जीवनात मी शिवजींच्या तत्त्वाचे काटेकोरपणे पालन करतो. त्यांना भोलेनाथ म्हणून हाक मारली जाते, पण त्यांच्या निरागसतेमागे सखोलता व करुणा लपलेली आहे.

## सरहद स्वयंसेवी संस्थेला अहिंसा आणि शाकाहारासाठी पुरस्कार प्रदान

पुणे (दै. संध्या) :

- भगवान महावीर फाउंडेशनतर्फे दिल्या जाणाऱ्या महावीर पुरस्काराचे स्वरूप १० लाख रुपये रोख, स्तुतीपर मानपत्र आणि सन्मानचिन्ह
- अहिंसा व शाकाहार, शिक्षण, वैद्यकशास्त्र आणि समुदाय व समाज सेवा या क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या देशभरातील संस्थांमधून पुरस्कारविजेत्यांची निवड

पुरस्काराच्या चार प्रवर्गांमध्ये निस्वार्थ सेवा करणाऱ्यांकडून फाउंडेशनने ३० व्या महावीर पुरस्कारांसाठीही अर्ज मागवले आहेत. नामांकन अर्ज फाउंडेशनच्या वेबसाइटवरून डाउनलोड केले जाऊ शकतील: www.bmfawards.org.

उत्कृष्ट मानवतावादी सेवेची दखल घेण्याच्या उद्देशाने भगवान महावीर फाउंडेशनतर्फे दिला जाणारा २९वा महावीर पुरस्कार सरहद या पुणेस्थित सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक संस्थेला प्रदान करण्यात आला आहे. अहिंसा व शाकाहाराच्या समर्थनासाठी तसेच शिक्षण, सांस्कृतिक संवाद व जनसंवाद यांच्या माध्यमातून मानवतावादी मूल्यांना बढावा देण्यासाठी संस्थेने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीची दखल महावीर पुरस्कार २०२६ द्वारे घेण्यात आली आहे. अहिंसा व शाकाहार, शिक्षण, वैद्यकशास्त्र आणि समुदाय व समाज सेवा या क्षेत्रांमधील कामगिरीसाठी दरवर्षी महावीर पुरस्कार प्रदान केला जातो. प्रत्येक महावीर पुरस्कार विजेत्याला १० लाख रुपये रोख आणि त्यासोबत स्तुतीपर मानपत्र व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

श्री. संजय नहार यांनी १९९५ मध्ये स्थापन केलेली सरहद पंजाब, जम्मू-काश्मीर व ईशान्य भारत आदी भारतातील संघर्षप्रवण भागांमध्ये शांतता राखण्यासाठी तसेच राष्ट्रीय एकात्मतेसाठी समर्पित सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक संस्था आहे. शांततफेऱ्या, दोन धर्मांमधील संवाद, सांस्कृतिक उत्सव, शैक्षणिक उपक्रम, विद्यार्थी आदानप्रदान उपक्रम यांच्याद्वारे 'सरहद'ने विविध समुदायांमध्ये सौहार्द, विश्वास व परस्पर सामंजस्य जोपासले आहे. त्याचबरोबर संघर्षप्रवण प्रदेशांतील विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक व निवासी सहाय्यही संस्थेतर्फे पुरवले जाते.

सरहद संस्थेसोबतच पुढील संस्थांना २९व्या महावीर पुरस्काराने गौरवण्यात आले: कॉर्ड, हिमाचल प्रदेश, शिक्षण; श्री शंकरा कॅन्सर फाउंडेशन, कर्नाटक, वैद्यकशास्त्र; आणि श्रीमती संगखुमी बुआलचुआक, मिझोराम व निर्माण, ओडिशा, समुदाय व सामाजिक सेवा.

भगवान महावीर फाउंडेशनचे संस्थापक श्री. सुगलचंद जैन यावेळी म्हणाले, "सरहद संस्थेने अहिंसा व मानवतावादी मूल्यांचे चैतन्य कृतीत उतरवण्याचे उदाहरण घालून देण्याजोगे कार्य केले आहे. संवाद, शिक्षण व नीतीमत्तापूर्ण सहभाग समाज परिवर्तनात किती महत्त्वाची भूमिका बजावू शकतात हे 'सरदह'च्या कामातून दिसून येते. शांतता व सौहार्दाचा प्रसार करण्यासाठी 'सरहद'ने केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा सन्मान करताना आम्हाला आनंद होत आहे. या पुरस्काराच्या रूपाने मिळालेली मान्यता 'सरहद'चे उद्दिष्ट आणखी दृढ करण्यात तसेच अन्य अनेकांना प्रेरणा देण्यात उपयुक्त ठरेल, अशी आशा आम्हाला वाटते."

२०२६ सालासाठी प्रदान केल्या गेलेल्या पुरस्कारांनंतर महावीर पुरस्कार प्राप्त करणाऱ्यांची संख्या १०१ झाली आहे. हे १०१ पुरस्कारविजेते २६ राज्ये व २ केंद्रशासीत प्रदेशांतील आहेत. २९व्या पुरस्कारांपूर्वी महावीर पुरस्कार प्राप्त करणाऱ्यांची संख्या ९६ होती. गेल्या अनेक वर्षांपासून महावीर पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान केले जात आहेत. यांमध्ये भारताचे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राज्यांचे राज्यपाल, मुख्यमंत्री तसेच केंद्रीय मंत्री यांचा समावेश आहे. औपचारिक सोहळ्यांमध्ये हे पुरस्कार प्रदान केले जातात.

२९व्या महावीर पुरस्कारासाठी देशभरातून आलेल्या २६७ नामांकन अर्जांचे मान्यवरांच्या परीक्षण मंडळाद्वारे काळजीपूर्वक मूल्यमापन करण्यात आले. भारताचे माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती श्री. एम. एन. वेंकटचलय्या यांच्या अध्यक्षतेखालील समितीने यंदा ही जबाबदारी पार पाडली. ज्येष्ठ संन्यासिनी आचार्य श्री. चंदनाजी महाराज, माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती डॉ. श्री. डी. वाय. चंद्रचूड, भारतीय रिझर्व बँकेचे अंशकालीन संचालक तसेच 'तुघलक'चे संपादक श्री. एस. गुरूमूर्ती, भारतीय विद्या भवन मंगलगुरू केंद्राचे चेअरमन प्राध्यापक बी. एम. हेगडे, भारताचे माजी मुख्य निवडणूक आयुक्त श्री. टी. एस. कृष्णमूर्ती, निवृत्त आयएएस अधिकारी तसेच सेबीचे माजी अध्यक्ष श्री. डी. आर. मेहता, भारत सरकारचे माजी कॅबिनेट सचिव श्री. प्रभात कुमार (निवृत्त आयएएस अधिकारी) आणि सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती श्री. जी. एस. सिंघवी यांचा परीक्षण मंडळावर समावेश होता.

## झी टीव्हीवरील कलाकार या 'व्हॅलेंटाइन डे' ला साजऱ्या करत आहेत प्रेमरंगाच्या सर्व छटा!

पुणे (दै. संध्या) :



'व्हॅलेंटाइन डे' म्हणजे केवळ रोमँटिक प्रेमाचा उत्सव नाही; तर आपल्या आयुष्यात प्रेम किती वेगवेगळ्या रूपांत असते याची आठवण करून देणारा दिवस आहे. शांत साथ, खोल भावनिक नाती, आपल्या घरी असल्यासारखे वाटावे अशा मैत्री आणि काळासोबत अधिक घट्ट होत जाणारे संबंध यातील प्रेम हे अगदी आपण रोज पाहत आणि अनुभवत असलेल्या कथांप्रमाणेच सतत बदलत आणि विकसित होत असते. टेलिव्हिजनने वर्षानुवर्षे या भावना अतिशय सुंदररीत्या मांडल्या आहेत आणि वास्तविकतेशी जोडलेल्या, मनाला भिडणाऱ्या आणि आपल्याशा वाटणाऱ्या प्रेमकथा लाखो घरांपर्यंत पोहोचवल्या आहेत. वास्तविकतेतील भावना आणि नातेसंबंध प्रभावीपणे मांडणाऱ्या कथा सादर करण्यासाठी ओळखली जाणारी झी टीव्ही ही वाहिनी प्रामाणिकपणे प्रेम साजरे करणाऱ्या आपल्या मालिकांमधून प्रेक्षकांच्या मनाला सातत्याने भिडत आहे. परिपक्व नाती, हळूवारपणे फुलणाऱ्या प्रेमकथांपासून ते उत्कट प्रेम आणि भावनिक प्रवासापर्यंत या कथा प्रेक्षकांना हेच सांगतात की प्रेम नेहमी परिपूर्ण असेलच असे नाही, पण ते नेहमीच प्रभावी आणि शक्तीशाली असते. या 'व्हॅलेंटाइन डे' निमित्त 'लक्ष्मी निवास'मधील मानसी जोशी रॉय, 'तुम से तुम तक'मधील निहारिका चौक्सी, 'जगद्धात्री'मधील सयंतानी घोष, 'जाने अनजाने हम मिले'मधील आयुषी खुराणा, 'गंगा माई की बेटियाँ'मधील अमनदीप सिद्धू आणि 'वसुधा'मधील अभिषेक शर्मा हे कलाकार प्रेम, नाती आणि व्हॅलेंटाइन डे चा त्यांच्यासाठी काय अर्थ आहे याबद्दल आपले विचार मांडत आहेत. 'लक्ष्मी निवास' या मालिकेत लक्ष्मीची भूमिका साकारणाऱ्या मानसी जोशी रॉय म्हणाल्या, "व्हॅलेंटाइन डे बाबत माझे मत थोडे वेगळे आहे. मला वाटतं की हा एक प्रकारचा 'हॉलमार्क हॉलिडे' आहे. लहानपणी मीही त्याच्या गाजावाजाला भुलले होते, पण जसजशी मोठी झाले, तसं मला अशा प्रेमाचं महत्त्व कळलं जे खास दिवशी दाखवण्याऐवजी दररोज सोबत असतं. माझा व्हॅलेंटाइन माझ्यासाठी असंच प्रेम व्यक्त करतो. आमच्यात रोहित हा नक्कीच जास्त रोमँटिक आहे आणि तो नेहमीच मोठी रोमँटिक सरप्राइजेस देत असतो आणि ते मला खूप आवडतं. त्यामुळे मला असं वाटतं की प्रेम हे फक्त खास दिवशीच नाही, तर दररोज, प्रत्येक क्षणी साजरं केलं पाहिजे." 'तुम से तुम तक' या मालिकेत अनुची भूमिका साकारणाऱ्या निहारिका चौक्सीने सांगितले,

"तुम से तुम तकमधील प्रेमकथा सध्या खूप खास टप्प्यावर आली आहे आणि आर्य व अनु यांच्यातील नुकतेच झालेले प्रपोजल तो भाव सुंदररीत्या दाखवतो. या प्रेमकथेबद्दल मला सर्वांत जास्त आवडतं ते म्हणजे ही घाईघाईने किंवा दिखाऊपणे पुढे जात नाही. ही कथा विश्वास, संयम आणि भावनिक खोलपणावर उभी आहे. ही मालिका प्रेमाचं अत्यंत रोमँटिक रूप साजरं करत असली, तरी खऱ्या आयुष्यात मला माझ्या मैत्रिणींसोबत 'व्हॅलेंटाइन डे' साजरा करायला खूप आवडतो. माझ्यासाठी प्रेम म्हणजे फक्त रोमांस नाही; तर तुमच्यासोबत हसणाऱ्या, तुम्हांला उभारी देणाऱ्या आणि प्रत्येक परिस्थितीत सोबत असलेली मैत्रीसुद्धा प्रेमाचाच एक भाग आहे.

# ड्रोवीच्या राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेच्या दुसऱ्या पर्वामध्ये होणार चिमुकल्या स्वप्नांची रंगीबेरंगी उधळण

पुणे (दै. संध्या) :



पहिल्या पर्वाला लहान मुलांकडून भरभरून मिळालेल्या प्रतिसादानंतर, ड्रोवी पुन्हा सज्ज आहे चिमुकल्यांच्या पसंतीस पडलेल्या राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेचे दुसरे पर्व म्हणजेच सीझन २ घेऊन येण्यासाठी. यानिमित्ताने त्यांना आपल्या मुक्त छंद विचारातून आणि कलेच्या माध्यमातून आपली कलाकृती साकारण्याची आणि व्यक्त होण्याची संधी मिळणार आहे. मागील वर्षाप्रमाणे यावर्षीच्या स्पर्धेची थीम आहे "Bored? Good! Ideas Flood!". याच थीमच्या सहाय्याने 'ड्रोवी बॉय' म्हणजेच, ड्रोवी या ब्रँडच्या खेळकर अशा मॅस्कॉटसोबत चिमुकल्यांना विविध रंगांच्या माध्यमांतून मनावरची मरगळ झटकून टाकण्यासाठी आणि कंटाळवाणी दिनचर्या मजेदार बनवण्याची संधी मिळणार आहे. या स्पर्धेचे महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये जसे की मुंबई, पुणे, संभाजी नगर, कोल्हापूर, सोलापूर, अकोला, अमरावती, नागपूर, नाशिक आणि सातारा इथे आयोजन केले जाणार आहे. यासोबतच मध्य प्रदेशातील इंदूर, रतलाम, खंडवा तसेच निजामाबादसारख्या इतर शहरांमध्येही याचे आयोजन करण्यात येणार आहे. या शहरांतील नामांकित बालरोगतज्ज्ञांच्या सहयोगाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार असून त्यांचा सक्रिय पाठिंबा या स्पर्धेला असणार आहे. या आयोजनात संबंधित शहरांतील नामांकित बालरोगतज्ज्ञ सहकार्य करत असून ते पुरस्कार वितरणासाठी परीक्षक आणि प्रमुख अतिथी म्हणून सहभागी होणार आहेत.

ही स्पर्धा दोन वयोगटांसाठी खुली आहे – १ ते ७ वर्षे आणि ७ ते १३ वर्षे. या स्पर्धेचे विषय प्रत्येक वयोगटानुसार विचारपूर्वक ठरवलेले आहेत ते खालीलप्रमाणे.

१ ते ७ वर्षांच्या मुलांसाठीचे विषय: या वयोगटातील मुलांना सोप्या आणि आनंददायी प्रसंगांवर चित्र काढायला सांगितले जाईल, जसे की

- ड्रोवी आणि मी – आमच्या आवडत्या पाळीव प्राण्यासोबत
- ड्रोवी आणि मी – आमचे आवडते फळ खाताना
- माझ्या शाळेतील एक शिक्षक- ड्रोवी

७ ते १३ वर्षांच्या मुलांसाठीचे विषय: या वयोगटातील मुलांना कल्पक आणि सर्जनशील जगाची कल्पना करायला प्रोत्साहन दिले जाईल, जसे की

- ड्रोवी आणि मी – अवकाशात
- ड्रोवी आणि मी – आजीला मदत करताना
- ड्रोवी आणि मी – दोन सुपरहिरो रस्त्यावरील प्राण्यांना मदत करताना

विजेते तीन विभागांमधून निवडले जातील. प्रत्येक विभागात प्रत्येक वयोगटातून पहिल्या तीन क्रमांकांना बक्षिसे दिली जातील.

बक्षिसांचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे:

विजेता: २१०० रुपये + सुवर्णपदक + प्रमाणपत्र

प्रथम उपविजेता: १५०० रुपये + रौप्यपदक + प्रमाणपत्र

द्वितीय उपविजेता: १००० रुपये + कांस्यपदक + प्रमाणपत्र

प्रत्येक स्पर्धकाला त्यांच्या प्रयत्नांबद्दल आणि सर्जनशीलतेबद्दल स्पर्धेतील सहभागाचे ई-प्रमाणपत्र दिले जाईल. स्पर्धेची अंतिम तारीख 20 फेब्रुवारी 2026 असून, निकाल 28 फेब्रुवारी 2026 रोजी जाहीर करण्यात येतील. इच्छुक स्पर्धक आपला सहभाग बालरोगतज्ज्ञांच्या दवाखान्यांमधून, रिटेल आउटलेट्समधून किंवा क्यूआर कोडद्वारे ऑनलाइन नोंदवू शकतील. स्पर्धक नोंदणी प्रक्रियेची माहिती मिळवण्यासाठी आणि आपला सहभाग नोंदवण्यासाठी खाली दिलेला क्यूआर कोड स्कॅन करा किंवा व्हाट्सअॅप वर 9930031582 या क्रमांकावर "Hi" असा मेसेज पाठवा.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## 'फॉर्म्युला भारत'मध्ये 'एमआयटी एडीटी' विद्यापीठाचे दैदिप्यमान यश

■ यांत्रिकी अभियांत्रिकी विभागाच्या 'टीम स्पीडटेल रेसिंग'ने जिंकले विजेतेपद

पुणे (दैनिक संध्या) : एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणेच्या यांत्रिकी अभियांत्रिकी विभागाच्या (मेकॅनिकल) 'टीम स्पीडटेल रेसिंग'ने तामिळनाडूतील कोईम्बतूरच्या कारी मोटर स्पीडवेवर नुकत्याच पार पडलेल्या 'फॉर्म्युला भारत २०२६ (डायनॅमिक्स)' या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत कंबशन प्रकारात 'ओव्हरऑल डायनॅमिक्स' विजेतेपद पटकावले. या स्पर्धेत संघातील अभिषेक साहा याने उत्कृष्ट वाहनचालन कौशल्य व तांत्रिक प्रावीण्याच्या जोरावर 'सर्वोत्तम चालक पुरस्कार' मिळवला. वाहन रचना, गतिशास्त्र तसेच अभियांत्रिकी नवकल्पनांतील प्रावीण्याच्या बळावर संघाने हे यश संपादन केले. फॉर्म्युला भारत २०२६ (डायनॅमिक्स) ही भारतातील अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठीची एक प्रतिष्ठित राष्ट्रीय स्तरावरील मोटरस्पोर्ट स्पर्धा आहे. यात देशभरातील महाविद्यालयीन संघ स्वतः डिझाइन व तयार केलेल्या फॉर्म्युला-शैलीतील रेस कार्स सादर करतात. या यशात एरोस्पेस, इलेक्ट्रॉनिक्स विभाग तसेच इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन (आयओडी) मधील विद्यार्थ्यांचाही सक्रिय सहभाग असून, विविध शाखांतील समन्वयाचे प्रभावी दर्शन घडले. संपूर्ण संघाला डॉ.अनुराग नेमा आणि प्रा. विजयकुमार शेप यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल एमआयटी एडीटी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष तथा कुलपती प्रा.डॉ.विश्वनाथ दा.कराड, कार्याध्यक्ष तथा प्र.कुलपती प्रा.डॉ.मंगेश कराड, कार्यकारी संचालक डॉ. सुनीता कराड, कुलगुरु डॉ. राजेश एस., प्रोवोस्ट डॉ. सायली गणकर, प्र.कुलपती डॉ. रामचंद्र पुजेरी, डॉ.नचिकेत ठाकूर, कुलसचिव डॉ.महेश चोपडे, अभियांत्रिकी शाखेचे अधिष्ठाता डॉ. सुदर्शन सानप, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ.सुराज भोयार यांनी विशेष कौतुक केले.



## जिल्हा परिषद निवडणुकीतही देवेंद्र - रविंद्र

पुणे (दैनिक संध्या) : राज्यातील तिसऱ्या टप्प्यातील निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर सर्वाधिक जागा पटकाविण्यात पुन्हा एकदा भारतीय जनता पक्षाने बाजी मारली आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत भाजपाने महायुतीतील सहकारी पक्षांपेक्षा आणि मविआ आघाडी पक्षांपेक्षा अधिक जागा जिंकून राज्यातील जनतेचा कौल आपल्यालाच आहे हे परत सिद्ध केले. या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण हीच राजकारणातील आजची जोडी नं. 1 असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आणि रविंद्र चव्हाण यांच्या नियोजनाच्या बळावर भारतीय जनता पक्षाने राज्यात सर्वाधिक जागा मिळविण्याची अनोखी हॅटट्रिक प्राप्त केली आहे. नोव्हेंबरमध्ये झालेल्या नगर परिषद निवडणूका, त्यानंतर जानेवारीत झालेल्या महानगरपालिका निवडणुका आणि या फेब्रुवारी महिन्यातील जिल्हा परिषद निवडणुकीत देवेंद्र आणि रविंद्र या राजकीय पॉवरफुल जोडीने अचूक निवडणूक नियोजन, प्रभावी प्रचार यंत्रणा पद्धती, स्थानिक पातळीवरील पक्षासोबत राज्य पातळीवरील पक्षाचा थेट संवाद आणि समन्वय अशा विविध माध्यमातून भाजपाला उच्च दर्जाची सक्षम पक्ष यंत्रणा उभारली. त्यामुळे स्थानिक नेतृत्वाला शीर्षस्थ नेतृत्वाचा वरदहस्त लाभला आणि धाकही जाणवला. याचा सकारात्मक परिणाम होऊन पक्षाने अनेक ठिकाणी अत्यंत आश्चर्यकारक आणि धक्कादायक विजय नोंदवले. या यशाचे मुख्य शिल्पकार देवेंद्र फडणवीस तर सूत्रधार रविंद्र चव्हाण हे आहेत हे निर्विवादपणे म्हणावे लागेल. रविंद्र चव्हाण यांना निवडणूक सिद्ध नेता म्हणून ओळखले जाते. ते जमिनीवर वावरणारे आणि कार्यकर्त्यात रमणारे प्रदेशाध्यक्ष आहेत. निवडणुकीत अत्यावश्यक असणारे साम दाम दंड भेद वापरताना विचारधारेच्या धाग्याने कार्यकर्त्यांना आणि मतदारांना जोडणारे असे त्यांचे नेतृत्त्व आहे म्हणूनच दिल्ली आणि नागपूर दोन्ही सत्ताकेंद्रांशी त्यांचा घनिष्ठ संबंध आहे. त्याच बरोबर त्यांना देवेंद्र फडणवीस यांचा पाठिंबा आणि सहकार्य कायम मिळतच असते.




## विद्यार्थ्यांनी संविधानाचा सखोल अभ्यास करावा - प्राचार्य किशोर भागवत

नारायणगाव (दैनिक संध्या) : हुतात्मा राजगुरू शिक्षक प्रसारक मंडळाचे सरसेनापती हंबीरराव मोहिते विधी महाविद्यालय, राजगुरुनगर राष्ट्रीय सेवा योजना विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने शाश्वत विकासासाठी युवक : पाणलोट आणि पडीक जमीन व्यवस्थापन या उपक्रमांतर्गत विशेष श्रमसंस्कार शिबिर दि. ०६ फेब्रु ते १२ फेब्रु २०२६ याकाळात जि.प.प्राथमिक शाळा वरची भांबुरवाडी येथे संपन्न होत आहे. या यानिमित्ताने रविवार (दि. ०८) रोजी प्राचार्य किशोर भागवत यांनी 'भारतीय संविधानाचा इतिहास' याविषयावर मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य भागवत म्हणाले की, संविधानाच्या इतिहासाचा पाया इंग्रजांच्या ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रशासकीय संरनेपासून सुरू झाला. भारतीय संविधान हे फक्त मसुदा किंवा पुस्तक नसून ते भारतीय लोकशाहीच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, कायदेविषयक गोष्टी यात नमूद आहे. कायद्याच्या विद्यार्थ्यांनी कायदे समजून घेताना संविधानाचा इतिहास सखोलपणे अभ्यासणे आवश्यक आहे. यानिमित्ताने प्राचार्य किरण शिंदे, एन.एस.एस चे कार्यक्रम अधिकारी संदीप तायडे, प्रा.सोनाली वाडेकर, प्रा. अभिजित वैद्य, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी गणेश काशीद, संदीप जाधव, अशफाक पटेल, नवीन सोनवणे, कोमल औटी, सनोबर शेख, साहिल खरात, यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले व हुतात्मा राजगुरू यांच्या प्रतिमेचे पूजन करून राष्ट्रीय सेवा योजना गीताने करण्यात आली तर समारोप पसायदानाने करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप जाधव यांनी केले तर आभार अशफाक पटेल यांनी मानले.

# भारतीय वारसा हीच आपली खरी ओळख

## 'हेरिटेज यात्रा २०२६'चा मुकेश शर्मा यांच्या उपस्थितीत दिमाखदार समारोप

पुणे (दै. संध्या) :

"भारतीय कला आणि संस्कृतीचा वारसा हा केवळ इतिहास नसून तो आपल्या प्रगत भविष्याचा पाया आहे," असे प्रतिपादन फिल्म्स विभागाचे माजी महासंचालक डॉ. मुकेश शर्मा यांनी केले.

पुणे महानगरपालिका आणि एमआयटी आर्ट, डिझाइन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ (एडीटी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'हेरिटेज यात्रा २०२६'चा समारोप पु. ल. देशपांडे कलाग्राम येथे उत्साहात पार पडला. या प्रसंगी एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या प्रोवोस्ट प्रा. डॉ. सायली गणकर, प्र. कुलपती डॉ. नचिकेत ठाकूर, अधिष्ठाता डॉ. माधवी गोडबोले, डॉ. प्रिया सिंग आणि डॉ. अश्विनी पेठे यांची प्रमुख उपस्थिती होती.




यावर्षीच्या महोत्सवाला पुणेकरांनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी दररोज सुमारे २,००० पर्यटकांनी नोंदणी करून या महोत्सवाला भेट दिली. एकूण २२ शाळांच्या विद्यार्थ्यांनी या महोत्सवात सक्रिय सहभाग नोंदवला. महोत्सवादरम्यान रील मेकिंग, वादविवाद, निबंध लेखन आणि श्लोक पठण अशा विविध स्पर्धा पार पडल्या. तसेच हस्तकला विभागात पारंपरिक विटांची भिंत तयार करणे, वारली चित्रकला आणि मातीकाम अशा कार्यशाळांमधून विद्यार्थ्यांनी भारतीय कलांचे बारकावे शिकून घेतले. अत्यंत कल्पकतेने डिझाइन केलेल्या 'हेरिटेज प्लेलँड'मध्ये विद्यार्थ्यांना खेळता-खेळता इतिहासाची सफर घडली. यामध्ये प्रामुख्याने 'महामिस्टरी', 'डार्ट अँड डिस्कव्हर' आणि महाराष्ट्रासाठी स्वतःच्या 'चलनाची रचना करणे' यांसारख्या उपक्रमांचा समावेश होता. डॉ. मुकेश शर्मा यांनी आपल्या भाषणात हिंदीतून संवाद साधत तरुणांना मार्गदर्शन केले. त्यांनी भारतीय वारशाचे मूल्य समजून घेणे आणि तो पुढील पिढीसाठी जतन करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. या सोहळ्यात विविध स्पर्धांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विश्वकर्मा ज्युनिअर कॉलेजने सलग दुसऱ्या वर्षी सहा पुरस्कार पटकावत आपले वर्चस्व राखले.

### स्पर्धेत विश्वकर्मा कनिष्ठ महाविद्यालयाचे वर्चस्व

या सोहळ्यात विविध स्पर्धांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विश्वकर्मा ज्युनिअर कॉलेजने सलग दुसऱ्या वर्षी सहा पुरस्कार पटकावत आपले वर्चस्व राखले. वादविवाद स्पर्धेत विश्वकर्मा कनिष्ठ महाविद्यालयाच्या सार्थक भारेकरने, काव्यवाचन स्पर्धेत लोणी-काळभोर येथील एमआयटी व्हीजीएसच्या सान्वी मिश्राने, निबंध स्पर्धेत विश्वकर्मा कनिष्ठ महाविद्यालयाच्या अभिषेक रामकिशन जाट, सोनाली राहुल कास्के आणि यश राहुल देशमुख यांनी प्रथम क्रमांक मिळवला. श्लोक पठण स्पर्धेत विश्वकर्माच्या भार्गवी बिराजदारने, तर श्लोक लेखन स्पर्धेत अहिल्यादेवी हायस्कूलच्या रेणुका कुलकर्णीने प्रथम क्रमांक पटकावला.

## ब्रेस्ट कॅन्सरच्या जागरूकतेसाठी 'सुता'देखील 'पिंक टॅग' उपक्रमात सहभागी

मुंबई (दै. संध्या) :

'फेडरल बँक होर्मिस मेमोरियल फाऊंडेशन' आणि 'नेटवर्क-एटीन संजीवनी' यांच्या 'पिंक टॅग प्रोजेक्ट'मध्ये आता देशांतर्गत डी-टू-सी फॅशन ब्रँड 'सुता' सहभागी झाला असून, ब्लाउजवरील वॉश-केअर लेबलजवळ शिवलेल्या साध्या गुलाबी टॅगद्वारे महिलांना स्वतःची स्तन तपासणी कशी करावी याबाबत सौम्य व भीतीमुक्त मार्गदर्शन दिले जात आहे; ग्रामीण शिंपी, स्वयंसेविका आणि समुदायाच्या सहभागातून सुरू झालेली ही कल्पना आता फॅशनच्या मुख्य प्रवाहात येत लाखो महिलांपर्यंत आरोग्यजागरूकतेचा संदेश पोहोचवत आहे, विशेषतः भारतात दर चार मिनिटांनी एका महिलेला स्तनाच्या कर्करोगाचे निदान होत असताना आणि ७० टक्क्यांहून अधिक प्रकरणांमध्ये उशिरा निदान होत असताना; 'सुता'च्या सह-संस्थापिका सुजाता बिस्वास व तानिया बिस्वास यांनी कपड्यांद्वारे ओळख, आत्मविश्वास




आणि स्वतःची काळजी यांचा संगम घडवण्याचा उद्देश व्यक्त केला असून, न्यूज-एटीन स्टुडिओजचे सीओओ सिद्धार्थ सैनी आणि फेडरल बँकेचे चीफ मार्केटिंग ऑफिसर एम.व्ही.एस. मूर्ती यांनी या उपक्रमामुळे माध्यमे, उद्योग आणि समाज एकत्र येऊन सार्वजनिक आरोग्याबाबत दीर्घकालीन सकारात्मक बदल घडवू शकतात, असा विश्वास व्यक्त केला आहे.

## SportsSkill Ladderला लीड गुंतवणूक; सामुदायिक खेळांसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म

### निरव मोदी यांचा पाठिंबा; खेळाडूंना स्पर्धेसाठी 'लॅडर सिस्टीम'वर आधारित मंच

पुणे/मुंबई (दै. संध्या) :

देशभरातील सामुदायिक आणि मनोरंजनात्मक खेळ अधिक संघटित करण्याच्या उद्देशाने SportsSkill या क्रीडा-तंत्रज्ञान कंपनीने आपल्या नव्या उपक्रम SportsSkill Ladder साठी लीड गुंतवणूक मिळाल्याची घोषणा केली आहे. ही गुंतवणूक कंपनीचे विद्यमान गुंतवणूकदार आणि उद्योजक निरव मोदी यांनी केली आहे. याचबरोबर SportsSkill Ladder या डिजिटल प्लॅटफॉर्मचा बीटा टप्प्यात शुभारंभ करण्यात आला आहे.

SportsSkill Ladder हा खेळाडू, क्लब आणि स्थानिक गटांसाठी तयार करण्यात आलेला प्लॅटफॉर्म असून, लॅडर-आधारित रँकिंग सिस्टीमच्या माध्यमातून खेळाडूंना नियमित आणि पारदर्शक स्पर्धा उपलब्ध करून देतो.

विद्यमान गुंतवणूकदाराचा वाढता सहभाग

निरव मोदी हे सुरुवातीपासून SportsSkill शी जोडलेले असून, आता त्यांनी आपल्या गुंतवणुकीत वाढ करत SportsSkill Ladder मध्ये लीड इन्व्हेस्टर म्हणून सहभाग नोंदवला आहे. SportsSkill Ladder ही स्वतंत्र LLP म्हणून नोंदणीकृत असून, विविध खेळांमध्ये क्रीडा समुदाय उभारण्यावर लक्ष केंद्रित करणार आहे.

सध्या भारतात सुमारे ३० कोटी लोक नियमितपणे खेळ किंवा फिटनेस उपक्रमांमध्ये सहभागी होतात. मात्र स्थानिक पातळीवर खेळाडूंना नियमित सामने, विश्वासार्ह रँकिंग आणि प्रगती मोजण्याची व्यवस्था नसल्याने अनेक खेळ अनौपचारिक पातळीवरच मर्यादित राहतात.

सरकारच्या खेलो इंडिया, राष्ट्रीय क्रीडा धोरण यांसारख्या उपक्रमांमुळे सहभाग वाढला असला, तरी सामुदायिक पातळीवरील स्पर्धात्मक रचना अजूनही अपुरी असल्याचे चित्र आहे.

टेनिस, बॅडमिंटन, टेबल टेनिस, क्रिकेट, फुटबॉल आणि पिकलबॉलसारखे खेळ मेट्रोसह टियर-2 शहरांमध्ये वेगाने वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर SportsSkill Ladder सारख्या डिजिटल प्लॅटफॉर्मची गरज अधिक ठळक होत आहे.

SportsSkill चे सहसंस्थापक चेतन देसाई म्हणाले, "भारतामध्ये खेळ खेळणाऱ्यांची संख्या मोठी आहे, पण स्पर्धेसाठी योग्य व्यवस्था नाही. SportsSkill Ladder त्या पोकळीवर उपाय देतो."

तर सहसंस्थापक अभिनव सिन्हा यांनी सांगितले, "खेळाडूंना स्पर्धा, समुदाय आणि रँकिंग एकाच ठिकाणी मिळावे, यासाठी हा प्लॅटफॉर्म तयार केला आहे."

निरव मोदी म्हणाले, "SportsSkill Ladder स्थानिक खेळ संघटित करण्यासाठी उपयुक्त ठरेल. टीमचा दृष्टिकोन आणि काम पाहता मी लीड इन्व्हेस्टर म्हणून पुढे आलो आहे."

### प्लॅटफॉर्म काय सुविधा देतो?

SportsSkill Ladder प्लॅटफॉर्मवर खेळाडूंना —

- आपल्या सोसायटी, क्लब किंवा मित्रांच्या गटासाठी कस्टम लॅडर तयार करता येतात
- मित्र, टीम किंवा खेळाडूंना स्पर्धेसाठी आमंत्रित करता येते
- विविध खेळांमध्ये कौशल्याधारित रँकिंग पाहता येते
- नियमित सामने आणि स्पर्धा आयोजित करता येतात

हा प्लॅटफॉर्म सध्या Android आणि iOS वर बीटा स्वरूपात उपलब्ध आहे.

गुंतवणूक कशासाठी वापरणार?
मिळालेली गुंतवणूक प्लॅटफॉर्मचे फीचर्स मजबूत करणे, वापरकर्ता अनुभव सुधारणे आणि पूर्ण लॉंचसाठी तयारी यासाठी वापरण्यात येणार आहे.

## पुणे इंटरनॅशनल बिझनेस समिट २०२६ : KEZAD ग्रुपने मांडल्या नव्या औद्योगिक संधी

पुणे (दै. संध्या) :

प्रमुख बंदरे, विमानतळे आणि व्यापारी मार्गांशी जोडलेल्या योग्य ठिकाणी असलेल्या औद्योगिक क्षेत्रांमुळे, विविध उद्योगांना मदत करणाऱ्या क्षेत्र-केंद्रित सुविधा आणि उद्योगांसाठी अनुकूल वातावरण यांच्या माध्यमातून केझाड ग्रुप अबू धाबीच्या आर्थिक क्षेत्रांमधून जागतिक स्तरावर विस्तार करू इच्छिणाऱ्या भारतीय उद्योगांना दीर्घकालीन वाढीच्या संधी उपलब्ध करून देत आहे.

यूएईमधील एकात्मिक व विशेष आर्थिक क्षेत्रांचा सर्वात मोठा ऑपरेटर आणि एडी पोर्ट्स ग्रुपचा भाग असलेल्या अबू धाबी येथील खलिफा इकॉनॉमिक झोन्स – केझाड ग्रुपने पुणे इंटरनॅशनल बिझनेस समिट (पीआयबीएस) 2026 मध्ये प्लॅटिनम प्रायोजक म्हणून ठळक उपस्थिती नोंदवली. या निमित्ताने भारत आणि यूएईमधील व्यावसायिक संबंध तसेच आर्थिक सहकार्य अधिक मजबूत करण्याची आपली बांधिलकी केझाड ग्रुपने पुन्हा एकदा व्यक्त केली.

पीआयबीएस 2026 मधील सहभागातून केझाड ग्रुपने हे स्पष्ट केले की, जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा, विविध वाहतूक सुविधा, गुंतवणूकदारांसाठी अनुकूल नियम आणि जागतिक बाजारपेठांच्या जवळीक असलेली त्यांची एकात्मिक औद्योगिक व लॉजिस्टिक क्षेत्रे भारतीय उद्योगांना वेगाने आणि कार्यक्षम पद्धतीने आंतरराष्ट्रीय स्तरावर विस्तार करण्यास मदत करतात.

पीआयबीएस च्या 7व्या आवृत्तीत 20 हून अधिक देशांतील प्रतिनिधी, 60 पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी व धोरणकर्ते तसेच जागतिक व्यापाराचे भविष्य घडवणारे आघाडीचे उद्योगतज्ज्ञ आणि विचार नेतृत्वातील प्रमुख व्यक्ती सहभागी झाले आहेत. ही परिषद देशांमधील सहकार्य, गुंतवणुकीवरील चर्चा आणि महत्त्वाच्या धोरणात्मक भागीदारीसाठी एक प्रभावी व्यासपीठ ठरते. या वर्षीच्या समिटमध्ये अन्न-पेय (फूड अँड बेव्हरेजेस) आणि ऑटोमोबाईल उद्योगांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. हे लक्ष केझाड ग्रुपच्या उद्दिष्टांशी पूर्णपणे सुसंगत आहे. केझाड ग्रुप आपल्या आधुनिक औद्योगिक इकोसिस्टमच्या माध्यमातून या प्राधान्य क्षेत्रांमध्ये वाढ घडवून आणण्यासाठी काम करत आहे.

केझाड ग्रुपच्या औद्योगिक परिसंस्था प्रगत उत्पादन आणि वितरण पायाभूत सुविधांच्या माध्यमातून नवकल्पनांना चालना देण्यासाठी आणि उद्योगांचा विस्तार वेगाने करण्यासाठी उभारण्यात आल्या आहे. केझाडचे अन्न व पेय (फूड अँड बेव्हरेजेस) औद्योगिक क्षेत्र हे मध्य पूर्व, युरोप, आफ्रिका आणि आग्नेय आशिया येथील वेगाने वाढणाऱ्या बाजारपेठांसाठी अन्न प्रक्रिया, साठवणूक आणि वितरणाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून विकसित होत आहे. तसेच ऑटोमोबाईल औद्योगिक क्षेत्र वाहन उत्पादक, सुटे भाग पुरवठादार, वितरक आणि लॉजिस्टिक सेवा देणारे पुरवठादार यांच्यात समन्वय वाढवणारे अनुकूल वातावरण उपलब्ध करून देते, ज्यामुळे त्यांना जागतिक आणि प्रादेशिक बाजारपेठांमध्ये सहज प्रवेश मिळतो.

## उत्तराखंडमध्ये रंगणार नॅशनल स्कीइंगचा थरार

नवी दिल्ली (दै. संध्या) :

हिवाळी खेळांची पंढरी मानल्या जाणाऱ्या औलीमध्ये (उत्तराखंड) साहसी खेळांच्या शौकीनांसाठी एक आनंदाची बातमी आहे. येत्या १२ फेब्रुवारीपासून येथे 'नॅशनल स्कीइंग चॅम्पियनशिप'चा थरार रंगणार असून, यंदा प्रथमच ही स्पर्धा दोन वेगवेगळ्या स्लोप्सवर (उतारावर) होणार आहे. उत्तराखंडमधील औली येथे १२ ते १६ फेब्रुवारी दरम्यान नॅशनल स्कीइंग चॅम्पियनशिप आणि विंटर कॉर्निव्हलचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा निसर्गाच्या लहरीपणामुळे मुख्य 'नंदा देवी स्लोप'वरील बर्फ वेगाने वितळत आहे. त्यामुळे खेळाडूंची गैरसोय होऊ नये म्हणून तांत्रिक समितीने ही स्पर्धा दोन वेगवेगळ्या ट्रॅकवर घेण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. नंदा देवी स्लोपच्या टॉवर नंबर ८ पासून 'स्की माउंटेनिअरिंग' आणि 'स्नो बोर्ड' स्पर्धा होतील. तर टॉवर नंबर १० च्या वरच्या बाजूला असलेल्या टी-लाईनपासून 'अल्पाइन' स्पर्धा पार पडतील.

ज्या ठिकाणी नैसर्गिक बर्फ कमी आहे, तिथे दुसऱ्या ठिकाणाहून बर्फ आणून स्लोप तयार करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. गढवाल मंडळ विकास निगम (GMVN) मार्फत या काळात विंटर कॉर्निव्हलचेही आयोजन केले जाईल, ज्यामुळे पर्यटकांना खेळांसोबतच सांस्कृतिक कार्यक्रमांचाही आनंद घेता येईल.

# १३ फेब्रुवारी रोजी रेणुका शहाणे आणि अभिनय बेर्डे अभिनीत 'उत्तर' घरोघरी पोहोचणार

नवी दिल्ली (दै. संध्या) :

कायमच पुढे जाण्याच्या लगबगीत असलेल्या दुनियेला सातत्याने डावलल्या जाणाऱ्या प्रश्नावर विचार करायला लावणारे 'उत्तर'. आपण कायमच 'उद्या बघू' म्हणून जे टाळतो त्याचे नेमके काय होते? अव्यक्त प्रेमावरील भाष्य. पुढे ढकलण्यात आलेले सत्य. क्षमाशीलतेसाठी वेळ असतो असे गृहीत धरले जाते. आपल्या शांत भावनिक प्रामाणिकपणाने चित्रपटगृहातील प्रेक्षकांच्या मनाला भिडलेला, उत्तर आता 13 फेब्रुवारी रोजी मराठी ZEE5 वरील वर्ल्ड डिजिटल प्रीमिअरद्वारे देशभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी सज्ज आहे.




मनातून अगदी खोलवर हेलावणारे आणि जिव्हाळ्याचे मानवी नाट्य, 'उत्तर' प्रेम, संबंध, क्षमा आणि स्वत्व या नेहमीच 'उद्यावर' ढकलल्या जाणाऱ्या स्थगित भावनिक मूल्यांचा शोध घेते. ही कलाकृती दैनंदिन वास्तवात रुजलेली असली तरी तिच्या प्रतिध्वनीत सार्वत्रिक असलेला हा सिनेमा त्या नाजूक क्षणांचे चित्रण करतो. वेळ आपल्या हातातून निसटून जाताना जीवन अशी उत्तरं मागते जी देण्यास आपण तयार नसतो. संवेदनशीलता, संयम आणि अस्सल भावनिक स्पष्टतेसह उत्तर सापडते. फायनल फ्रेमनंतरही बराच काळ मनात रेंगाळते. जे क्षण आपण पुढे ढकलतो आणि नात्यातील जे बंध वाट पाहतील असं आपण गृहीत धरतो; त्यावर चिंतन करण्यास आमंत्रित करते.

या कलाकृतीच्या केंद्रस्थानी प्रेम, महत्त्वाकांक्षा आणि वाढत्या मौनामुळे आकार घेतलेले एक कोमल, गुंतागुंतीचे आई-मुलाचे नाते आहे. उमा ही एक आई. जिची उबदार माया शांतपणे तिच्या कुटुंबाला एकत्र ठेवते. निनाद हा एक तरुण. घरापासून जवळजवळ नकळत दूर जात असताना जीवनात पुढे जात असताना, स्वतःचा संघर्ष बाजूला ठेवून परिस्थितीला दोष न देता भावनिक अंतर पार करण्याच्या कसरतीत दिसतो. समकालीन जीवनाच्या आणि पिढ्यांदरम्यान होणाऱ्या बदलाच्या लयबद्धतेवर आधारित, 'उत्तर' हे दर्शविते की नातेसंबंध अनेकदा संघर्षातून नव्हे, तर योग्य क्षणाची, योग्य शब्दांची, योग्य वेळेच्या प्रतिक्षेत कसे तुटतात!

क्षितिज पटवर्धन लिखित आणि दिग्दर्शित, आणि Zee स्टुडिओज आणि जॅकपॉट एंटरटेनमेंट निर्मित, 'उत्तर' मध्ये रेणुका शहाणे आणि अभिनय बेर्डे यांच्या भूमिका अत्यंत प्रभावी आहेत. तसेच हृता दुर्गुळे आणि निर्मिती सावंत यांची अदाकारी अधिकच भावनिक सखोलता जोडणारी आहे. परिस्थिती आई आणि मुलाच्या नात्याला एका वळणावर आणत असताना, प्रेम, क्षमा आणि शेवटी एकमेकांसाठी; स्वतःसाठी दाखवावे लागणारे धैर्य आत्म्याला हेलावणाऱ्या शोधात कथा उलगडतात. या चित्रपटाबद्दलचे आपले विचार मांडताना रेणुका शहाणे म्हणाल्या, "उमाची व्यक्तिरेखा ही धैर्य, प्रेम आणि गोष्टी अखेरीस मार्गाला लागतील या अव्यक्त आशेवर आकार घेतलेले पात्र आहे. उमा साकारणे अतिशय भावूक करणारे होते. कारण तिच्या शांततेला शब्दांइतकाच आवाज होता. उत्तर आता अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचेल म्हणून मी आभारी आहे. जिथे मनातील भावना अगदी जवळून अनुभवल्या जाऊ शकतील".

अभिनय बेर्डे पुढे म्हणाला, "निनाद' हा सतत पुढे जाणाऱ्या एका पिढीचे प्रतिनिधित्व करतो. अनेकदा आपण मागे काय सोडले याचे परीक्षण करण्याइतपत वेळ निनादकडे नसतो. मी निनाद वठवताना मला महत्त्वाकांक्षा, भावनिक अंतर आणि घराचे मनातून वाटणारे आकर्षण प्रतिबिंबित करण्यास मदत झाली. 'उत्तर' आता ZEE5 वर प्रेक्षकांच्या भेटीला येईल याचा मला आनंद आहे".

# हवामान बदल ओळखण्यासाठी एआय तंत्रज्ञान उपयोगी - डॉ. पीटर ग्राफमन

## पीसीसीओई येथे इंद्रधनु आंतरराष्ट्रीय ग्रँड चॅलेंज स्पर्धा संपन्न



**पिंपरी (दै. संध्या) :**

हवामान बदल हे सध्याचे सर्वात मोठे वैज्ञानिक आव्हान आहे. हवामान बदल ओळखण्यासाठी एआय हे तंत्रज्ञान उपयोगी आहे. पर्यावरणात आमुलाग्र बदल झाल्यामुळे अचानकपणे आपत्ती उद्भवते. त्यामुळे अति पर्जन्यवृष्टी, दुष्काळ, भूकंप, भूस्खलन अशी संकटे येऊ शकतात. यामुळे तलाव, धरणे, नदीकिनारी असणाऱ्या पूर संरक्षक सीमा भिंती या पायाभूत सुविधा विस्कळीत होऊ शकतात. जसे की, कॅटरिना चक्री वादळात मोठ्या संरक्षक बांधामुळे सुरक्षा होईल असे सर्वांचे मत होते. परंतु तो बांध अयशस्वी झाला उलट त्यामुळे शहराचे अधिक नुकसान वाढले असे अमेरिकेचे न्यूयॉर्क युनिव्हर्सिटीचे प्रा. डॉ. पीटर ग्राफमन यांनी सांगितले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग (पीसीसीओई) येथे आंतरराष्ट्रीय संबंध विभाग आयोजक आणि सीयुएनवाय सह आयोजक "इंद्रधनु - आंतरराष्ट्रीय ग्रँड चॅलेंज २०२५ - २६" ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत भारत, अमेरिका, मलेशिया, घाणा या देशांतील आंतरराष्ट्रीय संघांनी सहभाग घेतला होता. यावेळी डॉ. पीटर ग्राफमन यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी कॅलिफोर्निया विद्यापीठ प्रा. डॉ. प्रमोद खरगोनकर, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, उपसंचालक डॉ. नीलकंठ चोपडे, आंतरराष्ट्रीय संबंध संचालक डॉ. रोशनी राऊत, प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस डॉ. आर. व्यंकटेश्वरन, पुणे व्हिओआयएस डीजीएम विशाल जैन, गोदरेज कंपनीचे आर. अँड डी. प्रमुख संत रंजन, युएसए बीसीसी सिटी युनिव्हर्सिटी ऑफ न्यूयॉर्क परमिता सेन, युनिव्हर्सिटी ऑफ न्यूयॉर्क डॉ. नील फिलिप, न्यूजेनच्या सुश्री भावना, डेटाफाय कंपनीचे हेमंत सेल्मोकर, व्योम लॉजिक एआय सीईओ चिराग त्रिवेदी आदी उपस्थित होते.

कॅलिफोर्निया विद्यापीठ प्रा. डॉ. प्रमोद खरगोनकर म्हणाले की, एआय हे तंत्रज्ञान हवामान बदलांच्या सर्व बाबींविषयी अचूक माहिती देऊ शकते. यापुढे एआय हे जनरल एआय, पॉवरफुल एआय आणि नंतर सुपर एआय असा प्रवास करत विकसित होईल. नंतर हे एक सामान्य आणि सामाजिक तंत्रज्ञान बनेल. ज्याचा उद्देश देखील सामान्य असेल. तसेच एआय क्रांतीशी तुलना, इंटरनेट, संगणक, मायक्रोप्रोसेसर, वीज, स्टीम इंजिन, प्रिंटिंग प्रेस या विविध विषयांवर देखील असे डॉ. खरगोनकर यांनी मार्गदर्शन केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सर्व विजेत्या टीम आणि त्यांच्या मार्गदर्शकांचे अभिनंदन केले.

पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी सांगितले की, इंद्रधनु हे जागतिक सहकार्याला प्रोत्साहन देणारे एक शक्तिशाली व्यासपीठ आहे. ही स्पर्धा संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास ध्येय आणि १३ प्रकारच्या हवामान कृतीशी संबंधित होती. तसेच तंत्रज्ञान चलित एआय विकसित करण्यासाठी प्रोत्साहन देणे हा या स्पर्धेचा उद्देश होता.

प्रास्ताविक करताना डॉ. रोशनी राऊत यांनी सांगितले की, ब्रॉक्स कम्युनिटी कॉलेज, द सिटी युनिव्हर्सिटी न्यूयॉर्क, नुजेन इंटेलिजन्स, कॅपजेमिनी, आयईईई पुणे विभाग, इकोसॅन सर्व्हिस फाउंडेशन, द इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन फाउंड्रीमेन आणि पुणे एआयटी कम्युनिटी यांचे इंद्रधनू या कार्यक्रमाला सहकार्य लाभले आहे. यासाठी जून २०२५ मध्ये भारताबाहेरील एकूण १० संघ आणि भारतातील विविध १८ राज्यातील इतर संघ असे जगभरातून १००२ संघांनी आपल्या कल्पना नोंदवून सहभाग घेतला होता. यातील ४८१ संघांनी व्हिडिओ प्रोटोटाइप सादर केले. अंतिम फेरीसाठी १९ संघांची निवड झाली होती.

तसेच विशेष श्रेणी पुरस्कार पुणे येथील सिम्बॉयसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी आणि आणि द सिटी विद्यापीठाच्या "आयजीसी १००३ टीम बीग एप्पल" यांना प्रत्येकी २० हजार रुपये देऊन गौरविण्यात आले.

डॉ. अंजली श्रीवास्तव यांनी सूत्रसंचालन आणि आभार डॉ. संदीप पाटील यांनी मानले.

### या स्पर्धेत विजेते खालील प्रमाणे

प्रथम क्रमांक :- "आयजीसी ४२५ बाईट्स पायरेट्स" यांना १ लाख रुपयांचे बक्षीस आणि एमआयटी अकादमी ऑफ इंजीनियरिंग यांच्याकडून १ लाख रुपयांचे न्यूजेनचे एपीआय क्रेडिट आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

द्वितीय क्रमांक : - "आयजीसी ६६४ इकोलूपर, भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे" यांना ६० हजार रुपये आणि ७५ हजार रुपयांचे न्यूजेनचे एपीआय क्रेडिट आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

तृतीय क्रमांक :- "आईजीसी ४१२ जेनिथ, पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय" यांना ४० हजार रुपयांचे न्यूजेनचे एपीआय क्रेडिट आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### चिखली येथील कै. गजानन म्हेत्रे उद्यान व क्रीडांगणाचे नुतनीकरण करा : यश साने

पिंपरी (दैनिक संध्या) : चिखली येथील कै. गजानन म्हेत्रे उद्यान व क्रीडांगणाची सध्याची अवस्था चिंताजनक असून, येथे असलेली खेळाची साधने व उद्यानातील सुविधा जीर्ण झाल्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक यश साने यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे उद्यान व क्रीडांगणाच्या तातडीने नुतनीकरणाची मागणी केली आहे. या ठिकाणी पूर्वी करण्यात आलेली विकासकामे कालबाह्य झाली असून, नवीन व सुरक्षित सुविधा उभारणे अत्यावश्यक असल्याचे यश साने यांनी निवेदनात नमूद केले आहे. परिसरातील लहान मुले, युवक तसेच ज्येष्ठ नागरिक नियमितपणे या उद्यानाचा वापर करत असल्याने सार्वजनिक सुरक्षितता आणि आरोग्याच्या दृष्टीने नुतनीकरण करणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आहे. उद्यानातील पायवाट, खेळणी, प्रकाशव्यवस्था तसेच क्रीडांगणातील सुविधा सुधारण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. नागरिकांच्या सोयीसाठी प्रशासनाने लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.



### अजितदादांमुळे विद्या प्रतिष्ठानला भेट देऊन पत्रकारांना घेता आली होती माहिती

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड श्रमिक पत्रकार संघाचा अध्यक्ष असताना पत्रकार संघ व प्राधिकरणातील चक्रव्यूह मित्र मंडळाचे अध्यक्ष बाळा शिंदे यांच्या पुढाकाराने बारामतीतील विद्या प्रतिष्ठानच्या विद्यानगरीस भेट देण्यासाठी पत्रकारांच्या अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रतिष्ठानचे निबंधक निवृत्त लेफ्टनंट कर्नल ए. पी. मुखोपाध्याय यांना पत्रकारांना योग्य ती माहिती द्या, त्यांची योग्य ती बडदास्त ठेवा. असे आदेश दिले होते. त्यामुळे पत्रकारांना प्रतिष्ठान विषयी बारकाईने माहिती जाणून घेता आली. अशी आठवण पिंपरी चिंचवड श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष नंदकुमार सातुर्डेकर यांनी जागवली. याबाबत सातुर्डेकर म्हणाले की, दि. 31 मार्च 2008 रोजी पिंपरी चिंचवड श्रमिक पत्रकार संघ व प्राधिकरणातील चक्रव्यूह मित्र मंडळातर्फे बारामतीतील विद्या प्रतिष्ठानच्या विद्यानगरीला भेट देण्यासाठी पत्रकारांच्या अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी 'सन 1993 मध्ये सुरू झालेल्या या शिक्षण संस्थेचा आज वटवृक्ष झाला आहे. बारामती व पंचक्रोशीतील ग्रामीण विद्यार्थ्यांना आधुनिक व दर्जेदार शिक्षण दिले जात आहे या शैक्षणिक संकुलात 12000 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत 2200 विद्यार्थ्यांना वसतीगृहाची सोय आहे. केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार, पालकमंत्री अजित पवार हे जातीने लक्ष देत असून संस्थेच्या कामकाजाचा ते नियमित आढावा घेतात 'अशी माहिती आम्हाला देण्यात आली होती. प्रतिष्ठानला भेट दिल्यानंतर ते जाणवतही होते. यावेळी पत्रकारांनी कृषी मंत्री शरद पवार यांना गेल्या 40 वर्षात मिळालेल्या भेटवस्तू व दुर्मिळ छायाचित्रांच्या जतन वस्तू संग्रहालयासही भेट दिली होती. या दौऱ्याच्या निमित्त ज्येष्ठ नेते शरद पवार व दिवंगत उपमुख्यमंत्री यांनी बारामतीचा केलेला विकास श्रमिक पत्रकारांना जाणून घेता आला जवळून पाहता आला असे सातुर्डेकर म्हणाले.


### पोलिस भरतीसाठी इंद्रायणी नगर, भोसरी परिसरातील वाहतुकीत बदल

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड पोलिस भरतीच्या अनुषंगाने इंद्रायणी नगर, भोसरी येथील वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. इंद्रायणीनगर येथील संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल येथे पोलिस भरतीची शारीरिक चाचणी १० ते २६ फेब्रुवारी या कालावधीत होत आहे. या परिसरात संभाव्य वाहतूककोंडी टाळण्यासाठी परिसरातील वाहतूक वळविण्यात आली आहे. याबाबतचे आदेश वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त विवेक पाटील यांनी दिले आहेत.

# गोंड, वारली, मधुबनी कलेचा संगम!

## मनपा शाळेतील 'आर्ट मेळा' ठरला आकर्षणाचा केंद्रबिंदू

**पिंपरी (दै. संध्या) :**



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागांतर्गत श्रीमती अनुसयाबाई नामदेव वाघेरे इंग्लिश मीडियम स्कूल, पिंपरी येथे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणाऱ्या 'आर्ट मेळा'चे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या कलात्मक अनुभवांसह सर्जनशील संधी उपलब्ध करून देणारा हा उपक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

महापालिका अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा मेळावा सुरू झाला. यावेळी अतिरिक्त आयुक्त बगाडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कलाकृती पाहून त्यांनी त्यामागील कल्पना आणि सादरीकरणाची माहिती विद्यार्थ्यांकडून घेतली. तसेच त्यांच्या कलाकृती व सादरीकरणांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी वारली कलेतून शनिवार वाडा, गोंड आर्टद्वारे गेट वे ऑफ इंडिया, तसेच एस. एच. रझा यांच्या कलेपासून प्रेरित गाव अशा विविध विषयांवर आधारित कलाकृती साकारल्या होत्या.

या आर्ट मेळ्याची संकल्पना पारंपरिक व लोककला अशी होती. त्यानुसार संपूर्ण आर्ट मेळ्यातील कार्यशाळा, प्रदर्शने आणि उपक्रम भारतीय लोककला व पारंपरिक कलेभोवती केंद्रित करण्यात आले होते.

पिंपरी चिंचवड महापालिकेतील सुमारे ३० शाळांमधील विद्यार्थ्यांनी पारंपरिक व लोककलांपासून प्रेरणा घेत विविध ३डी (3D) मॉडेल्स साकारली. विद्यार्थ्यांनी केवळ कलाकृती सादर केल्या नाहीत, तर त्या मागील संकल्पना, आशय आणि कलाशैली यांची माहिती उपस्थितांना दिली.

या आर्ट मेळ्याचे आयोजन पिंपरी चिंचवड महापालिकेचे महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त श्रावण हार्डिकर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे आणि उपायुक्त ममता शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रशासन अधिकारी संगिता बांगर, कला नोडल अधिकारी श्रीकांत चौगुले यांच्या अधिपत्याखाली व आकांक्षा फाउंडेशन यांच्या सहकार्याने करण्यात आले होते.

या आर्ट मेळ्याचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे देशातील विविध राज्यांतील पारंपरिक कलाकारांचा सहभाग हे ठरले. या कलाकारांनी विद्यार्थ्यांसाठी थंगका, ऍप्लिक वर्क, गोंड चित्रकला आणि लेदर क्राफ्ट यांसारख्या पारंपरिक कलांच्या कार्यशाळा घेतल्या. या कार्यशाळांमधून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कलाकारांकडून लोककलेचे तंत्र, इतिहास आणि सांस्कृतिक महत्त्व जाणून घेण्याची संधी मिळाली.

> पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थी पारंपरिक व लोककलेच्या माध्यमातून आपली सर्जनशीलता प्रभावीपणे सादर करत आहेत, ही अभिमानाची बाब आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना केवळ कला शिकण्याचीच नव्हे, तर आपल्या सांस्कृतिक वारशाची ओळख निर्माण होते. कला, शिक्षण आणि संस्कृती यांचा संगम साधणारे हे उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे आहेत. **– रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महापालिका**
>
> आर्ट मेळा सारख्या उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळते. पारंपरिक व लोककलेच्या माध्यमातून विचार मांडणे, संवाद साधणे आणि आत्मविश्वासाने सादरीकरण करणे,तसेच संघ भावना निर्माण होणे ही कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये विकसित होत आहेत. महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थी अशा सर्जनशील उपक्रमांतून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करत आहेत.
>
> **– विक्रांत बगाडे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

# चांगल्या संस्कारातूनच नवी पिढी घडेल – पुरुषोत्तम सदाफुले



**पिंपरी (दै. संध्या) :**

मुलांना अधिकाधिक चांगले संस्कार कसे देता येतील, हे पहायला हवे. त्यातूनच नवी पिढी घडेल, असा विश्वास महाराष्ट्र कामगार साहित्य परिषदेचे अध्यक्ष पुरुषोत्तम सदाफुले यांनी येथे व्यक्त केला. 'राजमाता अहिल्यादेवी शिक्षण संस्थे'च्या वतीने चिखलीतील 'टाऊन हॉल' येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात कवी, योगशिक्षक व 'शब्दब्रम्ह विविधांगी सेवा संस्थे'चे संस्थापक-अध्यक्ष प्रभाकर चव्हाण यांना 'आचार्य विनोबा भावे जीवनगौरव पुरस्कार', योगिराज सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर तापकीर यांना 'यशवंतराव चव्हाण सहकारभूषण पुरस्कार', तर वैशाली सावळेकर यांना 'आदर्श पालक पुरस्कार' सदाफुले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी नगरसेवक यश साने, विकास साने, नगरसेविका संगीता ताम्हाणे, सोनम मोरे, संस्थेचे अध्यक्ष व्यंकटेश वाघमोडे, गजानन वाघमोडे, मोहन देवकाते, शंकर जाधव आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना सदाफुले म्हणाले, की मुलांना चांगले संस्कार दिले पाहिजेत. आजची स्थिती पाहता शिक्षकांवरील जबाबदारी वाढली आहे. मुलांना मुक्तपणे खेळू द्या. बागडू द्या. त्यांच्या कलागुणांना वाव द्या. यश साने म्हणाले, की मुलांना मोबाईलपासून दूर ठेवले पाहिजे. मोबाईलचे किती दुष्परिणाम आहेत, हे आपण एक सर्व जण पाहत आहोत. त्यामुळे याबाबत पालकांनी काळजी घेतली पाहिजे. विकास साने म्हणाले, आज संस्कार महत्त्वाचे आहेत. म्हणूनच पालकांनी योग्य वयात मुलांवर योग्य ते संस्कार करण्यावर भर दिला पाहिजे. त्यातूनच मुले घडतील.

प्रभाकर चव्हाण म्हणाले, 'हा घरचा पुरस्कार आहे. वाढती स्पर्धा, नोकरीधंदा, ताणतणाव यामुळे बऱ्याचदा पालकांचे आपल्या मुलांकडे दुर्लक्ष होते. मात्र, मुलांना वेळ दिला पाहिजे. त्यासाठी वेळेचे व्यवस्थापन केले पाहिजे. योग्य संस्कारच मुलांना चांगला नागरिक बनवू शकतात. रंजना आव्हाड यांनी सूत्रसंचालन केले. सई पांचाळ यांनी परिचय करून दिला. तर सत्यवान वाघमोडे यांनी आभार मानले.

# पै. श्लोक ताम्हाणे यांना राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत कांस्यपदक

**पिंपरी (दै. संध्या) :**



महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ, भारतीय कुस्ती संघ व महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 15 वर्षांखालील राज्यस्तरीय फ्रीस्टाईल व ग्रिकोरोमन अंजीक्यपद कुस्ती स्पर्धा 2025-2026 मध्ये पै. श्लोक संदीप ताम्हाणे यांनी ग्रिकोरोमन कुस्ती प्रकारात कांस्यपदक पटकावले. श्लोक ताम्हाणे यांचे हे यश त्यांच्या कठोर मेहनतीचे आणि कुस्ती क्षेत्रातील निष्ठेचे प्रतीक आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाने त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून, त्यांच्या या कामगिरीने राज्यातील तरुण खेळाडूंना प्रेरणा मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. याबाबत आमदार महेश लांडगे म्हणाले की, "श्लोक ताम्हाणे यांनी राज्यस्तरीय स्पर्धेत जो उत्कृष्ट पराक्रम केला आहे, त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. ही फक्त कांस्यपदक जिंकण्याची गोष्ट नाही, तर मेहनत, चिकाटी आणि धैर्य यांचे उत्तम उदाहरण आहे. पिंपरी-चिंचवड शहर स्पोर्ट्स सिटी बनवण्याचा संकल्प आम्ही केला आहे. भोसरीमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे कुस्ती व कबड्डी संकुल सुरू झाले असून, त्या ठिकाणी अनेक मल्ल खेळाडू सराव करीत आहेत.

# शहरातील आठही क्षेत्रीय कार्यालयांअंतर्गत व्यापक अतिक्रमण कारवाई

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ च्या कालावधीपासून आतापर्यंत आठही क्षेत्रीय कार्यालयांमार्फत एकूण १४३ अनाधिकृत बांधकामे, १ हजार २६० फ्लेक्स, १३ हजार ९७ केऑक्स, ११५ हातगाड्या, ६० टपऱ्या तसेच २ हजार ९९५ टेबल, वजन काटे, खुर्च्या, बाकडे, झेंडे व इतर साहित्य हटविण्यात व जप्त करण्यात आले आहे, अशी माहिती अतिक्रमण विभागाचे (मुख्यालय) सहाय्यक आयुक्त तथा क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील यांनी दिली. आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आलेल्या या कारवाईमध्ये अतिक्रमण निरीक्षक, बीट निरीक्षक, महाराष्ट्र राज्य सुरक्षा दलाचे जवान तसेच पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त पथकांचा समावेश होता.

महापालिका सार्वत्रिक निवडणूक कालावधीत क्षेत्रीय कार्यालयनिहाय करण्यात आलेल्या अतिक्रमण कारवाईची आकडेवारी -



१) अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत १३ अनाधिकृत बांधकामे हटविण्यात आली. यासोबतच ४८ फ्लेक्स, ३ हजार १२१ केऑक्स, ३७ हातगाड्या, ३५ टपऱ्या तसेच ४५२ टेबल, वजन काटे, खुर्च्या, बाकडे, झेंडे व इतर साहित्य जप्त करण्यात आले.

२) ब क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत २९ अनाधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली असून ५५७ फ्लेक्स, ३ हजार ५ केऑक्स, ३ हातगाड्या तसेच ४८१ विविध साहित्य जप्त करण्यात आले.

३) क क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत २ अनाधिकृत बांधकामे, २७० फ्लेक्स, १ हजार ९३९ केऑक्स, २ हातगाड्या, १३ टपऱ्या व ४८९ इतर साहित्यावर कारवाई करण्यात आली.

४) ड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत अनाधिकृत बांधकाम आढळून आले नसले तरी ९६ फ्लेक्स, १ हजार २१५ केऑक्स, १५ हातगाड्या, १ टपरी व १९ इतर साहित्य हटविण्यात आले.

५) इ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत १ अनाधिकृत बांधकाम, ७१ फ्लेक्स, १ हजार २४१ केऑक्स, २० हातगाड्या, १ टपरी तसेच १ हजार ३१९ इतर साहित्यावर कारवाई करण्यात आली.

६) फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत ३५ अनाधिकृत बांधकामे, ६५ फ्लेक्स, ९६७ केऑक्स, १३ हातगाड्या, ३ टपऱ्या व ५७ इतर साहित्य हटविण्यात आले.

७) ग क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत ११ अनाधिकृत बांधकामे, ८५ फ्लेक्स, ५१५ केऑक्स, २३ हातगाड्या, १ टपरी व ५२ इतर साहित्यावर कारवाई करण्यात आली.

८) ह क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत ५२ अनाधिकृत बांधकामे, ६८ फ्लेक्स, १ हजार ९४ केऑक्स, २ हातगाड्या, ६ टपऱ्या व १२६ इतर साहित्य जप्त करण्यात आले.

तरी शहरातील सार्वजनिक रस्ते, पदपथ व मोकळ्या जागांवर अनधिकृतपणे अतिक्रमण करू नये. भविष्यातही नियमभंग करणाऱ्यांविरोधात अशीच कठोर कारवाई सुरू राहणार आहे, असे महापालिका प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# अजित पवारांची 'राष्ट्रवादी'च पुणे जिल्ह्यात 'दादा'

**बारामती (दै. संध्या)**



राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाच्या पार्श्वभूमीवर दुःखाची छाया असलेल्या पुणे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये अजित पवारांच्या 'राष्ट्रवादी'ने सर्वाधिक जागा मिळवत पुणे जिल्ह्यात आपणच 'दादा' असल्याचे दाखवून दिले. आतापर्यंत अजित पवार यांच्या नेतृत्त्वामुळे तेच पुण्याचे 'दादा' असल्याचे अनेक निवडणुकांमध्ये दिसून आले. मात्र, आता अजित पवार नसले, तरी पुणे जिल्ह्यात केलेल्या कामाची आठवण ठेवून मतदारांनी अजित पवार यांच्या पक्षाला साथ देत आदरांजली वाहिली.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या दोन्ही 'राष्ट्रवादी' बहुतांश ठिकाणी एकत्र होते. त्याचा या पक्षांना फायदा झाला. तसेच अजित पवार यांच्या निधनामुळे सहानुभूतीची लाट या पक्षांकडे होती. भाजप हा दुसऱ्या स्थानावर रहिला. शिवसेना (ठाकरे) गटाने शिवसेना (शिंदे) गटापेक्षा जास्त जागा मिळवित तिसरे स्थान पटकावले. काँग्रेसला मात्र एकाही जागेवर यश मिळाले नाही.

जिल्हा परिषदेच्या ७३ गट आणि पंचायत समितीचे १४६ गण आहेत. या निवडणुकीत ६८.३५ टक्के मतदान झाले. अजित पवार यांच्या अकाली निधनाच्या पार्श्वभूमीवर ही निवडणूक झाल्याने या निवडणुकीत दुःखाचे वातावरण होते. कोणत्याही पक्षाने जाहीर सभा घेवून प्रचार केला नाही. मतदारांच्या वैयक्तिक गाठीभेटी घेवून प्रचार करण्यात आला. त्यामुळे मतदानाचे प्रमाण कमी झाले. त्यामध्ये अजित पवार यांच्या 'राष्ट्रवादी'ने सर्वाधिक जागा घेत पुणे जिल्ह्यावर सत्ता कायम राखली.

**बारामतीत शत प्रतिशत अजित पवार**

अजित पवार यांच्या निधनामुळे मतदारांमध्ये निरुत्साह होता. बारामतीत सर्वांत कमी ५४.९० टक्के मतदान झाले. गेल्या वेळी ६१ टक्के मतदान झाले होते. सर्व पक्षांनी जाहीर प्रचार न करता मतदारांना वैयक्तिक भेटण्यावर भर दिला. बारामतीमध्ये जिल्हा परिषदेचे सहा गट आणि पंचायत समितीचे १२ गण आहेत. अजित पवार यांच्या 'राष्ट्रवादी'ने सर्व ठिकाणी उमेदवार उभे केले. भाजपने जिल्हा परिषदेत चार ठिकाणी आणि पंचायत समितीत ११ ठिकाणी उमेदवार उभे केले. दोन्ही ठिकाणी 'राष्ट्रवादी'चे उमेदवार निवडून आल्याने भाजपवर नामुष्कीची वेळ आली.

**काँग्रेसवर नामुष्की**

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत काँग्रेसला एकही जागा मिळाली नसल्याने त्यांच्यावर नामष्की ओढवली. या पक्षाचे पुरंदरचे माजी आमदार संजय जगताप आणि भोरचे माजी आमदार संग्राम थोपटे यांच्यामुळे जिल्ह्यात काँग्रेस तग धरून होती. आता काँग्रेसला नेतृत्त्व राहिले नसल्याने एकाही ठिकाणी यश मिळाले नाही.

**काँग्रेसच्या माजी आमदारांमुळे भाजपचा शिरकाव**

पुरंदरचे काँग्रेसचे माजी आमदार संजय जगताप आणि भोरचे काँग्रेसचे माजी आमदार संग्राम थोपटे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. नगर परिषदेच्या निवडणुकीत सासवड वगळता अन्य ठिकाणी भाजपला शिरकाव करता आला नाही. तेव्हा प्रचाराला अजित पवार हे होते. या वेळच्या निवडणुकीत काँग्रेसच्या या माजी आमदारांमुळे भाजपने शिरकाव केला आहे. पुरंदर आणि भोरमध्ये भाजपला संमिश्र प्रतिसाद मिळाला.

**मावळमध्ये भाजपला शून्य जागा**

मावळ तालुक्यात दोन्ही 'राष्ट्रवादी' आणि भाजप यांच्यात लढत होती. या तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या पाच आणि पंचायत समितीच्या दहा जागांवर अजित पवार यांच्या 'राष्ट्रवादी'ने विजय साकारला. आमदार सुनील शेळके यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक लढविण्यात आली. माजी आमदार बाळा भेगडे यांच्या नेतृत्वाखाली भाजपने निवडणूक लढविली. मात्र, भाजपला एकाही जागा मिळाली नाही.

**इंदापूरमध्येही सर्व 'राष्ट्रवादी'**

इंदापूर तालुक्यात राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे आणि माजी मंत्री हर्षवर्धन पाटील हे एकत्र आल्याने भाजपचा निभाव लागला नाही. या ठिकाणी सर्व जागा 'राष्ट्रवादी'ला मिळाल्या. भाजपचे नेते प्रवीण माने यांच्या साथीला अजित पवारांच्या 'राष्ट्रवादी'चे माजी जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर हे असतानाही भाजपला मतदारांनी स्वीकारले नसल्याचे स्पष्ट झाले.

**आमदार कुल यांना फटका**

दौंड तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या सर्व जागा 'राष्ट्रवादी'ला मिळाल्या. त्यामुळे भाजपचे आमदार राहुल कुल यांना फटका बसला आहे. पंचायत समितीत मात्र कुल यांना काही जागा मिळवता आल्या.

**आंबेगावात वळसे-पाटीलच**

आंबेगाव तालुक्यात 'राष्ट्रवादी'च्या विरोधात शिवसेनेचे आव्हान होते. माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांचे नेतृत्व स्वीकारात मतदारांनी आंबेगावात 'राष्ट्रवादीला साथ दिली.

**जुन्नरमध्ये शिवसेनेचे अस्तित्त्व टिकून**

जुन्नरमध्ये जिल्हा परिषदेच्या आठपैकी चार जागांवर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने विजय साकारला. शिवसेना (शिंदे) पक्षाला तीन, तर शिवसेना (ठाकरे) गटाला एक जागा मिळाली. त्यामुळे शिवसेनेचे अस्तित्त्व टिकून असल्याचे स्पष्ट झाले.

## 'खेड' शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या ताब्यात

खेड तालुक्यात आमदार बाबाजी काळे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना (ठाकरे) पक्षाने निवडणूक लढविली. या ठिकाणी जिल्हा परिषदेचे पाच आणि पंचायत समितीचे नऊ जागांवर विजय मिळविला आहे. त्यामुळे खेड तालुका हा शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या ताब्यात राहिला आहे.

## मुळशीत संमिश्र यश

मुळशी तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसने जिल्हा परिषदेच्या तीनपैकी दोन आणि पंचायत समितीच्या सहापैकी तीन जागांवर यश मिळविले. मुळशीत मान हिंजवडी या गटात भाजपचे शिवाजी बुचडे हे विजयी झाले. आतापर्यंत या तालुक्यात भाजपला शिरकाव करता आला नव्हता.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### नयन डुंबरे यांची अध्यक्षपदी निवड

ओतूर (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ,मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर जिल्हा स्तरीय पत्रकार अधिवेशन निघोज येथील जागतिक पर्यटन स्थळ असलेले रांजणखळगे येथील मळगंगा देवस्थानच्या सभागृहात अत्यंत उत्साहात व थाटामाटात संपन्न झाले या अधिवेशनात जुन्नर तालुका अध्यक्ष पदाची घोषणा संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गावकरीचे मुख्य संपादक डॉ.विश्वासराव आरोटे यांनी केली आणि नयन डुंबरे यांना जुन्नर तालुकाध्यक्ष म्हणून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष व माजी तालुकाध्यक्ष राजेश डोके यांच्या उपस्थितीत नियुक्ती पत्र देण्यात आले.यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष नयन डुंबरे,पुणे जिल्हा उपाध्यक्ष व माजी तालुकाध्यक्ष राजेश डोके यांचा आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव गावडे यांच्या शुभहस्ते शाल,श्रीफळ, व ट्रॉफी देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.यावेळी जुन्नर तालुका संपर्क प्रमुख रवि गजे यांनी देखील नयन डुंबरे यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. यावेळी व्यासपीठावर आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार,राष्ट्र सह्याद्रीचे संपादक शिवाजीराव शिर्के,महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे महासचिव डॉ.विश्वास राव आरोटे,जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेच श्री मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे कार्याध्यक्ष वसंतराव कवाद,उपाध्यक्ष अमृता रसाळ,शिवसेना जिल्हाध्यक्ष डी.शिरोळे,निघोज माजी सरपंच तूकारामजी लंके, कन्हैया उद्योग समूहाचे मच्छिंद्र लंके,राष्ट्रवादी काँग्रेस नेते सोमनाथ वरखडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. जिल्ह्यातील सर्व पत्रकार बांधवांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. तसेच पत्रकारांच्या विविध प्रश्नावर सखोल चर्चा झाली.

### विद्यार्थ्यांना अन्नदान किरण भंडारी यांच्या वाढदिवसाचे सेलिब्रेशन

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : सद्या समाजात वाढदिवसानिमित्त मोठ मोठ्या पार्टीचे आयोजन करुन श्रीमंतीचा बडेजाव पणाचे प्रदर्शन करण्यात येते. मातोश्री रमाई आंबेडकर प्राथमिक व माध्यमिक निवासी आश्रम शाळेत विद्यार्थ्यांना किरण भंडारी यांनी वाढदिवसाचे औचित्य साधुन शैक्षणिक साहित्याचे वाटप करुन एक नवा आदर्श ठेवला. आपण ज्या समाजात लहानाचे मोठे झाले त्या समाजाचे आपण काही तरी देणं लागतं ही सामाजिक जाणीव ठेवून सातत्याने निरपेक्ष भावनेने विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीसाठी तत्पर पुढं असतात. या उदात्त हेतूने प्रेरीत होवून युवा उद्योजक किरण भंडारी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मातोश्री रमाई आंबेडकर प्राथमिक व माध्यमिक निवासी आश्रम शाळेत विद्यार्थ्यांना अन्नदान व शालेय उपयोगी वस्तुचे वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका शबाना शेख, इतिहास अभ्यासक खलिल शेख, पत्रकार बापुसो चौधरी, शिक्षक वृंद अमोल शिंदे, प्रवीण कांबळे, वासुदेव बारी, मीना खंडागळे, जयश्री बळवंत, माधुरी सुपेकर, शकील शेख, युवा उद्योजक शुभम काळे, निवेदक समाधान अवचट, प्रविण ननावरे, अनिकेत पवार, केतन निकाळजे, अक्षय काळे, गोवर्धन खोमणे, नितीन लोंढे, आमित कांबळे, नितीन डाके, अविर घाडवे, समाधान वाघमारे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सल्लागार सुनिल तुपे यांनी केले तर आभार पत्रकार सुवर्णा कांचन यांनी मानले. सूत्रसंचालन केतन निकाळजे यांनी केले.

### नदीपुलावरील रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण

आळंदी (दैनिक संध्या) : आळंदी नगरपरिषद हद्दीतील देहूफाटा ते चाकण चौक यांना जोडणाऱ्या गरुड स्तंभालगतच्या इंद्रायणी नदीपुलावरील रस्त्याची दुरुस्ती आणि डांबरीकरणाचे काम नगरपरिषदेने पूर्ण केले. यामुळे रस्ता आता चकाचक आणि खड्डेमुक्त झाला आहे. रविवारी (ता. ८) रात्री दहा वाजल्यापासून ते सोमवारी (ता. ९) रात्री बारापर्यंत पुलावरील रस्त्याच्या डांबरीकरणासाठी वाहतूक आळंदी नगरपरिषदेने पूर्णतः बंद केली होती. स्वतः नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, मुख्याधिकारी माधव खांडेकर आणि अन्य नगरसेवक या रस्त्याच्या कामाची पाहणी करीत होते. वाहतुकीच्या वर्दळीचा रस्ता असल्याने हे काम चांगले होणे आवश्यक होते. त्याचबरोबर सांडपाणी रस्त्यावर येऊ नये यासाठी ड्रेनेजचीही दुरुस्ती नगरपरिषदेने केली. दिवसभरात या मार्गावर वाहतूक बंद केल्यामुळे वाहन चालकांची काहीशी गैरसोय झाली मात्र रस्त्याचे काम पूर्ण झाल्याने वाहतुकीसाठी चांगला रस्ता वापरता येईल असे चित्र सध्यातरी आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुढाकार घेत पुणे-आळंदी रस्त्यासाठी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता.

# विनाकारण मारहाण प्रकरणी पोलीस उपायुक्त यांना निवेदन

**काळे पडळ (दै. संध्या)**



काळे पडळ पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमित शेटे व पोलीस हवालदार संजय देसाई यांच्याकडून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) पक्षाच्या पदाधिकाऱ्यास विनाकारण मारहाण व अर्वाच्य भाषेत शिवीगाळ व बेकायदेशीर जमिनीवर खाली बसविण्यास भाग पाडून कार्यकर्त्याकडून मोबाईल काढून घेणे या प्रकारचे आरोप करीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाकडून निषेध आंदोलन करून परिमंडळ पाचचे पोलीस उपायुक्त राजकुमार शिंदे यांना काळेपडळ पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमित शेटे व पोलीस हवालदार संजय देसाई यांच्याविरुद्ध या प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याचे निवेदन देण्यात आले

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे पुणे शहर उपाध्यक्ष महादेव कांबळे यांच्या नेतृत्वात हे निवेदन पोलीस उपयुक्त राजकुमार शिंदे यांना देण्यात आले, यावेळेस कामगार आघाडीचे अध्यक्ष राजाभाऊ कर्वे, दीपक इसावे, संजय पटणपल्लु उपस्थित होते.

त्याचबरोबर हडपसर विधानसभा मतदार संघाचे उपाध्यक्ष भरत शेठ जाधव, आशिष आल्हाट, मास मुव्हमेंट संघटनेचे अध्यक्ष विजय जगताप यांनीही यावेळी पाठिंबा दर्शवला त्याचबरोबर क्रांतिवीर लहुजी सेनेचे संस्थापक अध्यक्ष मनोज क्षीरसागर, जनशक्ती विकास संघाचे अध्यक्ष सुफियान खान तसेच चेतन शिरोळे, संकेत शिंदे, अजय शिंदे, विनय कांबळे, शुभम शिंदे, सत्यम यादव, रमेश जाधव, शेखर मिरेकर, सोनू आल्हाट, गौस शेख, किशोर डुबेकर इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

# शाळेतील संस्काराची शिदोरी आयुष्यभर जपा : सचिन वायकुळे

**वैराग (दै. संध्या)**

उगवणारा सूर्य ज्याप्रमाणे चमकतो तस तुम्हाला सुद्धा आयुष्यात चमकायचं आहे. तुमच्या शाळेने दिलेल्या संस्काराची तुम्ही आयुष्यभर जपणूक करत आई-वडिलांच्या कष्टाचे सार्थक करा. आई-वडील व शिक्षक या तिघांचे तुमच्या आयुष्यात मोलाचे योगदान आहे, असे प्रतिपादन व्याख्याते सचिन वायकुळे यांनी केले. ग्लोरी इंग्लिश मीडियम स्कूल, उपळे दुमाला येथे इयत्ता दहावीच्या निरोप समारंभाच्या निमित्ताने आयुष्य घडवताना या विषयावर वायकुळे यांचे प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमात संस्थापक गणेश बुरगुटे व कविता बुरगुटे यांच्या हस्ते छत्रपती शिवराय व राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

निरोप समारंभप्रसंगी दहावीच्या आदित्य आगलावे, शंभू बुरगुटे, सुयश सातपुते आदी विद्यार्थ्यांनी मनोगतात शाळेबद्दल प्रेम आणि आपुलकी व्यक्त केली. प्रास्ताविक मुख्याध्यापक गणेश बुरगुटे यांनी केले.


# ४९ ग्रामपंचायतींवर प्रशासक राज

**उरुळी कांचन (दै. संध्या)**

हवेली तालुक्यातील सुमारे ४९ ग्रामपंचायतींची मुदत ८ फेब्रुवारी व ९ फेब्रुवारी २०२६ या दोन दिवसात संपलेली आहे. शासनाच्या नवीन नियमाप्रमाणे पाच वर्षे पूर्ण झाली की, दुसऱ्या दिवसापासून ग्रामपंचायतीवर प्रशासक कार्यरत होणार या धोरणाला अनुसरून ८ तारखेला मुदत संपलेल्या २४ ग्रामपंचायतींवर ९ तारखेपासून प्रशासक राज सुरू झाले. तर २५ ग्रामपंचायतींची मुदत ९ तारखेला संपल्यामुळे त्या ग्रामपंचायतींवर १० तारखेपासून प्रशासकराज सुरू झाले आहे. एकूण ४९ ग्रामपंचायतींवर या दोन दिवसांमध्ये प्रशासक राज सुरू झाले आहे. जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे यांनी सहा तारखेला याबाबतचा शासन आदेश जारी केला आहे. त्यानुसार उरुळी कांचन ग्रामपंचायतीवर शिरीष रामचंद्र मोरे विस्तार अधिकारी, पंचायत समिती हवेली यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली आहे.अष्टापुर, आंबी, आर्वी, आळंदी म्हातोबा, बकोरी, बहुली, बिवरी, भवरापूर, भावडी, डोणजे, डोंगरगाव, गाऊडदरा, गोऱ्हे बुद्रुक, गोऱ्हे खुर्द, घेरा सिंहगड हिंगणगाव, केसनंद, कोरेगाव मूळ, कोंढणपूर, कुंजीरवाडी, खडकवाडी, खेड शिवापूर,लोणी काळभोर या ग्रामपंचायतींची पाच वर्षाची मुदत ८ फेब्रुवारी २०२६ ला संपल्याने त्या ठिकाणी ९ फेब्रुवारी २०२६ पासून प्रशासकांच्या नियुक्त्या केल्या आहेत. थेऊर, मणेरवाडी, मांडवी बुद्रुक, मांडवी खुर्द, नायगाव, न्हावी सांडस, पेठ, प्रयागधाम, श्रीरामनगर, शिरसवडी, शिंदवणे, शिंदेवाडी, शिवापूर, सांगरूण, सांगवी सांडस, सोनापूर, सोरतापवाडी, तरडे, तुळापूर, उरुळी कांचन, वढू खुर्द, वरदाडे, वळती, वडकी, आगळंबे या गावांच्या ग्रामपंचायतीची मुदत ९ फेब्रुवारी २०२६ रोजी संपली आहे.

# मा. शिक्षण मंत्री श्री. दादाजी भुसे यांचा विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश

**बारामती (दै. संध्या)**



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षा उद्यापासून टप्प्याटप्प्याने सुरू होत आहेत. या महत्त्वाच्या शैक्षणिक टप्प्यावर राज्यातील लाखो विद्यार्थ्यांना धीर देण्यासाठी आणि त्यांचा उत्साह वाढवण्यासाठी राज्याचे शालेय शिक्षण मंत्री माननीय दादाजी भुसे यांनी एका विशेष व्हिडिओ संदेशाद्वारे संवाद साधला आहे.

"परीक्षा म्हणजे आयुष्याचा शेवट नसून एका सुंदर प्रवासाची ही सुरुवात आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांनी कोणत्याही दडपणाशिवाय आत्मविश्वासाने या परीक्षेला सामोरे जावे," असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

राज्यात १० फेब्रुवारीपासून इयत्ता १२ वीच्या आणि २० फेब्रुवारीपासून इयत्ता १० वीच्या परीक्षांना प्रारंभ होत आहे.

या पार्श्वभूमीवर बोलताना शिक्षण मंत्री श्री. भुसे म्हणाले की, विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी गेल्या अनेक महिन्यांपासून या परीक्षेसाठी मोठी मेहनत घेतली आहे. विद्यार्थ्यांच्या कष्टाला आणि जिद्दीला नक्कीच यश मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

विद्यार्थ्यांना भावनिक साद घालताना श्री.दादाजी भुसे म्हणाले, "जेव्हा तुम्ही परीक्षा केंद्रावर उत्तरपत्रिका लिहायला बसता, तेव्हा तुमच्या हातात केवळ कागद नसतो, तर त्यामध्ये तुमच्या आई-वडिलांनी पाहिलेली स्वप्ने दडलेली असतात. ही स्वप्नपूर्ती करण्यासाठी तुम्ही अहोरात्र कष्ट केले आहेत. त्यामुळे स्वतःच्या क्षमतेवर पूर्ण विश्वास ठेवा."

परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य उत्तम राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी सकारात्मक विचार करावा, पुरेशी झोप घ्यावी आणि सकस आहार घ्यावा, असा सल्ला त्यांनी दिला आहे. मन शांत ठेवून आणि हसतमुख राहून पेपर लिहिल्यास परीक्षेचा ताण जाणवणार नाही, असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

परीक्षेच्या शिस्तीबाबत मार्गदर्शन करताना त्यांनी विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर वेळेत पोहोचण्याचे आवाहन केले. "तुम्ही या देशाचे भविष्य आहात आणि तुमचा प्रामाणिकपणा हीच तुमची खरी ओळख आहे," अशा शब्दांत त्यांनी विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावले.

शेवटी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार आणि संपूर्ण राज्य शासनाच्या वतीने त्यांनी सर्व परीक्षार्थींना उज्ज्वल यशासाठी मनापासून शुभेच्छा दिल्या. आपल्या कष्टाच्या जोरावर विद्यार्थी राज्याचे नाव नक्कीच उज्ज्वल करतील, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

# पुणे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे निर्विवाद वर्चस्व

**मंचर (दै. संध्या)**



आंबेगाव तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने घवघवीत यश संपादन करत तालुक्यात आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. जिल्हा परिषदेच्या ५ पैकी ३ तर पंचायत समितीच्या १० पैकी तब्बल ८ जागांवर विजय मिळवत राष्ट्रवादीने स्पष्ट बहुमत मिळवले. शिवसेना (शिंदे गट), शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षांच्या आघाडीला अपेक्षित यश मिळाले नाही. या आघाडीला जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या प्रत्येकी दोन जागांवर समाधान मानावे लागले.

शिनोली–बोरघर गटातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या शीला राजेंद्र लोहकरे या १०,३६७ मते मिळवत विजयी झाल्या. त्यांनी राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या सरिता माळी यांचा ३,६४२ मतांनी पराभव केला.

पेठ–घोडेगाव गटात शिवसेनेच्या सुवर्णा दरेकर यांनी ११,६७४ मते मिळवत राष्ट्रवादीच्या मंगल हुले यांचा ३०६ मतांनी पराभव केला.

कळंब–चांडोली गटात राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या प्रीती थोरात या १५,६११ मते मिळवत १,५६१ मतांनी विजयी झाल्या. त्यांनी राष्ट्रवादीच्या तुलसी भोर यांचा पराभव केला.

पारगाव तर्फे अवसरी बुद्रुक–जारकरवाडी गटातून राष्ट्रवादी काँग्रेसचे विवेक वळसे पाटील १३,८०९ मते मिळवत २,८०७ मतांनी विजयी झाले. त्यांनी शिवसेनेचे अरुण गिरे यांचा पराभव केला.

अवसरी बुद्रुक–पिंपळगाव गटात राष्ट्रवादीचे विष्णू काका हिंगे पाटील १०,८७८ मते मिळवत ६०५ मतांनी विजयी झाले.

पारगाव–जारकरवाडी गटात झालेली लढत विशेष चर्चेची ठरली. माजीमंत्री दिलीप वळसे पाटील यांचे पुतणे विवेक वळसे पाटील यांनी शिवसेनेचे उमेदवार व जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अरुण गिरे यांचा २९९२ मतांनी पराभव करत बाजी मारली.

निवडणुकीपूर्वी अरुण गिरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस सोडून शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यांच्या विरोधात राष्ट्रवादीकडून विवेक वळसे पाटील मैदानात उतरले. शिंदे गटाची शिवसेना, राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) आणि शिवसेना (उबाठा) या तिन्ही पक्षांनी एकत्र येत एकच उमेदवार दिल्याने थेट एकास-एक लढत रंगली.

विवेक वळसे पाटील यांना पराभूत करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची पारगाव येथे जाहीर सभा झाली होती. मोठे शक्तीप्रदर्शन झाले, तरीही वळसे पाटील यांनी मतदारांचा विश्वास संपादन करत एकहाती विजय मिळवला. विशेष म्हणजे, माजीमंत्री दिलीप वळसे पाटील प्रचारात सहभागी नव्हते. प्रचाराची धुरा शिवाजीराव आढळराव पाटील यांनी सांभाळली.

पंचायत समितीच्या आठ जागा जिंकत राष्ट्रवादीने निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले. बोरघर गणात संजय गवारी, शिनोलीत ज्योती पारधी, घोडेगावात कैलासबुवा काळे, पेठमध्ये संजय पवळे, कळंबमध्ये उषा कानडे, जारकरवाडीत अंकिता वाळुंज, पिंपळगाव तर्फे महाळुंगे येथे शिवाजी निघोट आणि अवसरी बुद्रुक येथे निलेश टेमकर यांनी विजय मिळवला.

काही गणांमध्ये राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षालाही यश मिळाले. चांडोली बुद्रुक येथे प्रियंका वाघ तर पारगाव तर्फे अवसरी बुद्रुक येथे श्वेता ढोबळे विजयी झाल्या.

## राजकीय चित्र स्पष्ट

या निकालामुळे आंबेगाव तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद पुन्हा अधोरेखित झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पक्षाचे वर्चस्व वाढल्याने आगामी राजकीय समीकरणांवर या निकालाचा परिणाम होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. विवेक वळसे पाटील यांना जिल्हा परिषदेमध्ये महत्त्वाची जबाबदारी मिळण्याची शक्यता देखील व्यक्त केली जात आहे

## थोडक्यात पण महत्वाचे...




### इंदापूरमध्ये नव्या औद्योगिक पर्वाची सुरुवात!

- रत्नपुरी मळ्यात साकारणार नवी 'एमआयडीसी'
- दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे स्वप्न साकार
- रत्नपुरी मळ्यातील एक हजार एकर जमीन 'एमआयडीसी'कडे हस्तांतरीत करण्याचा मंत्रिमंडळाचा ऐतिहासिक निर्णय

मुंबई (दैनिक संध्या) : इंदापूर तालुक्यातील औद्योगिक विकासाला आज नवी दिशा मिळाली आहे. महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या रत्नपुरी मळ्यातील तब्बल एक हजार एकर जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे (एमआयडीसी) हस्तांतरित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मंत्रिमंडळाने घेतला असून, त्यामुळे इंदापूरमध्ये नवीन औद्योगिक वसाहतीचा मार्ग अधिकृतपणे मोकळा झाला आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी पदभार स्वीकारल्यानंतर झालेल्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला, ही बाब विशेष महत्त्वाची आहे. इंदापूर तालुक्यासाठी नवीन औद्योगिक वसाहत निर्मितीचे स्वप्न दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पाहिले होते. त्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. इंदापूरचे आमदार कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनीही यासाठी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्याकडे यासाठी पाठपुरावा केला होता. या निर्णयामुळे इंदापूर, बारामती व संपूर्ण पुणे जिल्ह्यातील औद्योगिक गुंतवणुकीला गती मिळणार असून, हजारो युवकांना रोजगाराच्या संधी, स्थानिक उद्योजकतेला चालना आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवे बळ मिळणार आहे. औद्योगिक विकासाच्या दिशेने महाराष्ट्राने आणखी एक निर्णायक टप्पा गाठला असून, इंदापूर लवकरच नव्या उद्योगांचा केंद्रबिंदू म्हणून उभे राहणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

### स्व. अजितदादा पवार यांच्या अस्थिकलशाचे त्रिवेणी संगमावर विधीवत विसर्जन



प्रयागराज (उत्तरप्रदेश) (दैनिक संध्या) : उत्तरप्रदेशातील पावन प्रयागराज येथे गंगा–यमुना–सरस्वती यांच्या त्रिवेणी संगमावर राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या पवित्र अस्थींचे परंपरेनुसार विधीवत व आदरपूर्वक विसर्जन करण्यात आले. या पवित्र भूमीत आत्मिक शांती, श्रद्धा व मोक्षाची अनुभूती उपस्थित कुटुंबीय व पदाधिकाऱ्यांनी घेतली. या प्रसंगी राष्ट्रवादी परिवारातर्फे काश्मीर ते कन्याकुमारी अशी काढण्यात आलेली स्व. अजितदादा पवार यांची देशव्यापी 'अस्थि-कलश यात्रा' विधीवतरीत्या पूर्णत्वास गेली. हरिद्वार येथून प्रारंभ झालेल्या या राष्ट्रव्यापी यात्रेचा समारोप प्रयागराजच्या त्रिवेणी संगमावर अत्यंत भावनिक वातावरणात पार पडला. या भावूक प्रसंगी स्वर्गीय अजितदादा पवार यांचे धाकटे चिरंजीव, युवानेते श्री. जय पवार हे कुटुंबीयांसह प्रयागराज येथे उपस्थित होते. पुरोहितांच्या सान्निध्यात अस्थि-कलशाचे पूजन करण्यात आल्यानंतर संगमाच्या व्हीआयपी घाटावर श्रद्धेने पवित्र अस्थी संगमात प्रवाहित करण्यात आल्या. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. धीरज शर्मा यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी परिवाराच्या वतीने पार पडलेल्या या समारोप सोहळ्यावेळी संगम घाटावर उपस्थित असलेल्या नागरिकांच्या डोळ्यांतून स्वर्गीय अजितदादा पवार यांच्याविषयीचे अपार प्रेम, आदर व सन्मान व्यक्त करण्यात आला. याप्रसंगी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. धीरज शर्मा, राष्ट्रीय सचिव श्री. धनंजय शर्मा, उत्तरप्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष श्री. हरिश्चंद्र सिंग, उत्तरप्रदेशातील भाजपचे प्रमुख नेते, तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मणिपूर पुन्हा पेटलं, उखरुलमध्ये गोळीबार, जाळपोळ; 5 दिवसांसाठी इंटरनेट बंद

मुंबई (दैनिक संध्या) : मणिपूरमधील उखरुल जिल्ह्यात मंगळवारी सकाळी तंगखुल नागा समुदायाच्या सदस्यावर झालेल्या कथित हल्ल्यावरून हिंसाचार उसळला, ज्यामुळे अनेक मोकळ्या घरांना आग लागली आणि गोळीबार करण्यात आला. परिस्थितीला आणखी चिगळू नये म्हणून राज्य सरकारने जिल्ह्यातील इंटरनेट सेवा पाच दिवसांसाठी बंद केली आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, उखरुल आणि कामजोंग जिल्ह्यात कुकी समुदायाच्या हालचालींवर दोन तंगखुल नागा संघटनांनी निर्बंध लादल्यानंतर दुसऱ्या दिवशी लिटन सारीखोंग परिसरात गोळीबार आणि जाळपोळ झाली. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, सशस्त्र व्यक्तींनी लिटन सारीखोंगमधील काही रिकाम्या घरांना आग लावली आणि गोळीबार केला. परिस्थिती तणावपूर्ण आहे आणि सुरक्षा दल परिस्थिती नियंत्रित करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी पुढे सांगितले की, मणिपूर सरकारने खबरदारी आणि प्रतिबंधात्मक उपाय म्हणून उखरुल जिल्ह्यातील महसूल क्षेत्रात ब्रॉडबँड, व्हीपीएन आणि व्ही-सॅट इंटरनेट सेवा पाच दिवसांसाठी बंद करण्याचे आदेश दिले आहेत. घरे सोडून जाणाऱ्या स्थानिकांनी सुरक्षा दलांवर परिसरातील गोळीबार थांबवण्यात अपयश आल्याचा आरोप करत संताप व्यक्त केला. सोशल मीडियावर फिरणाऱ्या एका व्हिडिओ क्लिपमध्ये डोंगराळ भागातून दाट धुराचे लोट येत असल्याचे दिसून आले आहे.

# महिलांच्या सुरक्षिततेसाठी कायदे अधिक कडक व प्रभावी करावेत

## उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे : संरक्षण अधिकारी व भरोसा सेलच्या अधिकाऱ्यांची एकत्रित समन्वय बैठक घेण्याच्या सूचना

मुंबई (दै. संध्या)

महिलांवरील अत्याचार, छळ आणि कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांना आळा घालण्यासाठी अस्तित्वात असलेले कायदे अधिक प्रभावी आणि काटेकोरपणे अंमलात आणणे आवश्यक आहे, असे विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी नमूद केले. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महिला व बाल विकास विभागाचे संरक्षण अधिकारी आणि पोलीस विभागाच्या भरोसा सेलच्या अधिकाऱ्यांची एकत्रित जिल्हा व तालुका तर शहरात झोन निहाय समन्वय बैठका घेण्यात याव्यात अशी स्पष्ट सूचना त्यांनी दिली.



विधानभवनात आयोजित उच्चस्तरीय बैठकीत कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, २००५ अधिक परिणामकारक करण्याबाबत, शक्ती विधेयकाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने पुढील दिशा ठरविण्याबाबत तसेच अर्नेश कुमार विरुद्ध बिहार राज्य या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयातील सुधारणा याचिकेवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बीएनएस प्रमाणे कार्यप्रणालीत ३५ अ ते आय या नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी पोलिसांनी केल्यास पिडीतांना दिलासा मिळेल म्हणुन पोलिसांनी योग्य ती कार्यप्रणाली तयार करावी अशाही सूचना उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिल्या . पुढील एका महिन्यात या सर्व बाबतीत पाठपुरावा करून संबंधित विभागांनी तपशील ठरवावा असेही सुचवण्यात आले.

या बैठकीचा अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांचेकडे पाठविण्यात येणार असल्याचे नीलम गोऱ्हे यांनी नमूद केले.

या बैठकीस पोलीस महासंचालक सदानंद दाते, अपर पोलीस अधीक्षक अश्वती दोरजे, माजी न्यायमूर्ती साधना जाधव, महिला व बाल विकास विभागाच्या आयुक्त नयना गुंडे, उपसचिव डॉ. जयंत सरोदे, विधि व न्याय विभागाचे उपसचिव सागर बोन्द्रे, गृह विभागाचे अवर सचिव जयसेन इंगोले उपस्थित होते.

डॉ. गोऱ्हे यांनी बैठकीदरम्यान नमूद केले की, महिलांचा आत्मसन्मान, सन्मान आणि सुरक्षितता यासाठी राज्य यंत्रणांनी समन्वयाने आणि संवेदनशीलतेने काम करण्याची गरज आहे. कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांमध्ये महिलांचा बळी जाणार नाही, यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक प्रभावी आणि काटेकोरपणे राबविणे आवश्यक आहे.

त्यांनी पुढे सांगितले की, महिलांना तातडीने न्याय मिळण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा अधिक सजग आणि संवेदनशील बनविणे अत्यावश्यक आहे. पोलीस विभाग आणि महिला व बाल विकास विभागाने संयुक्तरित्या कृती आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी जिल्हास्तरावर करावी. जिल्हास्तरीय महिला दक्षता समित्यांच्या कार्याचा नियमित आढावा घेऊन त्यांच्या कार्यक्षमता वाढविण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात.

पीडित महिलांना तातडीने संरक्षण आदेश मिळवून देणे, पोटगी मिळविण्याच्या प्रक्रियेत होणारा विलंब टाळणे, तसेच महिलांना कायदेशीर सल्ला मिळण्यासाठी जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाशी समन्वय वाढवणे या बाबींकडे विशेष लक्ष देणे गरजेचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

तसेच ज्येष्ठ सेवा तक्रार प्राधिकरणाबाबत अभ्यास करून अहवाल सादर करावा, अशी सूचनाही डॉ. गोऱ्हे यांनी यावेळी दिली. त्याचबरोबर, अर्नेश कुमार विरुद्ध बिहार राज्य प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयात सुधारणा याचिका दाखल करण्याबाबत कायदेशीर चाचपणी सुरू असून त्यावर चर्चा बैठकीत झाली.

उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी शेवटी सांगितले की, महिलांवरील अत्याचार हा समाजाच्या मनोवृत्तीशी निगडित गंभीर प्रश्न आहे. त्यामुळे फक्त कायदे कठोर करणे पुरेसे नाही, तर त्यांची अंमलबजावणी ही पारदर्शक, संवेदनशील आणि परिणामकारक असावी. महिलांचे सक्षमीकरण, न्यायप्राप्ती आणि सुरक्षिततेसाठी शासनाने एकत्रित प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे.

## यूएईमार्गे जागतिक व्यवसाय संधींचा विस्तार

पुणे (दै. संध्या)

जागतिक बाजारपेठेत प्रवेश आणि व्यवसाय विस्तारासाठी पुण्यात दोन दिवसीय B2B बैठकांचे आयोजन करण्यात येत आहे. FICCIच्या पुढाकारातून शारजाह एअरपोर्ट इंटरनॅशनल फ्री झोन (SAIF झोन), यूएई सरकार आणि Maharashtra Chamber of Commerce, Industry and Agriculture (MACCIA) यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. "यूएईद्वारे आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये तुमचा व्यवसाय वाढवा" या थीमवर आधारित या बैठका १० आणि ११ फेब्रुवारी २०२६ रोजी पुण्यातील JW Marriott Hotel Pune येथे होणार आहेत. पुणे आणि महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील उद्योग-व्यवसायांना यूएईमध्ये, विशेषतः SAIF झोनच्या माध्यमातून, ऑपरेशन्स सुरू करण्याच्या संधींबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

SAIF झोन हे या प्रदेशातील प्रगत, किफायतशीर आणि गुंतवणूकदार-अनुकूल मुक्त क्षेत्रांपैकी एक मानले जाते. या बैठकीत भारतीय कंपन्यांना मध्य पूर्व, आफ्रिका, युरोप आणि इतर आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी यूएई कसे प्रभावी जागतिक प्रवेशद्वार ठरू शकते, यावर विशेष मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच कंपनी स्थापन प्रक्रिया, परवाना, गोदाम सुविधा, लॉजिस्टिक्स उपाययोजना आणि बाजारपेठ प्रवेश धोरणांबाबत SAIF झोनचे वरिष्ठ अधिकारी थेट संवाद साधणार आहेत.

‘वंदे मातरम सुरक्षित तटम् समृद्ध भारतम्’ सायक्लोथॉन २०२६ या उपक्रमानिमित्त

## दिलखुलास आणि जय महाराष्ट्रमध्ये डेप्युटी कमांडंट विजय चकोर यांची विशेष मुलाखत

मुंबई (दै. संध्या)

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित लोकप्रिय ‘दिलखुलास’ आणि ‘जय महाराष्ट्र’ या कार्यक्रमांतून ‘वंदे मातरम सुरक्षित तटम् समृद्ध भारतम्’ सायक्लोथॉन २०२६ या उपक्रमावर आधारित केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाचे (सीआयएसएफ) डेप्युटी कमांडंट विजय चकोर यांची विशेष मुलाखत प्रसारित होणार आहे.



केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलातर्फे आयोजित करण्यात आलेल्या या सायक्लोथॉन उपक्रमाअंतर्गत सीआयएसएफच्या ६५ सायकलपटूंचे पथक १० ते १४ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत महाराष्ट्राच्या किनारपट्टी मार्गावर प्रवास करणार आहे. वंदे मातरम गीताच्या १५० व्या वर्षपूर्तीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या सायक्लोथॉनद्वारे किनारी भागातील नागरिकांमध्ये अमली पदार्थ, शस्त्रास्त्र आणि स्फोटकांच्या तस्करीविरोधात जनजागृती करण्यात येणार आहे. याशिवाय भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा, परंपरा तसेच किनारी सुरक्षेचे महत्त्व याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

या सायक्लोथॉनच्या राज्यातील प्रवासादरम्यान तारापूर, गेटवे ऑफ इंडिया, कुरूळ, लोणेरे, अंजनवेल आणि रत्नागिरी येथे विविध सांस्कृतिक व क्रीडा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यानंतर हे पथक पुढील प्रवासासाठी गोवा राज्याकडे रवाना होणार आहे. या उपक्रमाचे नियोजन, अंमलबजावणी आणि रूपरेषा याविषयी विजय चकोर यांनी ‘दिलखुलास’ आणि ‘जय महाराष्ट्र’ या कार्यक्रमांमधून सविस्तर माहिती दिली आहे.

‘दिलखुलास’ कार्यक्रमातील ही मुलाखत मंगळवार, १० आणि बुधवार, ११ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवर प्रसारित होणार असून, ती ‘News On AIR’ या मोबाईल ॲपवर देखील उपलब्ध राहणार आहे. तसेच ‘जय महाराष्ट्र’ कार्यक्रमात ही मुलाखत मंगळवार १० फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ८.०० वाजता माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अधिकृत समाजमाध्यमांवर प्रसारित करण्यात येणार आहे.

मा.उपमुख्यमंत्री यांचे जनसंपर्क अधिकारी देवेंद्र पाटील यांनी ही मुलाखत घेतली आहे.

## दावोस कराराद्वारे अहिल्यानगरमध्ये १२ हजार कोटींची गुंतवणूक; १८ हजार रोजगार निर्मिती - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### तौरल इंडियाच्या सुपा प्रकल्पाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

अहिल्यानगर (दै. संध्या)

दावोस कराराच्या माध्यमातून उत्तर महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांमध्ये ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आली असून, यात एकट्या अहिल्यानगर जिल्ह्यात ११ हजार ५१९ कोटी रुपयांची गुंतवणूक येणार आहे. याद्वारे १८ हजार रोजगाराची निर्मिती होणार असून उत्तर महाराष्ट्रामध्ये जवळपास ७५ हजार लोकांना रोजगार मिळेल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

सुपा (ता. पारनेर) एमआयडीसी येथे 'तौरल इंडिया'च्या अत्याधुनिक उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, खासदार भागवत कराड, आमदार काशिनाथ दाते, सुरेश धस, विक्रमसिंह पाचपुते, तौरल इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक भरत गीते व थोनी ॲल्युमिनियमचे लोथर थोनी आदी उपस्थित होते.

इतक्या मोठ्या प्रमाणात जिल्ह्यात गुंतवणूक येत असल्याचे नमूद करीत, मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, तौरल इंडियाचा हा प्रकल्प महाराष्ट्राच्या औद्योगिक आत्मनिर्भरतेचे प्रतीक आहे. स्वतंत्र व आत्मनिर्भर भारत घडविण्यासाठी 'मेक इन इंडिया' संकल्पना अत्यंत महत्त्वाची आहे. ज्या वस्तूंची आपल्याला आयात करावी लागते, त्याला सक्षम पर्याय देशातच निर्माण करणे ही काळाची गरज आहे. परदेशातून आयात कराव्या लागणाऱ्या गोष्टी आता भारतात व विशेषतः महाराष्ट्रात भरत गीते यांच्यासारख्या उद्योजकांमुळे तयार होत आहेत, ही अभिमानाची बाब आहे.



राज्याच्या औद्योगिक प्रगतीचा समतोल राखण्यावर शासनाचा भर आहे. पूर्वी राज्याची औद्योगिक प्रगती केवळ मुंबई, एमएमआर व पुणे या भागांपुरती मर्यादित होती. ती विकेंद्रित करून राज्याच्या सर्व भागांत पोहोचविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. सुपा एमआयडीसी हे त्याचेच एक उत्तम उदाहरण आहे. केवळ सामंजस्य करार करून न थांबता, ते प्रत्यक्षात आणण्यासाठी उद्योग विभाग तत्परतेने काम करत आहे. दावोसमध्ये २०२५ मध्ये करण्यात आलेला करार अत्यंत वेगाने प्रत्यक्षात आला आहेत, असेही श्री. फडणवीस यांनी नमूद केले.

ते पुढे म्हणाले, देशाच्या अर्थव्यवस्थेने ११ व्या क्रमांकावरून चौथ्या क्रमांकावर झेप घेतली असून लवकरच आपण तिसऱ्या क्रमांकावर पोहोचू. भारताच्या ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या प्रवासात तंत्रज्ञान व उत्पादन क्षेत्राचा वाटा मोलाचा ठरणार आहे. या प्रवासात महाराष्ट्र भक्कम पाऊले टाकत आहे. दावोस दौऱ्यात १६ लाख कोटींचे करार करण्यात आले असून, त्यातील ७५ टक्के करार हे अंमलबजावणीच्या मार्गावर आहेत.

केवळ उद्योग उभारणे पुरेसे नाही, तर ते पर्यावरणपूरक असणे आवश्यक आहे. या प्रकल्पात 'सस्टेनेबल कास्टिंग' व 'रिसायकलिंग'वर भर देण्यात आला असून, राज्यात 'उद्योग व पर्यावरण' हातात हात घालून पुढे जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

उद्योजकांनी राज्याचे दूत म्हणून काम करावे, असे आवाहन करत श्री. फडणवीस यांनी उद्योगांना सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

भारत सरकारच्या ऊर्जा सुरक्षितता, शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या ‘सक्षम २०२५-२६ (संरक्षण क्षमता महोत्सव)’ हे राष्ट्रीय अभियान १ ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत (तेल आणि गॅस वाचवा, हरित ऊर्जा स्वीकारा)” या घोषवाक्यासह संपूर्ण देशभर राबविण्यात येत आहे त्यानिमित्त...

# स्वच्छ पर्यावरणासाठी सक्षम अभियानाचा संकल्प!

मुंबई (दै. संध्या)

जागतिक पातळीवर वेगाने बदलणाऱ्या हवामानामुळे आणि वाढत्या प्रदूषणामुळे मानवासमोर आज मोठे आव्हान उभे राहिले आहे. पारंपरिक इंधनांचा वापर दिवसागणिक वाढत गेल्याने निसर्गावर मोठा ताण पडत असून, त्याचे दुष्परिणाम आरोग्य, पर्यावरण आणि अर्थव्यवस्थेवर ठळकपणे दिसू लागले आहेत. भविष्यात हे संकट आणखी भयावह होवू नये यासाठी समाजाने स्वच्छ, शाश्वत आणि पर्यावरणपूरक ऊर्जेकडे प्राधान्याने वळणे, ही काळाची गरज बनली आहे.

कोळसा, पेट्रोल, डिझेल यासारखी पारंपरिक इंधने मर्यादित स्वरूपाची आहेत. त्यांच्या ज्वलनामुळे मोठ्या प्रमाणात कार्बन डायऑक्साइड, कार्बन मोनॉक्साइड आणि इतर घातक वायू वातावरणात मिसळतात. यामुळे जागतिक तापमानवाढ, हवामानातील टोकाचे बदल, पावसाचे असमतोल स्वरूप तसेच आरोग्यविषयक समस्या वाढत आहेत. श्वसनविकार, हृदयविकार आणि त्वचारोग




यांसारखे आजार याच प्रदूषणाशी थेट जोडलेले आहेत. यावर उपाय म्हणून नवी ऊर्जा क्रांती आकार घेत आहे. सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, जलविद्युत, बायोगॅस, बायो-इंधन आणि हरित हायड्रोजन यांसारखे पर्याय आज प्रभावीपणे पुढे येत आहेत. या ऊर्जास्रोतांची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे, ते अक्षय आहेत आणि पर्यावरणाला कमीत कमी हानी पोहोचवतात.

आणि पवन ऊर्जा निर्मितीमुळे इंधन आयातीवरील खर्च कमी होऊन देशाची आर्थिक बचतही होते. ऊसाच्या चिपाडापासून बनविल्या जाणाऱ्या इथेनॉलसारख्या पर्यायी इंधनाकडेही आपला देश गांभीर्याने पाहू लागला आहे.

अलीकडच्या काळाचा विचार केल्यास, वाहतूक क्षेत्रातही मोठे बदल होतांना दिसत आहेत. इलेक्ट्रिक वाहने, हायब्रिड वाहने आणि पर्यायी इंधनावर चालणारी वाहने यांचा वापर वाढत आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत प्राधान्याने स्वच्छ इंधनाचा समावेश केल्यास प्रदूषणावर प्रभावी नियंत्रण मिळवता येऊ शकते. यासोबतच इंधन बचतीच्या सवयी, कार पूलिंग, सायकलचा वापर आणि पायी चालण्यास प्रोत्साहन देणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

घरगुती पातळीवरही स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढवता येऊ शकतो. सौर पॅनल्सद्वारे वीज निर्मिती, बायोगॅस प्रकल्प, ऊर्जा कार्यक्षम उपकरणांचा वापर आणि विजेचा अपव्यय टाळणे या छोट्या गोष्टी मोठा बदल घडवू शकतात. शाश्वत जीवनशैली स्वीकारणे म्हणजे केवळ पर्यावरणाचे संरक्षण नव्हे, तर पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित भविष्य घडवण्याच्या दृष्टीने या ऊर्जा क्रांतिकडे पाहायला हवे.

या दिशेने केंद्र व राज्य सरकारांकडून विविध अभियानांद्वारे जनजागृती केली जात आहे. ‘सक्षम’सारख्या मोहिमा नागरिकांना पर्यायी इंधनांचा स्वीकार करण्यासाठी प्रेरित करत आहेत. उद्योग क्षेत्र, तसेच शहरे आणि ग्रामीण भागातही हरित ऊर्जेचा वापर वाढवण्यासाठी धोरणात्मक पावले उचलली जात आहेत. यामध्ये संशोधन, नवतंत्रज्ञान आणि स्थानिक सहभाग आदिला विशेष महत्त्व दिले जात आहे.

स्वच्छ पर्यावरण हा केवळ सरकारचा किंवा एखाद्या संस्थेचा विषय नसून, ती प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. आज प्रत्येक स्तरावर घेतलेले छोटे निर्णय उद्याच्या मोठ्या संकटांना टाळू शकतात. पर्यायी ऊर्जेचा वापर, इंधन बचत, वृक्षसंवर्धन आणि पर्यावरणपूरक सवयी अंगीकारल्यास हरित, सुरक्षित आणि समृद्ध भविष्यासाठी आपण भक्कम पायाभरणी करू शकतो. हीच खरी ऊर्जा क्रांती असून तिच्यात आपण सर्वांनी सहभागी होणे, ही काळाची गरज आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### सुपे उपबाजार येथे चिंच लिलावाचा शुभारंभ



सुपा (बारामती) (दैनिक संध्या) : चालु चिंच हंगाम सुरू झाला असुन दरवर्षी प्रमाणे यावर्षी चिंच लिलावाचा शुभांरभ शनिवार दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी सुपे उपबाजार येथे होणार आहे. बारामती कृषि उत्पन्न बाजार समितीचे सुपे उपबाजार येथील चिंच लिलाव हा राज्यात प्रसिद्ध आहे.यावर्षी चिंचेस वातावणरण पोषक असल्याने यावर्षी आवक चांगली होईल.तरी शेतक-यांनी आपली चिंच स्वच्छ,वाळवुन व चांगल्या पॅकींग मध्ये आणावी असे आवाहन सभापती विनायक गावडे व उपसभापती अरूण सकट यांनी केले आहे.सुपे उपबाजार आवारात गतवर्षी अखंड चिंचेची एकुण ३८००० पोत्यांची आवक झाली असुन चिंचेस प्रति क्विंटल रू. ७०००/- असा उच्चांकी दर मिळाला होता तर किमान दर रू. २५००/- निघाले होता. फोडलेल्या चिंचेस प्रति क्विंटल कमाल दर रू. १३०००/- तर सरासरी दर प्रति क्विंटल रू. १०,०००/- मिळाला होता. बारामती तालुक्यातील तसेच शिरूर, दौंड, पुरंदर, फलटण, श्रीगोंदा, इंदापुर, भोर इत्यादी तालुक्यातुन व राज्यातील इतर जिल्ह्यातुन चिंच विक्री साठी दरवर्षी येत असते.सुपे उपबाजारात चिंचेचे लिलाव दर शनिवारी सकाळी ११.०० वाजता सुरू होतील.त्यामुळे शेतक-यांनी आपली चिंच लिलावापुर्वी विक्रीस आणावी.शेतमालाचा लिलाव हा उघड लिलाव पद्धतीने व शेतमालाचे वजनमाप इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यावर लिलावा पुर्वी होत असल्याची माहिती सचिव श्री.अरविंद जगताप यांनी दिली.

### इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत पुरस्कारांसाठी प्रस्ताव पाठविण्याबाबत

पुणे (दैनिक संध्या) : इतर मागास विकास विभागांतर्गत कार्यरत इतर मागास जनकल्याण संचालनालय, पुणे यांच्यामार्फत शासन निर्णयानुसार पात्र व इच्छुक व्यक्ती तसेच संस्थांकडून विविध पुरस्कारांसाठी रितसर प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. शासन निर्णयानुसार महात्मा बसवेश्वर सामाजिक समता-शिवा पुरस्कार, नटराज पुरस्कार, विश्वकर्मा पुरस्कार तसेच क्रांतीवीर राजे उमाजी नाईक पुरस्कार यासाठी प्रस्ताव सादर करता येणार आहेत. अर्जदार व्यक्ती अथवा संस्था महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असणे आवश्यक असून संबंधित समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक अथवा अन्य क्षेत्रातील सलग व उल्लेखनीय कार्य केलेले असणे आवश्यक आहे. अर्ज विहित नमुन्यात आवश्यक कागदपत्रांसह सादर करणे बंधनकारक असून अपूर्ण किंवा मुदतीनंतर प्राप्त होणारे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत. प्रस्ताव २१ फेब्रुवारी २०२६ पर्यंत संबंधित जिल्ह्याचे सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, पुणे यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करावेत. अर्जाचा नमुना, सविस्तर अटी व शर्ती तसेच अधिक माहिती सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, पुणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, येरवडा, पुणे येथे उपलब्ध असून पात्र व इच्छुक व्यक्ती व संस्थांनी विहित मुदतीत प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन करण्यात येत आहे.


### इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या योजनांसाठी अर्जास मुदतवाढ

पुणे (दैनिक संध्या) : सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, पुणे यांच्या मार्फत इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या शासकीय वसतिगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेअंतर्गत अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. काही जिल्ह्यांतील वसतिगृहांमध्ये जागा रिक्त राहिल्याने प्रथम वर्षातील पात्र विद्यार्थ्यांना संधी देण्यासाठी ही मुदतवाढ देण्यात आली असून, ऑनलाईन वसतिगृह प्रवेश प्रणालीद्वारे अर्ज करण्याची अंतिम मुदत १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच पहिल्या निवड यादीनुसार प्रवेशाची अंतिम मुदत २६ फेब्रुवारी २०२६ निश्चित करण्यात आली आहे. १२ वी नंतर बी.ए., बी.कॉम., बी.एससी. तसेच व्यावसायिक व बिगर व्यावसायिक उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या योजना लागू आहेत. पात्र विद्यार्थ्यांनी मुदतवाढीचा लाभ घेऊन अर्ज सादर करावा, असे आवाहन सहायक संचालक श्री. प्रदीप संकपाळ यांनी केले आहे. अर्जासंबंधी अधिक माहितीसाठी सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, पुणे कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सर्व्हे नं. १०४/१०५, येरवडा पोलीस स्टेशनसमोर, विश्रांतवाडी, पुणे-६ येथे संपर्क साधावा किंवा अधिकृत संकेतस्थळास भेट द्यावी.

### पुणे जिल्ह्यात स्टेप अल्पकालीन रोजगारक्षम प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ

पुणे (दैनिक संध्या) : पुणे जिल्ह्यातील 15 ते 45 वयोगटातील पात्र उमेदवारांसाठी अल्पकालीन रोजगारक्षम प्रशिक्षण कार्यक्रमाचा (स्टेप) नुकताच शुभारंभ करण्यात आला. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत जिल्ह्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) व शासकीय तांत्रिक विद्यालयांमध्ये हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत उपलब्ध आधुनिक सुविधा व अत्याधुनिक प्रशिक्षण साधनांचा वापर करून तज्ज्ञ निदेशकांमार्फत अद्यावत तंत्रज्ञानावर आधारित अल्प मुदतीचे, मागणी आधारित प्रशिक्षण देण्यात येणार आहे. उद्योग क्षेत्रातील गरजांचा विचार करून उमेदवारांना आवश्यक असलेल्या प्रगत कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाणार असून, त्याद्वारे रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी वाढविण्याचा उद्देश आहे. पुणे जिल्ह्यात आंबेगाव ITI येथे 6, बारामती 5, भोर 1, दौंड 1, इंदापूर 4, जुन्नर 5, खेड 6, मावळ 5, मुळशी 1, हवेली महिला ITI 12, औंध ITI 15, पिंपरी-चिंचवड ITI 6, पुरंदर 6, शिरूर 3 व वेल्हे ITI येथे 2 असे एकूण विविध अल्पकालीन प्रशिक्षण कोर्स राबविले जाणार आहेत. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना प्रमाणपत्र देण्यात येणार असून, हे प्रमाणपत्र संबंधित क्षेत्रात रोजगार व स्वयंरोजगार मिळविण्यास उपयुक्त ठरणार आहे. या संधीची माहिती अधिकाधिक युवकांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन श्री. सु. रा. वराडे, सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पुणे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी इच्छुक उमेदवारांनी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, 481, रास्ता पेठ, पुणे येथे किंवा दूरध्वनी क्रमांक (020) 26133603 वर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

### जेष्ठ प्रवचनकार मिनाताई पवार यांचे निधन



जेजुरी (दैनिक संध्या) : जेजुरी येथील जेष्ठ प्रवचनकार, कीर्तनकार श्रीमती मीनाताई साहेबराव पवार यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे मुले सूना नातवंडे असा मोठा परिवार आहे. कै मीनाताई पवार यांनी जेजुरी येथील संत काशिनाथ महाराज विठ्ठल मंदिरात 35 वर्षे कीर्तन प्रवचन सेवा केली. आळंदी ते पंढरपूर 25 वर्षे, आळंदी ते त्रिंबकेश्वर 12 वर्ष पायी वारी केली. वारकरी संप्रदाय व अध्यात्मिक विचार रुजविण्यासाठी त्यांनी जेजुरी महिलांसाठी पुढाकार घेतला होता. महिलांसाठी अनेक धार्मिक स्थळी त्यांनी धार्मिक सहलींचे आयोजन केले होते. त्यांच्या निधनाने महिला वर्गाने हळहळ व्यक्त केली. जेजुरी येथील कैलास स्मशान भूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. संत काशिनाथ महाराज विठ्ठल मंदिर ट्रस्ट , संत जनाबाई महिला मंडळ, जेजुरी नगरपरिषदेच्या वतीने त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

# जागा उपलब्ध नसल्याने भाजीपाला विक्रेत्यांचे हाल

**चाकण येथील स्थिती**




> “भाजीपाला विक्रेत्यांसाठी चाकण नगरपरिषदेने पुरेशी जागा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. रुग्णवाहिका सुद्धा वाहतूक कोंडीत अडकत आहेत. वाहतूक पोलीस प्रशासनाने अवैध वाहतूकीला आळा घालणे आवश्यक असून, नागरिकांना मनस्ताप होणार नाही यासाठी ठोस उपाययोजना केल्या पाहिजेत.”
> - ॲड. संकेतभाऊ मेदनकर, उपसरपंच, मेदनकरवाडी,

चाकण (दै. संध्या)

विस्तारत्या चाकणमध्ये पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने भाजीपाला विक्रेत्यांचे अतोनात हाल होत आहेत. दर रविवारी आणि गुरुवारी चाकण येथे भाजीपाल्याचा मोठा बाजार भरतो.

चाकण पंचक्रोशीतून शेतकरी भाजीपाला विक्रीसाठी चाकण येथे आणतात. भाजी विक्रीसाठी कुठे बसावे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. चाकण नगरपरिषदेने भाजीपाला विक्रेत्यांना माल विकण्यासाठी जागा उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे शेतकरी आपला माल विकण्यासाठी चाकण एसटी बस स्थानक परिसर, मुटकेवाडी रस्त्यालगत तसेच चाकण - शिक्रापूर रस्त्यावरील माणिक चौका लगत सदगुरु कॉम्प्लेक्स समोर अगदी रस्त्याला खेटून बसत आहेत. त्यामुळे शेतकरी व ग्राहक त्रस्त झाले असून, आपोआपच वाहतूक कोंडीला निमंत्रण मिळत आहे. त्यामध्ये अवैध रिक्षांचा सुळसुळाट सुरू आहे.

अत्यंत वर्दळ असलेल्या या रस्त्यावर नेहमीच वाहतूक कोंडी होत असल्याने सर्वचजण वैतागले आहेत.

वाहनचालक बेदरकारपणे वाहने चालवत असल्याने ओव्हरटेकच्या प्रयत्नात सुपातील जात्यात येऊन अनेकजण अलगदपणे भरडले गेले आहेत. भाजीपाला विक्रेत्यांना पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने विक्रेत्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. वाहतूक कोंडी आणि अपुरे रस्ते हे एकच समीकरण होऊ लागले असून, येथील स्थानिक व्यापारी अक्षरशः रडकुंडीला आले आहेत.

## काम करत आलोय काम करत राहू - महेंद्रशेठ मेदनकर



चाकण (दै. संध्या)

काम करत आलोय काम करत राहु, ह्या युक्ती प्रमाणे गेल्या अनेक वर्षापासून मी मनापासून झपाटल्यासारखे गोरगरीब जनतेची पडेल ती कामे आणि सेवा करत आहे, असे खेड पंचायत समितीचे नवनिर्वाचित सदस्य महेंद्रशेठ मेदनकर यांनी सांगितले. मेदनकर यांनी सांगितले की," मी न थांबता न थकता दुसरा कोणाचा निधी न घेता काम करत आहे. आणि त्यापासून मला काही फायदा व्हावा, असे काहीही नाही. फक्त गोरगरिबांची सेवा, गरजुंना मदत एवढेच ध्येय डोळ्यासमोर ठेऊन काम करत आलोय. त्यामुळे या निवडणुकीत माझ्या हाताला अजुन जोड मिळावी यासाठी मी राजकारणातून थोडे फार सहकार्य मिळवून फक्त समाजाची सेवा करण्यासाठी पुढाकार घेत आहे. लोक म्हणतात उमेदवार फक्त इलेक्शन पुरते येतील. आणि परत पाच वर्ष यायचे पण नाही. पण तुम्ही जनतेतून बाहेर न गेलेला तुमचा जनसेवक निवडला आहे. की जो मागील काही वर्ष झपाटल्यासारखे जनतेची पडेल ती कामे करतोय. कुठलाही स्वार्थ न ठेवता बस्स. आपण जनतेचे काहीतरी देणे लागतो. या युक्तीप्रमाने म्हणुनच मायबाप जनतेला हिच विनंती करतो की, मी काम करत राहणार आहे. मी तुमचे मतदान वाया जाऊन देणार नाही. कोणाच्याही विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. मेदनकरवाडी गणाचा विकास हाच माझा ध्यास राहील.

## जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत राष्ट्रवादीचा झंझावात

बारामती (दै. संध्या)

- गड आला पण आमचा सिंह गेला, हा विजय अजित पवार यांना समर्पित
- बारामतीच्या सर्व सहा जागांवर राष्ट्रवादीचा विजय, पंचायत समितीवरही झेंडा







राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या बारामतीत जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने वर्चस्व कायम राखले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर पहिल्यांदाच झालेल्या या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले होते.यात जिल्हा परिषदेच्या सहापैकी सहा जागांवर तर पंचायत समितीच्या 12 पैकी १० जागांवर राष्ट्रवादी काँग्रेसने तर 2 जागांवर भाजपाने दणदणीत विजय संपादन केला.पंचायत समितीतील सुपे व शिर्सुफळ गणात भाजपच्या दोन उमेदवारांनी विजय संपादन केला.या दोन्ही जागेवर राष्ट्रवादीने उमेदवारी दिली नव्हती.राष्ट्रवादी पुरस्कृत उमेदवार म्हणूनच या भाजपच्या दोन्ही उमेदवारांची चर्चा होती.

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत राष्ट्रवादी विरोधात भाजप, बसपा तसेच शिवसेना, मनसे हे पक्ष निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते.काही जागा वगळता भाजपाने सर्व ठिकाणी उमेदवार दिले होते. तर बसपा व शिवसेना,मनसेने काही ठिकाणी उमेदवार उभे केले होते.मात्र,दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर कोणीही प्रचार यंत्रणा राबवली नाही.त्यामुळे बारामती तालुक्यात राष्ट्रवादीच्या बाजूने सहानुभूतीची लाट तयार झाली होती. बारामतीकरांवर दुःखाचे सावट होते,त्यामुळे मतदानादिवशी देखील मतदारांनी मतदानाकडे पाठ फिरवल्याचे दिसून आले. यंदा बारामतीत मतदानाचा टक्का त्यामुळे घसरल्याचे दिसून आले.

तालुक्यात एकूण ५४.९० टक्के मतदान झाले आहे.सोमवार ९ फेब्रुवारी रोजी दहा वाजता मतमोजणी प्रक्रियेला सुरुवात झाली.त्यानंतर राष्ट्रवादीच्या उमेदवारांनी विजयी आघाडी घेण्यास सुरुवात केली.राष्ट्रवादीचा हा विजयी झंझावात कायम राहिला. भाजप,शिवसेना, बसपा यांचा निवडणुकीत सुपडा साफ झाला आहे.अजित पवार यांच्या निधनामुळे बारामती तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार, कार्यकर्त्यांनी कोणत्याही प्रकारचा जल्लोष साजरा न करता आमचा झालेला विजय हा अजित पवार यांना समर्पित करत असल्याचे सांगितले.

## शिरूरच्या बेट भागातील राष्ट्रवादीचा किल्ला ढासळला

**टाकळी हाजी-कवठे गण, गटात कमळ फुलले : पक्षांतर करून ही माजी आमदार गावडे यांचे निर्विवाद वर्चस्व कायम**

कवठे येमाई (दै. संध्या)



संपूर्ण पुणे जिल्ह्यात लक्षवेधी ठरलेल्या शिरूरच्या बेट भागातील टाकळी हाजी-कवठे गण,गटात कमळ फुलले असून मागील ५० वर्षांचा राष्ट्रवादी काँग्रेसचा अभेद्य राहिलेला हा किल्ला ढासळल्याचे पहावयास मिळाले. या निवडणुकीत शिरूरचे माजी आमदार पोपटराव गावडे यांचे चिरंजीव,भारतीय जनता पार्टीचे उमेदवार राजेंद्र पोपटराव गावडे यांनी तब्बल ३३८५ मतांनी दणदणीत विजय मिळवत इतिहास घडवला.याच गटातील टाकळी हाजी पंचायत समिती गणातून सुनीता बाळकृष्ण कड यांनी ११२३ मतांनी, तर कवठे येमाई पंचायत समिती गणातून कांचन राजेंद्र सांडभोर यांनी ११०२ मतांनी विजय मिळवल्याने भाजपने तिन्ही जागांवर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले.

निवडणुकीच्या सुरुवातीला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आदेशानुसार राजेंद्र गावडे यांनी प्रचार सुरू केला होता. माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या सूचनेनुसार त्यांनी संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढला होता.मात्र ऐनवेळी राजेंद्र गावडे यांचे तिकीट कापण्यात आले.त्यामुळे गावडे समर्थकांमध्ये तीव्र नाराजी पसरली.

प्रचार करायला सांगायचं आणि ऐनवेळी तिकीट कापायचं या भूमिके विरोधात गावडे समर्थक एकवटले. टाकळी हाजी, कवठे येमाई सह संपूर्ण गटात “पक्ष कोणताही असो,पोपटराव गावडे हेच हवेत ” अशी भूमिका स्पष्ट झाली. आणि समर्थकांच्या आग्रहाखातर राजेंद्र गावडे यांनी भाजपमध्ये प्रवेश करून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला.भाजपच्या वरिष्ठ नेत्यांच्या प्रचार सभा झाल्याच नाहीत तरी ही उमेदवार व कट्टर समर्थकांनी घराघरांत थेट मतदारांशी संपर्क साधत जोरदार प्रचार केला.या गटात भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना (शिंदे गट) व शिवसेना (उबाठा) अशी थेट चौरंगी लढत झाली. मात्र कोणतीही प्रचार सभा न होता देखील मतदारांनी स्पष्ट कौल देत भाजपच्या तिन्ही उमेदवारांना विजयी केले.

गेल्या ६ दशकांपासून शिरूरचे माजी आमदार पोपटराव गावडे यांची निर्विवाद सत्ता या भागात राहिली आहे.यावेळीही पक्ष बदलला,चिन्ह बदलले पण मतदारांचा तोच विश्वास कायम राहिल्याचे निकालानंतर स्पष्ट झाले.कवठे येमाई–टाकळी हाजी गटातील हा निकाल पुणे जिल्ह्याच्या राजकारणात नवा टर्निंग पॉइंट ठरला असून, राष्ट्रवादीला मोठा धक्का आणि भाजपसाठी ऐतिहासिक यश म्हणून पाहिला जात आहे.

## १२वीची परीक्षा सुरू; नीरा केंद्रात दोन महाविद्यालयातील २८२ परिक्षार्थी

नीरा (दै. संध्या)

- परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची बारावी (एच.एस.सी) बोर्डाची परिक्षा आज पासून सुरू झाली आहे. नीरा येथील महात्मा गांधी विद्यालय व किलाचंद कनिष्ठ महाविद्यालयातील परीक्षा केंद्रामध्ये २८२ परिक्षार्थी परिक्षा देत आहेत. परिक्षार्थ्यांना बोर्डाच्या परीक्षेचा ताण तणाव असतो तो दुर करण्यासाठी नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विक्रम दगडे, नीराचे माजी ग्रामपंचायत सदस्य संदिप धायगुडे अनिल चव्हाण यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाबपुष्प देऊन केले. तर विद्यार्थ्यांना निर्भय वातावरणामध्ये कोणत्याही प्रकारचा ताण तणाव नघेता पेपर सोडवण्याच्या सूचना दिल्या. नीरा केंद्रावर परिसरातील तीन कनिष्ठ महाविद्यालयातील विध्यार्थी परीक्षा देत आहेत. यामध्ये नीरेतील किलाचंद कनिष्ठ महाविद्यालयातील १८७ , वाल्हा येथील महर्षी वाल्मिक कनिष्ठ महाविद्यालयातील ९५ असे एकूण २८२ विध्यार्थी परिक्षेसाठी बसले आहेत. मंगळवार दि. १० फेब्रुवारी रोजी सकाळी अकरा वाजता परिक्षा सुरळीत सुरू झाली. नीरा येथील परिक्षा केंद्रात १२ वर्ग खोल्यांमधुन बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. परिक्षेसाठी लागणाऱ्य सर्व सोयी सुविधा पुरविण्यात आल्या असल्याची माहिती किलाचंद ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य व केंद्रसंचालक अनिल धुमाळ यांनी दिली. या परिक्षा केंद्रावर दक्षता कमीटीची नेमणूक केली आहे. परिक्षा काळात कोणताही अनुचीत प्रकार घडु नये म्हणून जेजुरी पोलिस स्टेशनचे प्रभारी अधिकारी दीपक वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली नीरा पोलीस दुरक्षेत्राताचे हवालदार हरिश्चंद्र करे पोलिस कॉन्स्टेबल प्रसाद कोळेकर व दोन होमगार्डचे कर्मचारी बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले आहेत.

# खेड तालुक्यात निवडणुकीमुळे बदलली राजकीय समीकरणे

चाकण (दै. संध्या)

**दिग्गजांचा निसटता विजय**

प्रचंड टोकाचे राजकारण असलेल्या खेड तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचे निकाल जाहीर होताच तालुक्याच्या राजकारणात मोठा आणि निर्णायक बदल झाल्याचे स्पष्टपणे समोर आले आहे. या निवडणुकीत मातब्बर आणि दिग्गजांचा निसटता विजय झाला आहे, ही वस्तुस्थिती समोर आली आहे. खेड तालुक्यात या निवडणुका शिवसेना अर्थात उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे आमदार बाबाजी काळे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार दिलीप मोहिते यांच्यासाठी अत्यंत प्रतिष्ठेच्या लढती ठरल्या. निकालानंतर तालुक्यातील सत्ता समीकरण आमदार बाबाजी काळे यांच्या बाजूने झुकल्याचे चित्र स्पष्ट झाले. खेड तालुक्यातील एकूण ८ जिल्हा परिषद गटांपैकी ५ गटांवर मशाल चिन्हाने अर्थात शिवसेना उबाठा गटाने दणदणीत विजय मिळवला. तर ३ गटांवर घड्याळ चिन्हावर म्हणजेच राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार विजयी झाले आहेत. या निकालामुळे आमदार बाबाजी काळे यांचे तालुक्यातील राजकीय नेतृत्व अधिक भक्कम झाल्याचे स्पष्ट झाले असून, मशाल चिन्हाला ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात जनसमर्थन मिळाल्याचे दिसून आले.

पंचायत समितीच्या निकालांकडे पाहता शिवसेना उबाठा गटाला निर्णायक बहुमत मिळाले आहे. शिवसेना उबाठा गटाचे ९ सदस्य विजयी झाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे ६ सदस्य विजयी झाले. शिवसेना शिंदे गटाचा एक सदस्य विजयी झाला. या आकडेवारी नुसार पंचायत समितीवर सत्ता स्थापन करण्यासाठी शिवसेना उबाठा गट अत्यंत मजबूत स्थितीत असून, सत्ता स्थापनेचा मार्ग जवळपास मोकळा झाला आहे.

माजी आमदार दिलीप मोहिते यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसला काही महत्त्वाच्या जागांवर यश मिळाले असले, तरी तालुक्यावर अपेक्षित वर्चस्व प्रस्थापित करण्यात पक्षाला अपयश आले आहे. विशेषतः ग्रामीण भागात मशाल चिन्हाचा वाढता प्रभाव आणि संघटनात्मक ताकद राष्ट्रवादी काँग्रेससाठी आगामी काळात चिंतेचा विषय ठरण्याची शक्यता आहे.

विशेष म्हणजे नुकत्याच झालेल्या राजगुरूनगर आणि चाकण नगरपरिषद निवडणुकीत एकहाती सत्ता स्थापन करणाऱ्या शिंदे सेनेला जिल्हा परिषदेला आपले खातेही उघडता आले नाही. ही धक्कादायक बाब आहे. फक्त एका जागेवर पंचायत समितीला समाधान मानावे लागले असल्याने तालुक्यातील शिंदे सेनेच्या नेत्यांना आत्मपरीक्षण करावे लागणार आहे. खेड तालुक्यात आमदार बाबाजी काळे यांची पकड कायम असून, त्यांचे नेतृत्व पुन्हा एकदा जनतेने ठामपणे मान्य केले आहे. पंचायत समितीवर शिवसेना उबाठा गटाची सत्ता येण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. स्थानिक पातळीवर मशाल चिन्ह हे आता केवळ पक्षचिन्ह न राहता राजकीय ताकदीचे प्रतीक बनले आहे.

खेड तालुक्यातील या निवडणुकांनी आता स्पष्ट संदेश दिला असून, राजकीय सत्ता समीकरण पूर्णतः आमदार बाबाजी काळे यांच्या बाजूने झुकले आहे. मशालचा उजेड अधिक तेजस्वी झाला असून, येणाऱ्या काळात तालुक्याच्या राजकारणावर त्याचा प्रभाव निर्णायक ठरण्याची चिन्हे आहेत.